**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७४१

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, : अपिलार्थी

अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद उपविभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अधिपत्याखालील त्रयस्थ पक्ष श्री. आर. बी. इंगळे, श्री. सुनिल निकम व श्री. प्रल्हाद लोखंडे हे कोणत्या जाती निकषाच्या आधारे नोकरीस लागले यासंदर्भात माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीने विचाराधीन अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ३०-०४-२००८ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या एकूण ३६ तलाठी, मंडळ अधिकारी व अव्वल कारकून यांच्या संदर्भात ते कोणत्या जातीच्या निकषावर नोकरीस लागले याची माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर अर्ज जिल्हाधिकारी यांच्याकडे केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपविभागाशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या अर्जाच्या प्रती उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०२-२००८ रोजी पाठविल्या. त्यानुसार उपविभागीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०३-२००८ रोजी काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ३०-०४-२००८ रोजी निर्णय दिला व अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाच्या विषयी माहिती मागितली आहे ते त्यांची मूळ जात बदलून नोकरीस लागले. यामुळे योग्य उमेदवारांना नोकरीची संधी प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांना कोणत्या जातीच्या निकषावर नोकरी मिळाली त्यासंदर्भात त्यांना ही माहिती आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने हीच माहिती त्यांच्या वेगवेगळ्या माहितीच्या अर्जाव्दारे त्यांच्याकडून अपेक्षिली होती. अपिलार्थीस वेळोवेळी ही माहिती पुरविण्यात आली आहे. श्री. आर. बी. इंगळे यांच्याबाबत ही माहिती दिनांक २९-१२-२००७ रोजी श्री. सुनिल निकम यांच्याबाबत दिनांक ०१-०३-२००८ रोजी व श्री. प्रल्हाद लोखंडे यांच्याबाबत दिनांक २८-०८-२००८ रोजी ही माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः देण्यात आली आहे. जन अपिलीय

अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर देखील सर्व संबंधितांच्या नियुक्तीच्या आदेशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०६-२००८ रोजी पाठविल्या आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या तीन त्रयस्थ पक्षाविषयी ते कोणत्या जातीचे आहेत यासंदर्भात माहिती आवश्यक असल्याचे दिसून येते. या त्रयस्थ पक्षाच्या मूळ नेमणुकीच्या आदेशाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेगवेगळ्या संदर्भात दिनांक २७-०६-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय झाल्यानंतर पाठविल्या आहेत. त्रयस्थ पक्षाच्या नेमणूक आदेशाचे अवलोकन करता असे दिसून येते की, श्री. आर. बी. इंगळे हे प्रथमतः लिपीक म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात नोकरीस होते. तथापि ते ज्या संवर्गातून या पदावर नियुक्त झाले होते तो संवर्ग बंद झाल्याने त्यांना तलाठी या संवर्गात सामावून घेण्यात आले. श्री. सुनिल निकम हे प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळाच्या शिफारशीनुसार नेमले गेले आहेत व श्री. प्रल्हाद लोंखडे यांना स्वातंत्र्य सैनिकांच्या कक्षातून नेमणूक दिली गेली आहे. या तिघांना कोणत्याही जातीच्या आधारावर नोकरी लागलेली नाही असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, या त्रयस्थ पक्षापैकी काही व्यक्ती, त्यांची जात बदलून नोकरीला लागल्या आहेत. त्रयस्थ पक्षाने जरी जातीमध्ये बदल केला असला तरी तो कशाकरिता केला व अपिलार्थीस त्याची बाधा कशी पोहोचली हे ठरविणे माहिती आयोगाच्या कक्षेबाहेरचे आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या या अपिलावर आयोगाने विचार करणे आवश्यक वाटत नाही. तथापि या त्रयस्थ पक्षाच्या जाती अपिलार्थीस प्राप्त होण्याकरिता त्यांच्या सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठाची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस पुरविल्यास संबंधित जाती अपिलार्थीस ज्ञात होतील, हे

पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस श्री. आर. बी. इंगळे, श्री. सुनिल निकम व श्री. प्रल्हाद लोखंडे यांच्या सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठाची झेरॉक्स प्रत, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीचा दिनांक ०९-०१-२००८ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झाल्यावर, त्यांनी त्याच्या प्रती संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०४-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये पाठविल्या. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (एक) प्रमाणे त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज, त्यांना तो प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत संबधितांकडे पाठवीणे अपेक्षित होते, तथापि तशी कार्यवाही न करता विलंबाने कार्यवाही करण्यात आली. इतःपर माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त अर्जांवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस श्री. आर. बी. इंगळे, श्री. सुनिल निकम व श्री. प्रल्हाद लोखंडे यांच्या सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठाची झेरॉक्स प्रत हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद उपविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७४२

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

१ श्री. मोहमंद सईद मोहंमद नईमउल्ला, : अपिलार्थी
जुना बाजार, अझिम कॉलनी, घर नं. १-२२-५७२,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध असतांना मुद्दामहून माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, अधिनियमातील कलम १९ (१) प्रमाणे त्यांनी सादर केलेले प्रथम अपील जन अपीलीय अधिकारी यांनी फेटाळून लावून माहिती अधिकाराचा भंग केल्याबद्दल कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागातील सन १९९६ ते दि. १५.०३.२००२ या कालावधीमधील नेमल्या गेलेल्या शिक्षक कर्मचा-यांच्या व लिपीक कर्मचा-यांच्या संदर्भात त्यांचे जातीचे प्रमाणपत्र

कोणत्या कार्यालयाकडून मिळाले व ती वैध झाली आहेत काय व यासंदर्भात इतर काय कारवाई केली इत्यादी माहिती सहा मुद्दयाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती महानगरपालिकेच्या सर्व विभागाकडून मागितली आहे आणि ही माहिती प्राप्त होण्यासाठी वेळ लागणार असल्याने अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे अपिलार्थीस आश्वासित केले. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०३-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये माहिती पाठविली. हे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या वेगळया कथित अर्जासंदर्भात लिहिल्याचे दिसून येते. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे विचारणा केली असता त्यांना तारखेच्या विसंगतीबद्दल कोणताही समाधानकारक खुलासा आयोगास करता आला नाही. अपिलार्थीस निश्चितपणे ही माहिती पाठविली किंवा कसे हे देखील आयोगास आवश्यक त्या पुराव्याअभावी कळण्यास मार्ग नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ०८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविल्याचे आयोगास अवगत केले व अपिलार्थीस पुरविण्यात आलेली कथित माहिती त्यांनी आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २८-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. या सहा मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक १ व २ वगळता उर्वरित चारही मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी व मुद्दा क्रमांक ५ मध्ये मोघम स्वरुपाची माहिती मागविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने या चारही मुद्दयाव्दारे मागणी केलेली विचाराधीन अर्जातील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा खुलासा अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणे मूळात अभिप्रेत नाही. त्यामुळे या मुद्दयावरील कोणतीही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती मात्र जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. त्यांनी ही माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले आहे. तथापि यासंदर्भातील अपिलार्थीस माहिती मिळाल्याची पोच पावती ते आयोगास सादर करु शकत नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहीले असल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे देय माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने याच कालावधीमध्ये ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून व्यक्तिशः उपस्थित राहून उपलब्ध करुन घ्यावी.

प्रसंगावशात् आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, आज रोजी सुनावणीच्या दिवशी शिक्षण विभागातर्फे उपस्थित झालेले जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्यापृष्ठ्यर्थ जे पत्र आयोगास सादर केले आहे ते पत्र दिनांक ०८-०५-२००७ रोजीचे असल्याचे दिसून येत आहे. तसेच हे पत्र त्यांनी अपिलार्थीस

त्यांच्या अर्ज दिनांक २७-०२-२००७ च्या संदर्भात लिहिल्याचे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०३-२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर दिनांक ०८-०५-२००७ ला जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कशी माहिती पुरविली हे आयोगास न सुटणारे कोडे आहे. तेव्हा अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात मनपा आयुक्त, औरंगाबाद यांनी स्वतः त्यांच्या पातळीवर या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन सर्व संबंधित कर्मचा-यांवर प्रशासकीय कारवाई करावी अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे. तसेच आयोगाकडे सुनावणीसाठी उपस्थित राहतांना त्या प्रकरणाची पुरेशी जाण असणा-या कर्मचा-यांना आयोगासमोर उपस्थित राहण्यासाठी व शक्यतो आयोगाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय संबंधीत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना गैरहजर न राहण्याच्या सूचना त्यांच्याकडील सर्व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना द्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त महानगरपालीका, औरंगाबाद यांनी या प्रकरणाशी संबंधीत सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कारवाई करावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहमंद सईद मोहंमद नईमउल्ला, जुना बाजार, अझिम कॉलनी, घर नं. १-२२-

५७२, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ७४३/०८ व ७४४/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७४३ व ७४४

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

१ श्री. विशाल कडुबा पाखरे, अपिलार्थी

सी-५७, जुनी पोलीस कॉलनी, एन-७, सिडको,

औरंगाबाद

**विरुध्द**

<u>अपील क्रमांक ७४३/०८ व ७४४/०८</u>

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने विचाराधीन अपील क्रमांक ७४३/२००८ व ७४४/२००८ च्या संदर्भात त्यांना माहिती प्राप्त झाली असल्याने सदरील अपिले

ते मागे घेत असल्याचे त्यांचे निवेदन आयोगास दोन वेगवेगळ्या पत्राव्दारे सादर केले आहे. या पत्रांचे अवलोकन करता खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेली व्दितीय अपिले मागे घेतली असल्याने अपिलार्थीची विचाराधीन अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ७४३/२००८, दिनांक २८-०५-२००८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ७४४/२००८, दिनांक २८-०५-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विशाल कडुबा पाखरे, सी-५७, जुनी पोलीस कॉलनी, एन-७, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७४५

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

१ श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, : अपिलार्थी
संपादक साप्ताहिक राजनिष्ठा,
ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनीच्या मागे,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अधीक्षक अभियंता,
लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील मंजूर पदे, त्यावर कार्यरत असलेले कर्मचारी, तसेच

त्यांना दिनांक ०१-०४-२००१ ते ३१-१२-२००७ या कालावधीमध्ये मंजूर करण्यात आलेले घरबांधणी अग्रीम, ते कधी मंजूर करण्यात आले, दरमहा परतफेड किती, अग्रीम मंजूर करतांना नियमानुसार सादर करण्यात आलेली कागदपत्रे, घरबांधणी अग्रीम परतफेड करण्याचे शासनाचे नियम इत्यादी संदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (क) नुसार देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले तसेच जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०८-०१-२००८ च्या पत्रामधील मजकुराशी सहमती दर्शविली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याचे नाकारले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विस्तृत प्रमाणात माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी प्रश्नार्थक स्वरुपात त्यांनी मागितली असली तरी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अभिलेख्यात उपलब्ध असते, ती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (क) नुसार ही माहिती नाकारली आहे. अधिनियमातील कलम ८ (१) (क) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

"जी माहिती प्रकट केल्याने भारताच्या सार्वभौमत्वाला किंवा एकात्मतेला, राज्याच्या सुरक्षेला, युध्दतंत्रविषयक, वैज्ञानिक किंवा आर्थिक हितसंबंधांना, परकीय राज्यांबरोबरच्या संबंधांना बाधा पोहोचेल किंवा अपराधाला चिथावणी मिळेल, अशी माहिती ; "

अधिनियमातील कलम ८ (१) (क) च्या तरतुदीचे अवलोकन केले असता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड केल्याने वरील परिस्थितीत कोणत्याही प्रकारे या तरतुदीस छेद देण्याची शक्यता या प्रकरणी संभवत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारतांना संदर्भित केलेले कलम ८ (क) या प्रकरणी लावणे हे किती हास्यास्पद आहे याची कल्पना सहज येऊ शकते. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावरही कडी करुन अपिलार्थीचे अपील जन माहिती अधिकारी यांच्या मताशी सहमती दर्शवून फेटाळले. जन माहिती व अपिलीय अधिकारी हे जलसंपदा विभागाचे जबाबदार व ज्येष्ठ अधिकारी आहेत. अपिलार्थीस माहिती नाकारतांना अधिनियमातील कलम ८ (क) हे जरी त्यांनी पाहिले असते तर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी नाकारले नसते. या सर्व प्रकारावरुन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाची त्याच्या कुवतीप्रमाणे खिल्ली उडविल्याचे आयोगास वाटत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील बेजाबदारपणा आणि कर्तव्यपरायणतेचा अभाव पुरेपूरपणे स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. जी. एम. सोनवणे सध्या पंचायत समिती, मालेगाव येथे उपविभागीय अभियंता या पदावर कार्यरत आहेत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०७-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० /- भरण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र अधिनियमाव्दारे सशुल्क माहिती देण्यासाठीचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिले असल्याने, आता ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय

होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही वैयक्तीक लक्ष पुरविल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णय देखील त्यांचे सहायक अधीक्षक अभियंता यांच्या सहीने अपिलार्थीस कळविला आहे, ज्यावर त्यांना सही करणे बंधनकारक आहे, त्यामुळे या प्रकरणाचे संबंधित तत्कालीन जन अपिलीय अधिकारी (श्री. जे. एम. लिहितकर सध्या अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद) यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची सचिव (जलसंपदा) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. जी. एम. सोनवणे सध्या पंचायत समिती, मालेगाव येथे उपविभागीय अभियंता या पदावर कार्यरत आहेत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, संपादक साप्ताहिक राजनिष्ठा, ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनीच्या मागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७४६

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

१ श्री. साळवे विठ्ठल किशनराव, : अपिलार्थी

संपादक प्रजागर्जना, गौतमनगर, पाथरी, तालुका पाथरी,

जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,

जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या त्यांच्या अर्जात त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र सादर करुन आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती देण्यासाठी शुल्काचा भरणा केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे जालना जिल्ह्यात सन २००६-२००७ या कालावधीतील रोजगार हमी योजने अंतर्गत केल्या गेलेल्या कामासंदर्भात विस्तृत स्वरुपाची माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. या अर्जात त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा म्हणून मुख्याधिकारी, नगर परिषद, पाथरी यांचे दिनांक २३-०३-२००७ रोजीचे प्रमाणपत्र जोडले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २४० इतके शासकीय कोषागारात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जालना येथील स्टेट बँक ऑफ हैद्राबाद मध्ये दिनांक ०४-०९-२००७ रोजी केला. तथापि शुल्क भरुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-११-२००७ रोजी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि हे आदेश प्राप्त होऊनही अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांच्या लेखी म्हणण्याप्रमाणे युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी आता बरोबर आणली असून ती माहिती आता ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप हे मोठे असुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील

जवळजवळ संपूर्ण माहिती मागितली असल्याचे दिसून येते. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार हा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात प्रतिसाद न देता अपिलार्थीस दिनांक ०२-०७-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला, म्हणजे विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २४० इतके शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी या शुल्काचा सविस्तर तपशील, जो त्यांनी अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अनिवार्य आहे, तो दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०४-०९-२००७ रोजी या शुल्काचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या जालना शाखेत केला आहे. या चलनाची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांना देऊनही त्यांना कोणतीही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली गेली नाही. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याबरोबर आणली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलल्या मुदतीपेक्षा विलंबाने जो प्रतिसाद दिला आहे तो अधिनियमातील कलम ७ (३) (क) व ७ (५) च्या परंतुकाच्या तरतुदीचा भंग करणारा असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद देखील या प्रकरणी अवैध ठरत आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य देणे भाग आहे. तथापि या माहितीचे शुल्क अपिलार्थीने दिनांक ०४-०९-२००७ रोजी भरले असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना ते अपिलार्थीस परत करावे लागेल. या शुल्काचा परतावा जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत अपिलार्थीस करावा असे त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या त्यांच्या कागदपत्राची योग्य प्रकारे शहानिशा केली नाही.

अपिलार्थीस माहितीपोटीचे जे शुल्क भरावयाचे, ते त्यांनी अधिनियमातील विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असूनही कळविले. या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या शुल्काचा इतर कोणताही तपशील त्यांनी दिला नाही व परिणामी त्यांचे दिनांक ०२-०७-२००७ रोजीचे पत्र वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अवैध ठरले आहे. एवढे असूनही विशेषतः आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-११-२००७ रोजी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीस आजपर्यंत म्हणजे दि.०१-०७-२००९ पर्यंत कोणतीही माहिती पुरविली नही. जन माहिती अधिकारी यांची अशा प्रकारची कार्यशैली केवळ त्यांच्या कर्तव्यपरायणतेचा अभावच नाही तर त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा देखील दर्शवित आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेली उपेक्षा व हेळसांड दुर्लक्षित करता येणार नाही. सबब सचिव (महसूल) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वा कार्यशैलीबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २४० इतके त्यांना परत करावे.

४. सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. साळवे विठ्ठल किशनराव, संपादक प्रजागर्जना, गौतमनगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७४७

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. विश्वनाथ बाबुराव भायेकर,<br>नेहरु रोड, रंगारगल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य अभियंता, गोदावरी खोरे विकास महामंडळ,<br>जलसंपदा विभाग, जालना रोड, औरंगाबाद | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कालव्याच्या बाजूने सिमेंट रोड बांधण्याची परवानगी मिळणेबाबत एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील मुख्य अभियंता, गोदावरी खोरे विकास महामंडळ यांना उद्देशून केले होते. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात पुढील कार्यवाही करण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली.

तथापि मध्यंतरीच्या काळात दिनांक ०२-०२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवून दिली होती. अपिलार्थीस ही माहिती मिळाल्यापृष्ठ्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची पोच दिल्याचे देखील आढळून येत आहे. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली असल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीच्या दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचा आवश्यक तो पुरावा (रजिस्टर्ड पोस्टाची दिनांक ०६-०२-२००८ रोजीची पावती) जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केला आहे. मात्र अपिलार्थीने दिनांक २४-०३-२००८ रोजी आयोगास सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे, जे वस्तुतः आयोगास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेला पुरावा पाहता पूर्णतः विसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर आता वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास वाटत नाही. सबब

अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन शेवटच्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने दिनांक १०-१०-२००७ रोजी अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला असता अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांच्या कनिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार करुन या प्रकरणामध्ये कालापव्यय केला आहे. वास्तविक पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सर्वसाधारण स्वरुपाची होती. ही माहिती अपिलार्थीस अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयाने देणे अपेक्षित असतांना देखील त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवले आहे. सबब मुख्य अभियंता, गोदावरी खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, गोदावरी खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई

करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विश्वनाथ बाबुराव भायेकर, नेहरु रोड, रंगारगल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, गोदावरी खोरे विकास महामंडळ, जलसंपदा विभाग, जालना रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७४९

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

१ श्री. रोहिदास साहेबराव जाधव, : अपिलार्थी
मु. मैराळसावंगी, पो. गौडगांव, तालुका गंगाखेड,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मैराळसावंगी,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,
जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०५-०१-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे ग्रामसेवकाकडे माहिती मागितली असता संबंधित ग्रामसेवकाने त्यांना दिनांक २२-०२-२००८ रोजी दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याने व तसेच त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी सुनावणी घेतली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या ग्रामपंचायतीशी संबंधित जानेवारी २००२ ते डिसेंबर २००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस काही माहिती दिली. सर्वसाधारणपणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जास दिनांक ०४-०२-२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस ही माहिती २९ दिवस इतक्या विलंबाने दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जानेवारी २००२ ते ३१ डिसेंबर २००२ या कालावधीतील कोणतीही माहिती संबंधित माहितीच्या संदर्भातील कोणतेही रेकार्ड जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कारण दर्शवून दिली नाही.

त्याचप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ग्रामपंचायतीस विविध विकास कामासाठी एकूण किती बजेट आले व हा खर्च कसा झाला याची माहिती मागितली. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कॅशबुकच्या प्रती अपेक्षित असल्याचे दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्याकडे झालेल्या कामावर कामनिहाय किती खर्च झाला ही माहिती पुरवली आहे. थोडक्यात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व

दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली हा अपिलार्थीचा दावा या टप्प्यावर ब-याच अंशी सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्या ग्रामपंचायतीशी संबंधित जानेवारी २००२ ते ३१ डिसेंबर २००७ या कालावधीतील अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड यांच्या कार्यालयात जाऊन प्राप्त करुन घ्यावी व तसेच अपिलार्थीने ज्या कालावधीशी संबंधित माहिती मागितली आहे त्या कालावधीशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडील कामाच्या कॅशबुकच्या सर्व झेरॉक्स प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीप्रमाणे प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी (ग्रामसेवक) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रोहिदास साहेबराव जाधव, मु. मैराळसावंगी, पो. गौडगांव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मैराळसावंगी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७५१

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

१ श्री. भगवान मारुती वाघमारे, : अपिलार्थी
मु. पो. तामलवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमागे,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
विभागीय कार्यालय, पुणे - ०५

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक संचालक(तां), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
विभागीय कार्यालय, पुणे - ०५

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक संचालक (अ.ता.), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे - ०५

त्रयस्थ पक्ष : १. श्री. अंजलकर, २. श्री. चिंचकर, ३. श्री. तगारे, ४. श्री. हरदास, ५. श्री. भोसले, ६. श्री. कुरुप, ७. श्री. दराडे, ८. श्री. देशमुख

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथील कार्यालयात दिनांक ०५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो मागितलेली माहिती मिळाली नाही, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६, ७, व ८ च्या बाबत समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत व समकक्ष पदाबाबत माहिती मिळाली नाही ती मिळावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील वसतीगृह अधीक्षक पदावरील अपिलार्थीची बारा वर्षांची सेवा समाप्त केल्याबाबत एकूण नऊ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १३-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५४ /- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीस दिनांक १४-०१-२००८ रोजी सशुल्क माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ११-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. हा निर्णय देतांना जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सहमती दर्शविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी आणि एक त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली सर्व माहिती पुरविल्याचे आयोगास सांगितले व अद्यापही अपिलार्थीस, आयोगाने आदेशित केल्यास, माहिती देण्याची तयारी दर्शविली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे ज्या नऊ मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे त्यापैकी मुद्दा क्रमांक ५, ६, ७ व ८ शी

संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मुद्दा क्रमांक ५ व ७ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही निश्चित अशी माहिती मागितली नसून या मुद्दयाव्दारे त्यांनी अनुक्रमे त्यांना अद्याप औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इंदापूर त्यांच्याकडून वेतनवाढी मिळाल्या नाही व माझी विनंती बदली विकल्प होता परंतु माझी प्रशासकीय बदली करण्यात आली अशी माहिती मागितली होती. यावरुन या मुद्यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. परिणामी अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक ५ व ७ शी संबंधित माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. अशा प्रकारची माहिती देण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमामध्ये तरतूद नाही त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ८ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे, जी अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता असे आढळून येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढ्या हद्दीपुरती ही प्रक्रिया सीमित आहे. जन माहिती अधिकारी यांना निर्णयाची कारणे/अभिप्राय विचारणे हे मूळात अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अनुज्ञेय नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ८ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ व ९ च्या संदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीस त्यांनी मुद्दा क्र.एक च्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या संबंधित त्रयस्थ पक्षाच्या नेमणूक आदेशाच्या प्रती पुरविल्या आहेत. आता अपिलार्थीस ज्यांच्या नेमणुकीच्या प्रती द्यावयाच्या राहिल्या आहेत ते सर्वजण नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत व त्यापैकी श्री. अंजलकर आणि श्री. हरदास हे मयत झाले आहेत. त्यांच्या नेमणूक आदेशाच्या प्रती अपिलार्थीस आज त्यांना उपलब्धतेअभावी देता येणार नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेली विशिष्ट परिस्थिती पाहता अपिलार्थीस आता उर्वरित त्रयस्थ पक्षाच्या नेमणूक आदेशाच्या प्रती प्राप्त होणार नाहीत हे उघड आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांच्या मूळ सेवापुस्तकातील शैक्षणिक पात्रता नोंदविल्याच्या पानाच्या संदर्भात आयोगास जन माहिती अधिकारी यांच्याकडून असे अवगत केले गेले की, अपिलार्थीच्या मूळ सेवापुस्तकाची एक प्रत अपिलार्थीकडे उपलब्ध आहे. त्यामुळे अपिलार्थीकडे ही माहिती उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी यांचा हा दावा आयोग अमान्य करीत आहे. जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ सेवापुस्तकातील शैक्षणिक पात्रता नोंदविलेल्या पानांच्या झेरॉक्स प्रती त्यांच्याकडे दिल्या आहेत. त्यांचे मूळ सेवापुस्तक जरी इंदापूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे असले तरी या प्रकरणी मूळात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे विहित मुदतीत वा तदनंतरही कार्यवाही न केल्याने आता त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था इंदापूर यांच्याकडून अपिलार्थीच्या या मुद्दयावरील माहिती मागवून घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात अपिलार्थीची निवड ज्या निवड समितीकडून झाली त्या निवड समितीची यादी त्यांनी मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी सध्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. तथापि ही माहिती शोध घेऊन तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस ती विनामूल्य पुरविण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास आश्वासीत केले आहे. तसेच मुद्दा क्रमांक ९ च्या संदर्भातील माहिती मा. उच्च न्यायालयाकडे असल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले. या मुद्दयावरही असे स्पष्ट करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन त्यांना विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे वरीलप्रमाणे केलेले पृथ:करण पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४ व ९ च्या संदर्भातील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५४ /- जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर कळविले

असल्याने आता हे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत करावे, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे हेतूपुरस्सर टाळले आहे असे नमूद केले आहे. तथापि अशा प्रकारची वस्तुस्थिती आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नसल्यामुळे अपिलार्थी यांचे हे म्हणणे आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ५४ इतके त्यांना परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भगवान मारुती वाघमारे, मु. पो. तामलवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमागे, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक (अ.तां.), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, (तां.) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७५२

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

१ श्री. सुरेश सुदामराव गायकवाड, : अपिलार्थी
यशवंतनगर, मुरुम, तालुका उमरगा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मुरुम, तालुका उमरगा,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १७-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ठराव क्रमांक ५४ (३) व ६६ (५) बाबत अद्याप अभिप्राय मिळाला नसल्याने आणि त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे म्हणून त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ठराव क्रमांक ५४ (३) व ५४ (३) VI, दिनांक १३-०२-२००४ च्या

अभिप्रायाची प्रत मिळण्यासाठी अर्ज केला होता. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन यासंदर्भात तहसीलदार, लातूर यांच्या दिनांक २६-०८-१९७७ च्या १२३७ या क्रमांकाच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत जोडली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-१२-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रशासकीय कारवाईशी संबंधित असल्याने व त्याचा माहिती अधिकार अधिनियमाशी कोणताही संबंध नसल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांच्या विनंतीशी सुसंगत युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहिती मागितली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने दिनांक २०-११-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर उपरोक्त माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास या प्रकरणाची पार्श्वभूमी विशद केली व असे अवगत केले की, अपिलार्थी व इतर दोन कर्मचारी यांनी नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये लोकांकडून अवैधरित्या नगरपरिषदेच्या पावत्यांचा गैरवापर करुन काही रक्कम प्राप्त करुन घेतली. तथापि या रकमेचा त्यांनी नगर परिषदेकडे भरणा न केल्याच्या कारणांवरुन त्या तीन अपचा-यापैकी एक अपचारी म्हणजेच अपिलार्थी यांना सेवेतून निलंबीत करण्यात आले. उर्वरित दोन अपचारी यांना सेवेतून कमी न करण्यात आल्याकारणाने अपिलार्थीने ही माहिती त्यांच्याकडे मागितली आहे.

उर्वरित दोन कर्मचा-यांच्या बाबत कोणताही अभिप्राय तत्कालीन नगर परिषदेच्या मुख्याधिका-याने जिल्हाधिकारी तथा उपसंचालक नगरपरिषद, उस्मानाबाद यांच्याकडे न पाठविल्यामुळे अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती मूळात अस्तित्वात नाही त्यामुळे ती अपिलार्थीस पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व जन माहिती अधिकारी यांनी विशद केलेली या प्रकरणाची पार्श्वभूमी पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती मूळात अस्तित्वात नसल्याने ही माहिती अपिलार्थीस आता देता येणार नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत प्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात् संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास अधिनियमातील कलम ७ (८) प्रमाणे प्रतिसाद देणे अभिप्रत होते परंतु त्यानी अशी कृती केली नाही त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. बाळासाहेब जगताप, तत्कालीन जन माहिती अधिकारी सध्या मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी) यांना आयोगातर्फे त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी (श्री. बाळासाहेब जगताप, तत्कालीन जन माहिती अधिकारी सध्या मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी) यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक 01-07-2009** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश सुदामराव गायकवाड, यशवंतनगर, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८७५

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महादेव भिमराव केंद्रे,<br>मु. भोजनकवाडी, पो. धर्मापूरी, तालुका परळी वै.,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (महसूल),<br>तहसील कार्यालय, परळी (वै.), तालुका परळी (वै.),<br>जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी (वै.),<br>तालुका परळी (वै.), जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ यांना दिनांक ११-०२-२००८ रोजी व्यक्तिशः अर्ज दिला असता त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही व अपिलार्थीस काहीही कळविले नाही. विहित कालावधीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने तहसीलदार, परळी वैजनाथ यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये अपील सादर केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीचे अपील स्वीकारले नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील अर्ज तहसीलदार यांच्याकडे डाक नोंद पोच पावतीने पाठवून दिला. तथापि या

अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी सुनावणी घेतली नाही व माहिती दिली नाही. त्यांना सहाय्य करणा-या कर्मचा-यांना पाठीशी घालण्याचे काम केले व अपिलार्थीस जाणूनबुजून माहिती दिली नाही. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही होऊन त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित व्हावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे भोजनकवाडी येथील स्वस्त धान्य दुकानासंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन १९९४ ते दि. ११-०२-२००८ या कालावधीतील एपीएल, बीपीएल, अंत्योदय कार्डधारकांची यादी, शिधावाटप व रॉकेल वाटपाची दुय्यम प्रत आणि रॉकेल प्रति लिटर भाव - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या सहायकांनी वेळेत उपलब्ध न करुन दिल्याने अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. तथापि हे पत्र अपिलार्थीने स्वीकारण्यास नकार दिला आणि अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर आहेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) श्री. जी. के. सिरसाट (सध्या नायब तहसीलदार (महसूल) या पदावर कार्यरत) यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील पुरवठा विभागाशी संबधित श्रीमती परवीन पठाण व श्री. सचिन देशपांडे, शाखा प्रमुख पुरवठा शाखा व श्री. एम. डी. सुरवसे

यांच्याकडे उपलब्ध असणे अपेक्षित असल्याने त्यांनी संबधितांना दिनांक १२-०२-२००८ रोजी पत्र पाठवून या माहितीसंदर्भात त्यांनी संबधितांकडे त्यांच्या दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या व दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या स्मरणपत्राव्दारे पाठपुरावा केला होता. संबंधितांनी त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली कोणतीही माहिती उपलब्ध करुन न दिल्याने त्यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी संबंधिताच्या जबाबदारीवर निर्णय देऊन अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. हा निर्णय अर्जदारास कळविण्यासाठी त्यांच्या कार्यालयाचे दफेदार यांच्यामार्फत या निर्णयाची प्रत अपिलार्थीस व्यक्तिशः देऊ केली असता अपिलार्थीने सदर निर्णय घेण्यास नकार दिला त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती पुरविता येऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद वस्तुस्थितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या सहायकांना वेळोवेळी पत्रे व स्मरणपत्र पाठवून अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्यास कलम २० नुसार दंडणीय शास्तीस ते जबाबदार राहतील अशी लेखी समज त्यांनी वरील सर्व संबधितांना दिली. परंतु एवढे असूनही त्यांच्या सहायकांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणताही प्रयत्न केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने तहसीलदार, परळी वैजनाथ यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांनी देखील प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही. यावरुन अपिलार्थी यांच्या, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती न देणा-या जन माहिती अधिका-याच्या सहायकांना पाठीशी घालून माहिती दिली नाही, या म्हणण्यामध्ये, आयोगास तथ्यांश आढळत आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे व त्यांचा लेखी युक्तिवाद पाहता या प्रकरणी अपिलार्थीस माहिती न मिळण्यासाठी त्यांचे सर्व संबंधित सहायक जबाबदार असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या माहितीशी संबंधित कालावधी जरी किंचीत जास्त असला तरी ही माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांना फारसे जिकीरीचे किंवा अवघड काम होते, असे आयोगास वाटत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार

अर्जदारास माहिती देण्यासाठी संबधित जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ५ (४) च्या तरतुदीनुसार त्यांच्या सहायकांकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविण्याविषयी सूचना दिलेल्या आहेत. तथापि त्यांच्याकडून सूचना प्राप्त होऊनही पुरवठा विभागातील संबंधित लिपिकांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती पुरविली नाही. अंतीमत: ते अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरवू शकले नाहीत, हे देखील या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीस विहित मुदतीत ही माहिती न पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचे संबंधित सहायक हेच जबाबदार असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्या संबंधीत सहायकांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस स्वत:ला पात्र ठरविले आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांचे संबंधीत सहायक आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी एक संधी देण्याच्या दृष्टीने त्यांना (श्रीमती पठाण, श्री. सचिन देशपांडे,श्री. एम.डी. सुरवसे)असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवण्याबद्दल अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार २५००० रुपये इतकी एकत्रित शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये, यांचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या कालावधीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश कायम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी. या आदेशाच्या प्रती सर्व संबंधित सहायकांना जन माहिती अधिकारी यांनी तात्काळ पुरवावयाच्या आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देणे भाग आहे. सबब संबंधित जन माहिती

अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांचे सहायक (श्रीमती परवीण पठाण, श्री. सचिन देशपांडे व श्री. एम. डी. सुरवसे) यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन न दिल्याबद्दल एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस

दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महादेव भिमराव केंद्रे, मु. भोजनकवाडी, पो. धर्मापूरी, तालुका परळी (वै.), जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी

(वै.), तालुका परळी (वै.), जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी (वै.), तालुका परळी (वै.), जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७५१

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

१ श्री. भगवान मारुती वाघमारे, : अपिलार्थी
मु. पो. तामलवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमागे,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
विभागीय कार्यालय, पुणे - ०५

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
विभागीय कार्यालय, पुणे - ०५

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक संचालक (अ.ता.), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे - ०५

त्रयस्थ पक्ष : १. श्री. अंजलकर, २. श्री. चिंचकर, ३. श्री. तगारे, ४. श्री. हरदास, ५. श्री. भोसले, ६. श्री. कुरुप, ७. श्री. दराडे, ८. श्री. देशमुख

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथील कार्यालयात दिनांक ०५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो न मिळालेली माहिती मागितली होती व तसेच त्यांना प्राप्त झालेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६, ७, व ८ च्या बाबत समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत व समकक्ष पदाबाबत माहिती मिळाली नाही ती मिळावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या वसतीगृह अधीक्षक पदावरील बारा वर्षांची सेवा समाप्त केल्याबाबत एकूण नऊ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १३-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५४ /- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीस दिनांक १४-०१-२००८ रोजी सशुल्क माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ११-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. हा निर्णय देतांना जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सहमती दर्शविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी आणि एक त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस पुरविल्याचे आयोगास सांगितले व अद्यापही अपिलार्थीस आयोगाने आदेशित केल्यास माहिती देण्याची तयारी दर्शविली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे ज्या नऊ मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे त्यापैकी मुद्दा क्रमांक ५, ६, ७ व ८ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मुद्दा क्रमांक ४

व ७ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही निश्चित अशी माहिती मागितली नसून या मुद्दयाव्दारे त्यांनी अनुक्रमे त्यांना अद्याप औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इंदापूर त्यांच्याकडून वेतनवाढी मिळाल्या नाही व माझी विनंती बदली विकल्प होता परंतु माझी प्रशासकीय बदली करण्यात आली असे माहिती मागितली होती. याबाबत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. परिणामी अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक ४ व ७ शी संबंधित माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. अशा प्रकारची माहिती देण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमामध्ये तरतूद नाही त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही.

अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ८ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे जी अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता असे आढळून येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करणे एवढ्या हद्दीपुरती ही प्रक्रिया सीमित आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने निर्णयाची कारणे विचारली हे अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अनुज्ञेय नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ८ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ व ९ च्या संदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीस त्यांनी मुद्दा एक च्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या संबंधित त्रयस्थ पक्षाच्या नेमणूक आदेशाच्या प्रती पुरविल्या आहेत. आता अपिलार्थीस ज्यांच्या नेमणुकीच्या प्रती द्यावयाच्या राहिल्या आहेत ते सर्वजण नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत व त्यापैकी श्री. अंजलकर आणि श्री. हरदास हे मयत झाले आहेत. यावरुन त्यांच्या नेमणूक आदेशाच्या प्रती अपिलार्थीस देता येणार नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेली विशिष्ट परिस्थिती पाहता अपिलार्थीस आता उर्वरित त्रयस्थ पक्षाच्या नेमणूक आदेशाच्या प्रती प्राप्त

होणार नाही हे उघड आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांच्या मूळ सेवापुस्तकातील शैक्षणिक पात्रता नोंदविल्याचे पानाच्या संदर्भात आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या मूळ सेवापुस्तकाची एक प्रत अपिलार्थीकडे उपलब्ध आहे. त्यामुळे अपिलार्थीकडे ही माहिती उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी यांचा हा दावा आयोग अमान्य करीत आहे. जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ सेवा पुस्तकातील शैक्षणिक पात्रता नोंदविलेल्या पानांच्या झेरॉक्स प्रती त्यांच्याकडे दिल्या आहेत. त्यांचे मूळ सेवा पुस्तक जरी इंदापूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे असले तरी या प्रकरणी मूळात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही न केल्याने आता त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था इंदापूर यांच्याकडून अपिलार्थीच्या या मुद्दयावरील माहिती मागवून घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात अपिलार्थीची निवड ज्या निवड समितीकडून झाली त्या निवड समितीची यादी त्यांनी मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी सध्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. तथापि ही माहिती शोध घेऊन तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस ती विनामूल्य पुरविण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आश्वासीत केले आहे. तसेच मुद्दा क्रमांक ९ च्या संदर्भातील माहिती मा. उच्च न्यायालयाकडे असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. या मुद्दयावरही असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे केलेले पृथकरण पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४ व ९ च्या संदर्भातील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे हेतूपुरस्सर टाळले आहे असे नमूद केले आहे. तथापि अशा प्रकारची वस्तुस्थिती आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नसल्यामुळे अपिलार्थी यांचे हे म्हणणे आयोग अमान्य करीत आहे.

(अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५४ /- जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर कळविले असल्याने आता हे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत करावे.)

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ५४ इतके परत करावे.

३.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भगवान मारुती वाघमारे, मु. पो. तामलवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमागे, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक (अ.ता.), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९८५

निर्णय दिनांक ०१-०७-२००९

१ श्री. रमेश दामोधर येवले, : अपिलार्थी
"नयनतारा", सी-२, हिमांशु प्राईड, अपनानगर, दर्गा रोड,
तापडियानगर जवळ, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : १. श्री. ठाकूर २. श्री. हराळ रामदास हरिभाऊ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांची खातेनिहाय चौकशी श्री. हराळ, सहायक गट शिक्षणाधिकारी यांच्या चौकशीतील शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यातील ६१ मुद्दयांच्या प्रश्नोत्तरांमुळे सुरु केली असल्यामुळे त्यांच्या बचावासाठी सदर माहितीची त्यांना गरज आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी केलेल्या त्यांच्या दिनांक २८-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जो जन माहिती अधिकारी यांना दिनांक ३१-०१-२००८ रोजी प्राप्त झाला त्याव्दारे, जन माहिती अधिकारी

यांच्याकडून त्यांच्या स्वतःच्या विभागीय चौकशीच्या संदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८२ इतके भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २०-०२-२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर त्यांनी दिनांक २६-०२-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात दिनांक २५-०४-२००८ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना योग्य ती माहिती मिळाली नसल्याचा युक्तिवाद करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-११-२००८ रोजी, त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर दिलेली माहिती खोटी असल्याचे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलाथीने त्यांच्याकडे एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. त्यापैकी तीन मुद्दयाशी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०२-२००८ रोजी सशुल्क पुरविली आहे व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती, जी गट शिक्षणाधिका-याकडे उपलब्ध होती, ती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-११-२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती त्यांना विलंबाने प्राप्त झाली असून ती खोटी आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहितीतील काही विसंगती आयोगाच्या निदर्शनास आणल्या. यावर असे स्पष्ट करण्यात येते की, संबंधित गट शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अपिलार्थीस अधिनियमातील तरतूदीप्रमाणे दिली आहे. प्राप्त माहितीत जर काही त्रुटी असतील तर त्याबद्दल अपिलार्थी शिक्षण विभागातील वरिष्ठ प्रशासनाकडे यासंदर्भात दाद मागू शकतील.

सबब अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीतील सत्यासत्यता पडताळून पाहण्यासाठी, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याच्या आत चौकशी करावी व त्यांच्या स्तरावर हे प्रकरण निकाली काढावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती अपिलार्थीस पूर्वीच न देण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, संबंधित शिक्षणाधिकारी यांची या कालावधीमध्ये बदली झाली होती एवढीच माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती. या प्रकरणामध्ये अपिलार्थीच्या विभागीय चौकशीचे काम पूर्ण करण्यात येऊन त्याबाबत अंतीम आदेशही पारित झालेले आहेत. या चौकशीच्या वेळी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती गट शिक्षणाधिका-याकडून प्राप्त करुन देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोगास योग्य वाटतो. ही माहिती अपिलार्थीपासून लपवून ठेवण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांचा कोणताही असद्‌हेतू असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन नि:संशयपणे सिध्द होत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रमेश दामोधर येवले, "नयनतारा", सी-२, हिमांशु प्राईड, अपनानगर, दर्गा रोड, तापडियानगर जवळ, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७५३
निर्णय दिनांक ०२-०७-२००९

१. श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
उपअभियंता,
जिल्हा परिषद, ल.पा.उपविभाग,सोयगाव,
जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (सिंचन),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपअभियंता,
ल.पा.जिल्हा परिषद, उपविभाग,सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे दि.१०.०४.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १०.०४.२००८ रोजी प्राप्त झाली असल्याने ते आयोगाकडे केलेले द्वितीय अपील मागे घेत आहेत व या संबंधी त्यांचे काहीही म्हणणे नाही.

खुद्द अपिलार्थी आयोगाकडील विचाराधीन उपरोक्त अपील मागे घेत असल्याने, सदर अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील क्र.७५३/०८, दि.०८.०४.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कल्याण सोपानराव सोनवणे,रा.एन-११,के ४०/४, नवजीवन कॉलनी,हडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,ल.पा.जिल्हा परिषद, उपविभाग,सिल्लोड,जिल्हा औरंगाबाद यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७५४
निर्णय दिनांक ०२-०७-२००९

१. श्री. भाऊसाहेब सुर्यभान रंधे, : अपिलार्थी
ता.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
तहसीलदार,पैठण
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा दि.२२.१०.२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज नामंजूर केल्याचे कळविले नाही. त्यांनी मनीऑर्डरद्वारे पाठविलेले माहितीपोटीचे शुल्क रक्कम रु.२५/- स्वीकारुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही अथवा ती मनीऑर्डरही त्यांना परत केली नाही.या प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,यांच्अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,कडे प्रथम अपील केले असता, त्यांनीही त्यांच्अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपिलामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे फेरफार क्र.६०१ रद्द करण्याबाबत सुर्यभान रंधे व विलास रंधे, रा. मुधलवाडी यांच्या दि. १८.०८.२००७ रोजीच्या अर्जावर एकूण ८ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर दि. २६.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रु.२५/-रु.ची

मनीऑर्डरसह सादर केली होती.अपिलार्थीच्या या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.११.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व्यापक स्वरुपाची असल्याचे कारण दर्शवून ती माहिती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.१२.२००७ प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील प्रश्नार्थक स्वरुपाच्या माहितीशिवाय इतर उर्वरित माहिती आठ दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे मनीऑर्डरद्वारे त्यांनी पाठविलेल्या शुल्काच्या संदर्भात आयोगास असे असगत केले की, त्यांनी या शुल्काच्या संदर्भात काहीही कळविलेले नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रु.२५/- मनीऑर्डर पाठविल्याचे व ती तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्याने स्वीकार केल्याचे आयोगास सादर केले. यावरुन अपिलार्थीची रु.२५/- इतक्या किंमतीची मनीऑर्डर तहसीलदार यांच्या कार्यालयात दि.२६.१०.२००७ रोजी प्राप्त झालचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली नाही. मात्र प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले व

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे दि.१०.०४.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १०.०४.२००८ रोजी प्राप्त झाली असल्याने ते आयोगाकडे केलेले द्वितीय अपील मागे घेत आहेत व या संबंधी त्यांचे काहीही म्हणणे नाही.

खुद्द अपिलार्थी आयोगाकडील विचाराधीन उपरोक्त अपील मागे घेत असल्याने, सदर अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील क्र.७५३/०८, दि.०८.०४.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कल्याण सोपानराव सोनवणे,रा.एन-११,के ४०/४, नवजीवन कॉलनी,हडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,ल.पा.जिल्हा परिषद, उपविभाग,सिल्लोड,जिल्हा औरंगाबाद यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ७५४/०८,७५५/०८ व ७५६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७५४,७५५ व ७५६
निर्णय दिनांक ०२-०७-२००९

१. श्री. भाऊसाहेब सुर्यभान रंधे, : अपिलार्थी
रा. मुधलवाडी,ता.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,पैठण
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०५.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले (अपील क्र. ७५४/०८ व ७५६/०८) व दि.७.०६.२००७ रोजी नोंदविलेले एक स्वतंत्र द्वितीय अपील क्र. ७५५/०८ आयोगाच्या विचाराधीन आहे.

**अपील क्रमांक ७५४/०८**:

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा दि.२२.१०.२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज नामंजूर केल्याचे कळविले नाही. त्यांनी मनीऑर्डरद्वारे पाठविलेले माहितीपोटीचे शुल्क रक्कम रु.२५/- स्वीकारुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही अथवा ती मनीऑर्डरही त्यांना परत केली नाही.या प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनीही त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपिलामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे फेरफार क्र.६०१ रद्द करण्याबाबत श्री.सुर्यभान शंकरराव रंधे व श्री.विलास गंगाराम रंधे, रा. मुधलवाडी यांच्या दि. १८.०८.२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर दि. २६.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रु.२५/- ची मनीऑर्डर सादर केली होती.अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.११.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे कारण दर्शवून ती माहिती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील प्रश्नार्थक स्वरुपाच्या माहितीशिवाय उर्वरित माहिती आठ दिवसांच्या आत पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी मनीऑर्डरद्वारे त्यांनी पाठविलेल्या शुल्काच्या संदर्भात आयोगास असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी या शुल्काच्या संदर्भात काहीही कळविलेले नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रु.२५/- मनीऑर्डर पाठविल्याचे व ती तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्याने स्वीकार केल्याचा पुरावा आयोगास सादर केला. यावरुन अपिलार्थीची रु.२५/- इतक्या किंमतीची मनीऑर्डर तहसीलदार यांच्या कार्यालयात दि.२६.१०.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे

नाकारले व त्यानंतरही अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती द्यावयाची हे त्यांना अवगत न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ८ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. या ८ मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ व ३ अंशतः वगळता उर्वरित सर्व मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे, जी अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती, ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, तीच माहिती त्यांना आहे त्या स्वरुपात अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दलची कारणे वा स्पष्टीकरणे विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दल अर्जदारास अशाप्रकारची स्पष्टीकरणे देणे मूळात अभिप्रेत नसल्याने अपिलार्थीस या अधिनियमाप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व ३ अंशतः वगळता उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ द्वारे श्री. सुर्यभान रंधे व विलास रंधे यांचा फेर क्र.६०१ ची नोंद कमी करण्याचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना कोणत्या तारखेस प्राप्त झाला,ही माहिती विचारली आहे, ती जरी सकृतदर्शनी प्रश्नार्थक स्वरुपाची असली तरी ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. कारण यामध्ये संबंधित अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेला अर्ज व त्यावर त्यांच्या कार्यालयाने हा अर्ज ज्या दिवशी प्राप्त झाला त्या दिवसाची नोंद घेतलेली संबंधित लिपीकाची सही असलेली प्रत जर अपिलार्थीस पाठविली असती तर अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती प्राप्त होऊ शकली असती. केवळ अपिलार्थीने विचारलेल्या मुद्यापुढे प्रश्नचिन्हाचा वापर केला, म्हणून अशाप्रकारची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची व त्यामुळे ती देय होत नाही, ही जन माहिती अधिकारी यांची भूमिका चुकीची आहे. इत:पर अपिलार्थीने मागणी केलेली

माहिती जरी प्रश्नार्थक स्वरुपाची सकृतदर्शनी वाटत असली तरी ती माहिती ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे, त्या अभिलेखांच्या प्रती देण्याच्या दृष्टीने अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांनी कार्यवाही करावी व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कार्यवाही करावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे. म्हणजे अर्जदारास जास्तीत जास्त माहिती प्राप्त होऊ शकेल.अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात केवळ अपिलार्थीने, "काय कार्यवाही केली आहे ?" ही माहिती विचारली म्हणून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही. या मुद्याच्या संदर्भात देखील वर नमूद केलेल्या सूचना लागू होत आहेत. अर्जदाराने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यानंतर त्यावर संबंधित अधिकारी वेगवेगळया प्राधिकरणाशी संपर्क साधतात आणि त्यांच्या कार्यालयात त्या अर्जाची नोंद घेऊन त्या अर्जावर पुढील प्रक्रिया अभिलेख्याव्दारे अथवा पत्रव्यवहाराद्वारे पार पाडता येतात. त्यामुळे त्यांनी या प्रकरणी देखील अपिलार्थीने संदर्भित केलेल्या श्री. सुर्यभान रंधे व विलास रंधे यांच्या दि. १८.०८.२००७ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सर्व संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व यासंदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या नोंदीच्या प्रती त्यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे वरीलप्रमाणे केलेले विश्लेषण पाहता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस मुद्दा क्र.१ व मुद्दा क्र.३ अंशत: (वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे) ही माहिती देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने आयोगाकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रु.२५/- इतक्या रकमेची मनीऑर्डर केल्याचा सबळ पुरावा दाखल केला आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने माहितीसाठीच्या शुल्कापोटी त्यांच्या कार्यालयाकडे पाठविलेली मनीऑर्डर निश्चितपणे कोणत्या कर्मचाऱ्याने स्वीकारली आहे व ही रक्कम त्यांनी शासकीय कोषागारात जमा केली आहे

किंवा कसे, याचा कसोशीने शोध घ्यावा व जर ही रक्कम त्यांनी शासकीय कोषागारात जमा केली असेल तर त्यांच्या कार्यालयीन खर्चामधून अपिलार्थीकडून या प्रकरणी त्यांनी स्वीकारलेली रु.२५/- इतकी शुल्काची रक्कम त्यांना हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत परत करावी. जर संबंधित कर्मचाऱ्याने अपिलार्थीकडून प्राप्त झालेली मनीऑर्डरची रक्कम शासकीय कोषागारात जमा केली नसेल तर त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी व तसा अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित होताच साठ दिवसांच्या आत सरळ सादर करावा.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि.२२.१०.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी सकारात्मक कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**अपील क्रमांक ७५५/०८**:

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमान्वये त्यांनी दि. ०९.०३.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, त्यांना दि.०७.०५.२००७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार देखील जन माहिती अधिकारी यांनी सात दिवसांच्या आत माहिती दिली नाही. अधिनियमातील कलम ७(६) च्या तदतुदीनुसार माहिती अधिकाऱ्यास तीस दिवसांच्या मुदतीनंतर मोफत माहिती देण्याची तरतुद असतानाही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने माहिती अधिकारी तथा तहसीलदार,पैठण हे दंडास तसेच शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र आहेत. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी निकाल आदेशात अशाप्रकारची कारवाई करण्यापासून तहसीलदार,पैठण यांना वगळले आहे.त्यामुळे संबंधित लिपीक, अव्वल कारकुन, तहसीलदार यांना अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे शास्ती लावावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०३.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे तलाठी सजा पिंपळवाडी येथील तलाठयासंबंधी एकूण ५ मुद्याद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संबंधित तलाठयाचे संपूर्ण नाव, कार्यालयीन कामकाजाची वेळ,पत्ता,नियुक्त तलाठयास सजेच्या ठिकाणी राहाणे बंधनकारक आहे काय, नसल्यास त्याची कारणे व त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली,तलाठी सजा पिंपळवाडी यांच्या अधिपत्त्याखालील संबंधित गावांना तलाठी सजा पिंपळवाडी यांनी भेट देण्यासाठी नेमलेला साप्ताहिक तथा पाक्षिक तथा मासिक वार व वेळ कोणती आणि त्यांनी जानेवारी, २००७ मध्ये दिलेल्या भेटी संदर्भातील तपशील - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तलाठी सजा पिंपळवाडी यांच्याशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्या दि.१२.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती संबंधित तलाठी सजा यांच्याकडून घेण्याचे सूचित केले. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०४.२००७ रोजी आपला निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले व चुकीचे पत्र सादर करण्यास जबाबदार असलेल्या संबंधित लिपीक/अव्वल कारकून/नायब तहसीलदार यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करावी, अशा सूचना पारित केल्या. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांच्या विनंतीप्रमाणे युक्तिवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे

अवगत केले की, अपिलार्थीने माहितीची मागणी करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी या पदावर श्री. माधव निलावाड (सध्या तहसीलदार,गेवराई,जि.बीड) व श्री. शरद कुलकर्णी (नायब तहसीलदार सध्या सेवानिवृत्त) हे अधिकारी कार्यरत होते. अपिलार्थीस माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १४.०५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क रु.२०/- इतके भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्याने अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाकडून माहिती पुरविली गेली नाही. तथापि आता ते अपिलार्थीस ही माहिती तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जरी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागितली होती, तरी त्या माहितीचे स्वरुप पाहता, ती माहिती त्रयस्थपक्षाकडून परस्पर प्राप्त करुन घेण्याचे सूचित करण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती सर्वथा गैर आहे. तलाठी यांचे वरिष्ठ म्हणून तहसीलदार यांची नेमणूक झाली आहे, त्यामुळे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे एखाद्या अधिकाऱ्याच्या हाताखालील कर्मचाऱ्याचे नाव व पत्ता ही माहिती सहजपणे उपलब्ध असणे अनिवार्य आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तलाठयाचे नाव व पत्ता याबाबतची माहिती त्यांच्या दि.१२.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे न कळविता, ही माहिती संबंधित तलाठयाकडून प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे कशाप्रकारे उल्लंघन करीत आहेत, याचे पुरेपूर दर्शन होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मर्यादित व स्वरुप हे इतके सरळ व सोपे होते की, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही विशेष श्रम घेणे गरजेचे नव्हते, किंबहुना ही माहिती जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस एक दिवसाच्या आत सहज पुरवू शकले असते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केलेली नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.०७.०५.२००७ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीस एका पृष्ठाची माहिती देण्यास रु.२०/- इतके शुल्क भरण्याचे

सशुल्क माहिती देण्याचा अनुज्ञेय कालावधी व्यपगत झाल्यानतंर कळविले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अपिलार्थीस माहिती उघड करण्यासाठीचा त्यांचा नकारात्मक दृष्टीकोन स्पष्ट करते, असे आयोगाचे मत आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी व या प्राधिकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) प्रमाणे 'माहिती अधिकारी' समजावे अशी तरतूद आहे, यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने, हे सर्व कर्मचारी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. हे पाहता, सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक या सर्वांवर, एकत्रितपणे प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ अंशतः- "तलाठी सजा पिंपळवाडी येथे नियमित नियुक्त तलाठी हे पिंपळवाडी येथे राहतात काय?" व मुद्दा क्र.४ संपूर्ण व मुद्दा क्र. ५ मधील -"त्या ठिकाणी तलाठी सजा पिंपळवाडी यांनी जानेवारी,२००७ मध्ये भेटी दिल्या काय?" या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. ही माहिती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस देय होत आहे व ही माहिती अपिलार्थीस ३ दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अपील क्रमांक ७५६/०८**:

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यांनी मनीऑर्डरद्वारे पाठविलेले रु.२५/- हे जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.१०.२००७ रोजी प्राप्त होऊनही त्यांनी यासंबंधी कोणतीही कार्यवाही केली नाही, अशारितीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मनीऑर्डरचा गैरकायदेशीर वापर केला आहे

व जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०१.०२.२००८ रोजीच्या निर्णयाने व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२२.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी दि.०७.०५.२००७ रोजी दिलेल्या निर्णयासंबंधी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाबाबत एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने, ते विचाराधीन अपील मागे घेत असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

सदर अपील मागे घेण्याचे कारण अपिलार्थीस विचारले असता, अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली होती, अशाप्रकारची माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय नाही, हे त्यांना माहित नव्हते, म्हणून ते विचाराधीन अपील मागे घेत आहेत. अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित दि.२२.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्याद्वारे मागितलेल्या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या दि.०७.०५.२००७ रोजीच्या आदेशान्वये संबंधित लिपीक/अव्वल कारकून/

नायब तहसीलदार यांच्या विरोधात कोणती कारवाई प्रस्तावित केली आहे, ही माहिती अपिलार्थीस देय होत असल्याचे दिसून येत आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि.२२.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील त्यांनी लिपीक/अव्वल कारकून/नायब तहसीलदार यांच्यावर उपविभागीय अधिकारी यांच्या दि.०७.०५.२००७ रोजीच्या निर्णयाप्रमाणे केलेल्या कारवाईची माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची उपरोक्त तीनही अपिले, क्र. ७५४/०८, ७५५/०८ व ७५६/०८ अंशत: मान्य करण्यात येत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील क्र. ७५४/०८, ७५५/०८ व ७५६/०८अंशत: मान्य करण्यात येत आहेत.

२) अपील क्र. ७५४/०८ व ७५५/०८ च्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच अनुक्रमे आठ व तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) अपील क्र.७५६/०८ च्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ शी संबंधित निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अंशत: माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

४) अपील क्र. ७५४/०८ च्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीसाठीच्या शुल्कापोटी मनीऑर्डरद्वारे स्वीकारलेल्या

रक्कम रु.२५/- च्या संदर्भात वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही करुन आपला अहवाल हे आदेश निर्गमित होताच साठ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा.

५) अपील क्र. ७५४/०८ च्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

६) अपील क्र. ७५५/०८ च्या संदर्भात, सचिव (महसूल) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार एकत्रितपणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भाऊसाहेब सुर्यभान रंधे,रा.मुधलवाडी,पो.नारायणगाव,ता.पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,पैठण यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७५७
निर्णय दिनांक ०२-०७-२००९

१. श्री. इरपनवार सुरेश किष्टन्ना, : अपिलार्थी
ता.किनवट,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
वन परिक्षेत्र कार्यालय, माहूर, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक,
किनवट,जि.नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वनक्षेत्रपाल, माहूर,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागूनही, त्यांना आजतागायत जन माहिती अधिकारी यांनी कुठलीही माहिती न पुरविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या परिक्षेत्रामध्ये सन २००५ ते २००८ या कालावधीत होत असलेल्या व झालेल्या रोहयो, कामासाठी धान्य, संपूर्ण ग्रामीण योजना व महाराष्ट्र ग्रामीण योजना या योजनेखाली झालेल्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - प्रत्येक कामाच्या अंदाजपत्रकाची रक्कम, मजूरांचा दर, वाटप केल्याचा दिनांक व ठिकाण, कोणासमक्ष वाटप केले, वाटप केलेल्या ठिकाणाचे नाव, हजेरीपत्रक व मोजमापपुस्तिका व प्रशासकीय मान्यता प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती स्पीड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०४.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२५,०००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दि.११.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे या शुल्काच्यासंबंधी काही तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीस अपेक्षित माहिती संदर्भात कोणतेही पत्र प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.०३.२००८ रोजी आपला निर्णय पारित केला. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीस वनक्षेत्रपाल, माहूर यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत. त्यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. संबंधित जन माहिती अधिकारी श्री. देशमुख हे सध्या मांडवी येथे कार्यरत आहेत. या प्रकरणी सहायक वनसंरक्षक,किनवट यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यांना आता ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार योग्य ती कारवाई व्हावी.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी आज आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम,अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती

विस्तृत प्रमाणाची आहे. अपिलार्थीच्या दि.१०.१२.०२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी तो चुकीचा आहे, कारण अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवितांना, या शुल्काचा संपूर्ण तपशील उदा. अंदाजित पृष्ठांची संख्या, माहिती पुरविण्यासाठी लावलेला प्रतिपृष्ठ दर, शुल्काची रक्कम कोणत्या शीर्षाखाली व कोठे भरावयाची इ.तपशील त्यांनी अपिलार्थीस कळविलेला नाही. एवढेच नव्हे तर, यासंदर्भात अपिलार्थीचे दि.११.०१.२००८ रोजीचे पत्रदेखील त्यांच्याकडे विनाकार्यवाही तसेच ठेवून घेतले. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.०३.२००८ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केल्यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही, असे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि.१२.०३.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.०२.२००८, दि.०५.०३.२००८ व दि.१०.०३.२००८ रोजी सुनावणी ठेवूनही जन माहिती अधिकारी हे सुनावणीस गैरहजर राहिले. एवढेच नव्हे तर, आज देखील आयोगासमोर सुनावणीस ते गैरहजर आहेत.अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यांनी त्यांच्याकडील दि.०४.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील कळविला नाही, तदनंतर अपिलार्थीच्या दि.११.०१ २००८ रोजीच्या पत्रास उत्तर दिले नाही, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर झालेल्या सुनावणीच्या वेळी सतत गैरहजर राहिले व आज देखील आयोगाकडील

सुनावणीस वीनापरवानगी गैरहजर राहून अपिलार्थीस ते माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे त्यांच्या अशाप्रकारच्या गैरहजेरीद्वारे ते सिध्द करीत आहेत.अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी हेतूपुरस्सर टाळल्याचे अशाप्रकारे सिध्द होत असल्याने ते अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी त्यांना देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी (श्री. देशमुख,सध्या मांडवी येथे कार्यरत) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

प्रसंगावशात जन अपिलीय अधिकारी यांचा दि. १२.०३.२००८ रोजीचा निर्णय पाहता, या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित न करता उलट अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय सदोष आहे. कारण अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टाद्वारे माहिती अपेक्षिली होती व त्यांनी याचसंदर्भातील जन माहिती अधिकाऱ्याच्या विरुध्द जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले होते. त्यामुळे याप्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेश देणे अधिक उचित ठरले असते. आयोगाच्या या अभिप्रायाची नोंद जन अपिलीय अधिकारी यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. देशमुख,सध्या मांडवी येथे कार्यरत) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

अपील क्रं. ७५७/०८

प्रत,

१. श्री. इरपनवार सुरेश किष्टन्ना,रा. पो.सरस्वती विद्या मंदिर परिसर,हनुमान मंदिराजवळ, किनवट,ता.किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, माहूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,किनवट,जि.नांदेड यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. देशमुख ,(सध्या मांडवी, जि.नांदेड येथे कार्यरत) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, माहूर, जि.नांदेड)

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७५८
निर्णय दिनांक ०२-०७-२००९

१. श्री. अशोक सर्जेराव देशमुख, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
उपअभियंता,नगररचना विभाग,
महानगरपालिका,औरंगाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक संचालक,नगररचना,
महानगरपालिका, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्रीमती शारदा नारायण पुतन

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.०२.२००८ रोजी सुनावणी घेऊनही त्यांना अद्यापपावेतो यासंदर्भातील कोणताही त्यांच्याकडून आदेश प्राप्त झाला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती शारदा नारायण पुतन यांच्या गट नं.८ नक्षत्रवाडी येथील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने सन १९९२-९३ साली मंजूर केलेल्या सूचित नकाशाची सत्यप्रत व ९ मीटर रस्ता सोडण्याबाबत दिलेल्या सन १९९२-९३ च्या संमतीपत्राची सत्यप्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१५.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने दि.१७.०१.२००८ रोजी या

शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला. यानंतर अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती प्राप्त झाली किंवा कसे, हे उपलब्ध कागदपत्रांवरुन ज्ञात होत नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना यांच्याकडे दि. ३०.०१.२००८ रोजी प्रथम अपील केल्याचे आढळून येत आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, सहायक संचालक,नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी या प्रकरणी दि.१२.०२.२००८ रोजी सुनावणी घेऊनही यासंदर्भातील आपला कोणताही आदेश पारित केलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.०१.२००८ रोजीच्या अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेणे योग्य राहील, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी लक्षात घेऊन अपिलार्थीच्या दि. ३०.०१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी विचारात घेऊन,अपिलार्थीच्या दि.३०.०१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक सर्जेराव देशमुख,१५, स्वानंदनगर,न्यु श्रेयनगर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,नगररचना विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७५९
निर्णय दिनांक ०२-०७-२००९

१. श्री. सुरेश दिगंबरराव देसाई, : अपिलार्थी
रा. चुडावा,ता.पूर्णा,जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
पूर्णा पाटबंधारे विभाग,वसमतनगर,
जि.हिंगोली.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड,जि.नांदेड

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपुरी व चुकीची माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ ते २००७ या कालावधीतील, "दि. ०२.०७.२००५ ते दि.३१.०३.२००७ पर्यंत झालेल्या कामांच्या एम.बी.च्या झेरॉक्स प्रती " ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१०.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.९,३६०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी या पत्रावर अपिलार्थीच्या दि.२२.१२.२००७ रोजीच्या अर्जाचा व मंडळ कार्यालयाच्या दि.१८.१२.२००७ रोजीच्या पत्राचा संदर्भ दिला, तथापि हा संदर्भ चुकीचा असल्याचे जन अपिलीय

अधिकारी यांनी त्यांच्या दि.०७.०४.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि.०१.०२.२००८ रोजी शुल्काचा भरणा केला. तदनंतर दि.०८.०२.२००८ रोजी माहिती हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व ती चुकीची व अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२८.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०४. २००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत उर्वरित माहिती विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये बऱ्याच पृष्ठांची पुनरुक्ती झाली आहे. तसेच त्यांनी ज्या कालावधीशी संबंधित माहिती मागितली आहे त्या कालावधीशी संबंधित माहिती न देता, त्यांना १९८४ सालची व इतर जुनी माहिती देण्यात आली व त्यांची दिशाभूल करण्याचा जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केलेला आहे. अपिलार्थीच्या विधानाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम,अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीच्या दि.०३.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जो प्रतिसाद अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यानी दि.०२.०६.२००७ रोजी अगर तत्पूर्वी अपिलार्थीस देणे अपेक्षित होते, तो त्यांनी दि.१०.०१.२००८ रोजी देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्राचे अवलोकन करता, या पत्रामध्ये त्यांनी अधिनियमातील

कलम ७(३)(क) प्रमाणे आवश्यक असलेल्या शुल्काचा तपशील दिलेला नाही. त्यामुळे व विहित कालावधीनंतर हे पत्र पाठविल्याने जन माहिती अधिकारी यांचे दि.१०.०१.२००८ रोजीचे पत्र अवैध सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केल्यास ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे.जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दि.१०.०१.२००८ रोजीचे पत्र अशाप्रकारे अवैध ठरत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य माहिती देय होत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना प्राप्त करुन घेतलेले माहितीपोटीचे शुल्क रु.९३६०/- इतके त्यांना अपिलार्थीस परत करावे लागेल. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या दि.०७.०४.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीचा व दिशाभूल करणारा पत्रव्यवहार केल्याचा निष्कर्ष काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या मताशी आयोग सहमत असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अचूक व सत्य माहिती देण्याच्या दृष्टीने, त्यांना असे आदेशित करण्यात येते की,अपिलार्थीस त्यांनी दि.०८.०२.२००८ रोजी पुरविलेली माहिती परत एकदा तपासून अपिलार्थीस आता त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे देय असलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांनी देणे बाकी आहे, ती सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी व याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून स्वीकारलेले शुल्क रु.९३६०/- इतके त्यांना परत करावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुन घेऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपेक्षित माहिती पुरविली नाही. एवढेच नव्हे तर,जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०७.०४.२००८ रोजीच्या निर्णयानुसार अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेशित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. व्यवहारे, कार्यकारी अभियंता,पूर्णा पाटबंधारे प्रकल्प, वसमतनगर, जि.हिंगोली) यांनी अपिलार्थीस माहिती न पुरवून स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस मुदतीत माहिती न दिल्याने व चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे सिध्द होत असल्याने, त्यांच्यावर

अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीनुसार,त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी देण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस मुदतीत माहिती न देता चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने, त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास व चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली देय असलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना माहिती पुरविण्यापोटीचे स्वीकृत केलेले शुल्क रु.९३६०/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत परत करावे.

४) जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देसाई सुरेश दिगंबरराव, मु. पो.चुडावा, ता.पूर्णा,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७६०
निर्णय दिनांक ०२-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. पठाण मोबीन महेबुब खान,<br>ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, सिल्लोड, जि.औरंगाबाद | | |
| प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | उपमुख्याधिकारी,<br>नगर परिषद, सिल्लोड,<br>जि.औरंगाबाद |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील विहित मुदतीत त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.त्यांच्या अशाप्रकारच्या अभिप्रायाबरोबरच त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मालमत्ता क्र.३/२४८ व नगर परिषदेकडील मागणी नोंदवहीतील क्र.४२७ या मालमत्ता करासंबंधी एकूण ५ मुद्यावर प्रमाणित नकलेच्या स्वरुपात माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संदर्भित मालमत्तेचे एकूण क्षेत्रफळ, बांधकाम करण्यात आलेले

एकूण क्षेत्र, मालमत्ता कर म्हणून आकारण्यात आलेली रक्कम, यापैकी भरणा केलेल्या कराची रक्कम व मालमत्तेची कर थकबाकी याबाबतची वर्षनिहाय माहिती"- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती दि.०१.०४.१९९८ ते दि.३१.०३.२००८ या कालावधीशी संबंधित अशी मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०१.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा दि.०७.०२.२००८ रोजी केला व त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२६.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०४.२००८,२५.०४.२००८ व १२.०५.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. त्यापैकी एकाही सुनावणीस अपिलार्थी हे हजर राहिले नाहीत, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि.१२.०५.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील फेटाळले. अपिलार्थीचे सदर अपील फेटाळताना अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती दि.०७.०२.२००८ रोजी दिला असल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला होता.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.०२.२००५ रोजी आवश्यक ती संपूर्ण माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०७.०२.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता ती अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जातील मागणीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात कोणतेही भाष्य अथवा कोणतेही अभिप्राय व्यक्त केलेले नाहीत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेतली नसल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२६.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि.२१.०४.२००८ रोजी प्रथमतः सुनावणी ठेवली होती व तसेच तदनंतर दि.२५.०४.२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस हजर राहण्याची संधी देऊनही ते सुनावणीस हजर राहिले नाहीत,त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.०५.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित केला आहे. या निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस देखील दिली आहे. येथे, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करण्याच्या वेळेपर्यंत जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नव्हती, हे उपलब्ध कागदपत्रांवरुन सिध्द होत आहे.सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या कालमर्यादेमध्ये अपील निर्णय पारीत करावा.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता पूर्ण माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पठाण मोबीन महेबुब खान,जुनी बाजार पट्टी, सिल्लोड,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्याधिकारी,नगर परिषद कार्यालय, सिल्लोड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९८६
निर्णय दिनांक ०२-०७-२००९

१. श्री. मुन्नवर अहेमद नईम अहेमद, रा.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,औरंगाबाद : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश निर्गमित केले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०४.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जियाउल उलुम गर्ल्स हायस्कूल,औरंगाबाद या शाळेची सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात शालेय पोषण आहारासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विहित केलेल्या कालावधीमध्ये प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले आहे.तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, त्यांच्या दि.०९.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे आयोगास इष्ट वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०९.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

३) अपील निकाली काढण्यात येत आहे.

४) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुन्नवर अहेमद नईम अहेमद,द्वारा श्री.अब्दुल माजीद, प्लॉट नं.४० न्यु एस.टी.कॉलनी, कटकट गेट, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७३१
निर्णय दिनांक ०२-०७-२००९

१. श्री. जी. नारायण दस्तया वझरकर, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
नुरसिंग राठोड माध्यमिक विद्यालय,लिंगी
ता.किनवट,जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष/सचिव,
साई शिक्षण संस्था, लिंगी, ता.किनवट,जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : सौ.प्रतिभा नारायण निळकंठवार (वझरकर)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००७ रोजी नोंदविलेले (दि.१३.०५.२००८ रोजी फेरसादर केलेले) द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष सौ.प्रतिभा नारायण निळकंठराव (वझरकर) यांचे नेमणूकपत्र, हजेरीपत्रक, संचमान्यता, शाळेला १०० टक्के अनुदान प्राप्त झालेले पत्र, मान्यतापत्राची व सर्व्हीसबुकची नोंद इत्यादी प्रतींची मागणी केलेली होती. अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये त्यांना कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे, याचा उल्लेख केलेला नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी

तथा अध्यक्ष/सचिव, साई शिक्षण संस्था लिंगी ता.किनवट,जि.नांदेड यांच्याकडे दि.११.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही निर्णय न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे माहितीसाठीचा प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज दाखल केल्यासंदर्भात कोणताही पुरावा जोडलेला नाही. त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाच्यासंदर्भात आयोगास कळविले आहे की, त्यांनी सर्व संबंधितांना सर्व कागदपत्रे यु.पी.सी.द्वारे पाठविले आहेत. तथापि यासंदर्भात अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगची पोष्टाच्या पावतीची छायांकित प्रत देखील अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेली नाही. अशाप्रकारे आयोगास निर्णय घेण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन न दिल्यामुळे व आजच्या सुनावणीस विनापरवानगी गैरहजर राहिल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील, आवश्यक त्या पुराव्याअभावी फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जी.नारायण दस्तया वझरकर,पाटील निवास पारसनगर,पो.बॉक्स नं.२०९, पो.शिवाजीनगर,नांदेड -४३१६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,नुरसिंग राठोड माध्यमिक विद्यालय,लिंगी ता.किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३.	जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव,साई शिक्षण संस्था, लिंगी, ता किनवट, जि. नांदेड यांना या  निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७३२
निर्णय दिनांक ०२-०७-२००९

१. श्री. प्रकाश ग्यानोबा वाघमारे, : अपिलार्थी
ता.किनवट,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
पुरवठा विभाग,
तहसील कार्यालय,किनवट ता.किनवट,
जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,किनवट,
जि.नांदेड.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,किनवट,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १८.०७.२००७ रोजी नोंदविलेले, औरंगाबाद खंडपीठाकडे दि. २१.०५.२००८ रोजी फेरसादर झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि.३०.०६.२००९ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, पूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०५.२००८ रोजी त्यांचे द्वितीय अपील फेर सादर केले होते. अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर आवश्यक

ती माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते व आज रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीने स्वतः त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली आहे. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील क्र.२७३२/०७, दि.१८.०७.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रकाश ग्यानोबा वाघमारे,द्वारा श्री. शेळके यांचे राहते घर,दत्तनगर (गोकुंदा) ता.किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७३३
निर्णय दिनांक ०२-०७-२००९

१. सौ. शोभा दादासाहेब पठाडे, : अपिलार्थी
रा.पैठण जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगरपरिषद,पैठण,जि.औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०४.२००८ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थीचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीच्या प्रतिनिधीने, त्यांचे दि.०२.०७.२००९ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने, ते आयोगाकडे केलेले द्वितीय अपील मागे घेत आहेत व या संबंधी त्यांची कोणतीही तक्रार नाही.

खुद्द अपिलार्थी आयोगाकडील विचाराधीन उपरोक्त अपील मागे घेत असल्याने सदर

अपील खारीज करण्यात येऊन  खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील क्र.२७३३/०७, दि.०३.०४.२००८ खारीज येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०२-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. शोभा दादाराव पठाडे,'आशिर्वाद', माधवनगर,पैठण जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगरपरिषद,पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या  निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६५६

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

१ श्री. आसाराम शामराव पुरुळे, : अपिलार्थी
मु. पो. साठेनगर, परतूर, तालुका परतूर,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी,
तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही व त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात आदेश निर्गमित केले नाहीत. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ ते २००८ या कालावधीमध्ये केलेल्या रोजगार हमी योजने अंतर्गत घनसावंगी तालुक्यातील कामांची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गावतलाव, पाझर तलाव यांच्या क्रमांकासह मजूरांच्या हजेरीपत्रकाची सत्यप्रत, मस्टरच्या सत्यप्रती व तलावाच्या अंदाजपत्रकाची किंमत, त्यातील कुशल व अकुशल काम किती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती जास्त स्वरुपाची असल्याने माहिती देण्यासाठी जास्त दिवस लागणार आहेत, असे कळविले. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे व आयोगाने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी हे पत्र पाठविल्याचा पुरावा मागितल्यानंतर जन माहिती अधिकारी यांना असा कोणताही पुरावा आयोगास आज रोजी सुनावणीच्या वेळी सादर करता आला नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०३-२००८ रोजीचे पत्र पाठविले नसावे असे अनुमान काढण्यास हरकत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय पारित केला नाही. मात्र त्यांनी दिनांक २७-०५-२००८ रोजीची अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील सुनावणी रद्द करण्यात येत असल्याचे त्यांचे दिनांक २७-०५-२००८ रोजीचे पत्र अपिलार्थीने आयोगास उपलब्ध करुन दिले आहे. यावरुन अपिलार्थीच्या दिनांक १६-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी झाली नसल्याचे सिध्द होतआहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. आसाराम शामराव पुरुळे, मु. पो. साठेनगर, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६५७

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

१ श्री. चंद्रकांत बी. के. : अपिलार्थी

साठेनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी,

तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ व वेळकाढूपणा केला तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुनही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे राबविल्या जाणा-या रोजगार हमी योजनेअंतर्गत एप्रिल २००७ या महिन्यामध्ये कोदळा पाझर तलाव क्रमांक २, आरगडे गव्हाण पाझर तलाव क्रमांक ३ व

४, हातडी पाझर तलाव २, तसेच अवलगांव पाझर तलाव  क्रमांक ३, मंगुजळगांव पाझर तलाव ४, चिंचोलीवाडी पाझर तलाव २, देवनगरतांडा पाझर तलाव क्रमांक १, ढाकेफळ पाझर तलाव क्रमांक ७, या कामावर उपस्थित असलेल्या मजुरांच्या हजेरीपत्रकाची प्रत, धान्य वाटप व कुपन रजिस्टरची प्रत व मोजमाप पुस्तिकांच्या छायांकीत प्रती याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही.  त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी  न ठेवल्याने  अथवा यासंदर्भात कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी  यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कोणताही युक्तिवाद केला नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या दिनांक १५-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या प्रकरणी प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय होणे आयोगास आवश्यक वाटते.  सबब, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत बी. के. साठेनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६६०

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : १. श्री. जाधव पी. डी.
२. कुमारी जाधव एस. बी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे माहिती मागितली असता त्यांनी माहिती न दिल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे श्री. जाधव पी. डी. व कुमारी जाधव एस. बी. यांच्या मान्यतेसंदर्भात व या अनुषंगाने इतर काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्याकडे प्राप्त झाला. उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी होऊनही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या मान्यतेसंदर्भात संबंधित शिक्षण संस्थेकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली इतर देय माहिती या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे त्यांना भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या या प्रकरणी त्यांच्या दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली " ..... मान्यता देण्यात आली काय ? " ही माहिती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली " .....मान्यता देण्यात आली आहे काय ? " ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत त्यांना उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६६१

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
पंचायत समिती, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा,
तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवले. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील अर्ज राज्य माहिती आयोगाकडे सादर केला आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज सादर केल्याचा कोणताही पुरावा त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तसेच त्यांनी त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाच्या व व्दितीय अपील अर्जाबरोबर जोडलेल्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीवरुन संबंधितांना मूळात अपिलार्थीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज प्राप्त झाला आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास काहीही मार्ग नाही. यासंदर्भात वस्तुस्थिती स्पष्ट करुन देण्यासाठी अपिलार्थी देखील आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, तालुका पूर्णा जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७६२

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

१ श्री. जगदीश केशरचंद अग्रवाल, : अपिलार्थी
मु. पो. झाकीर हुसेन नगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे आयडिया व टाटा इंडिकॉम कंपनीच्या आऊट गोईंग कॉल्सची डिटेल्स मिळण्याकरिता मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती उपलब्ध नाही अशी चुकीची माहिती दिली. या प्रकरणात त्यांनी अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापही माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे हे अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे असेही नमूद केले आहे की, पोलीस अधीक्षक कार्यालयात त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध असून सुध्दा हेतुपुरस्सर कॉल डिटेल्सची माहिती जन माहिती अधिकारी जाणुनबुजून देत नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सिल्लोड शहर पोलीस ठाणे येथे गुन्ह्याची नोंद असलेल्या बहिणीच्या तपासासाठी व न्यायालयीन कामाकरिता त्यांच्या कार्यालयाची दोनही कंपन्यांना पत्रे मिळावे, अशी विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही हजर नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-०१-००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाचे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यासाठीचे पत्र मिळण्याची विनंती केली. या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही विशिष्ट स्वरुपाची माहिती न मागता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून आयडिया व टाटा इंडिकॉम या कंपन्यांना पत्र लिहिण्याची विनंती केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे तीच अर्जदाराने त्यांच्याकडे मागणे अपेक्षित आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती न मागता त्यांच्याकडे त्यांचे काम करण्याची विनंती केली

आहे. हा विनंती अर्ज, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'माहिती 'चा विषय होऊ शकत नाही. त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज या प्रकरणी अवैध ठरत आहे. परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही.

उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिल्याचे आढळून येत आहे. मात्र अपिलार्थीच्या दि. ०१-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाकडे जन अपिलीय अधिकारी यांनी पूर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण) यांच्याकडे दिनांक ०१-०२-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तीस दिवसाच्या आत अथवा अपवादात्मक परिस्थितीत पंचेचाळीस दिवसाच्या आत निर्णय घेणे अपेक्षित असतांना, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन केलेल्या उपेक्षेकडे आयोगास दुर्लक्ष करता येणार नाही. सबब सचिव (गृह) यांना संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची यथायोग्यरित्या दखल घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्जच अवैध ठरत असल्याने, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जगदीश केशरचंद अग्रवाल, मु. पो. झाकीर हुसेन नगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७६३

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

१ श्री. बबनराव सत्ताजी आष्टुरकर, : अपिलार्थी

" त्रिमुर्ती " सुंदर नगर, कैलास ड्रायक्लीनर्स शेजारी,

नागेश्वरवाडी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तहसील कार्यालय, परभणी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे त्यांच्या जावक क्रमांक २००७/जमा-१/कावि-३८७, दिनांक ३१-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सादर केलेल्या अहवालावर त्यांनी केलेली कार्यवाही, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जाबरोबरच रजिस्टर्ड पाकिट तिकिट लावून सोबत जोडले असल्याचे नमूद कले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे त्यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी प्रथम अपील अर्ज केला असता, त्यावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी हे विचाराधीन अपील सादर केले आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती वा अपिलीय अधिकारी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तथापि एवढे असूनही जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच या कार्यालयाचे अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने माहिती मागविली आहे व त्यांचा मूळ अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दिनांक २५-०१-२००८ रोजी प्राप्त झाल्याची पोस्टाची पावती अपिलार्थीने आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना मिळाल्याचे सिध्द होत आहे.

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नसल्याने अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर त्यांनी विहित मुदतीत का कार्यवाही केली नाहीत याची कारणे आयोगास ज्ञात होऊ शकत नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय आहे. या सर्व बाबी पाहता जिल्हाधिकारी, परभणी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, परभणी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बबनराव सत्ताजी आष्टुरकर, " त्रिमुर्ती " सुंदर नगर, कैलास ड्रायक्लीनर्स शेजारी, नागेश्वरवाडी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७६४

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. शालिनी बापुराव रणदिवे<br>तर्फे, मुखत्यारआम बापुराव शेटीबा रणदिवे,<br>९/४९ नालंदा निवास, भिमनगर, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक भूमि अभिलेख, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : १. श्रीमती लक्ष्मीबाई विश्वनाथ डोंगरे
२. श्री. राजेंद्र फुलचंद बनसोडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित वेळेत माहिती उपलब्ध झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध झालेली माहिती अर्धवट व चुकीची आहे आणि अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये अपिलार्थीस मागणी केलेली माहिती पुरविण्यासंदर्भात कोणताही उल्लेख केला नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे उस्मानाबाद येथील नगर भूमापन क्रमांक ३०९४, ३०९५ व ३०९६ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. राजेंद्र फुलचंद बनसोडे यांनी दिलेल्या दिनांक ०१-०३-२००६ रोजीच्या अर्ज प्रकरणाशी संबंधित नमुना नंबर ९ ची नोटीसीची व नोटीस प्रसिध्द पंचनाम्याची नक्कल व श्री. राजेंद्र बनसोडे यांच्या मोजणी अर्जाची प्रत व मोजणी फी भरणा केलेल्या चलनाची प्रत ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०१-२००८ रोजी आदेश पारित करुन या आदेशाव्दारे अपिलार्थीचे प्रथम अपील मंजूर केले. तथापि या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केल्याचे आढळून येत नाही. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाचे अवलोकन केले असता दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अर्धवट व चुकीची आहे असे वाटल्यावरुन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी ते स्वत: अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील माहितीसाठीच्या अर्जासंदर्भातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी उदासीन वृत्ती दाखविली असे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या निर्णयामध्ये स्पष्ट केले आहे. त्यामुळे या प्रकरणी संबंधित जन

माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईसाठी निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, उस्मानाबाद (दिनांक ०३-११-२००७ रोजी व तदनंतर ३० दिवसाच्या कालावधीपर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अर्धवट व चुकीची आहे असे म्हटले आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची आणि दिशाभूल करणारी कशी आहे यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा अथवा त्यांचे लेखी म्हणणे आयोगास सादर केलेले नाही हे पाहता आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे हा त्यांचा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे. मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही, हे जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम २० (२) नुसार करावयाच्या कारवाईची शिफारस जमाबंदी आयुक्तांना करण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, उस्मानाबाद (दिनांक ०३-११-२००७ रोजी व तदनंतर ३० दिवसाच्या कालावधीपर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत

सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **औरंगाबाद** | **( वि. बा. बोरगे )** |
| **दिनांक ०३-०७-२००९** | **राज्य माहिती आयुक्त** |
| | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१ सौ. शालिनी बापुराव रणदिवे तर्फे, मुखत्यारआम बापुराव शेटीबा रणदिवे, ९/४९ नालंदा निवास, भिमनगर, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, साधुवासवाणी, चौक, रेल्वेस्टेशन जवळ, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७६५

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

१ श्री. डी. एस. सदाशिव शेट्टी, : अपिलार्थी

प्लॉट क्रमांक ए-४, अरिहंतनगर, आकाशवाणीमागे,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नगर रचना अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सहायक आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता विचाराधीन अपिलासारख्याच या प्रकरणाशी संबंधित इतर ६४ अपिलांच्यासंदर्भात आयोगाने दिनांक ०४-०९-२००८ रोजी निर्णय दिलेला आहे. विचाराधीन प्रकरणी व दिनांक ०४-०९-२००८ रोजी निर्णय दिलेल्या प्रकरणी अपिलार्थीने माहितीसाठीचा केलेला प्रथम अर्ज व त्यावर केलेले प्रथम अपील हे एकाच दिनांकास व एकाच माहितीकरिता केले असल्याने अपिलार्थीस आयोगाचा दिनांक ०४-०९-

२००८ रोजीचा निर्णय या प्रकरणी तंतोतंत लागू होत आहे, हे पाहता, विचाराधीन प्रकरणी खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील नोटिशीच्या प्रती हा भाग वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. डी. एस. सदाशिव शेट्टी, प्लॉट क्रमांक ए-४, अरिहंतनगर, आकाशवाणीमागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७६६

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

१ श्री. सुनिल विनायकराव मगर, : अपिलार्थी
राजमाता जिजाऊ चौक, ढोकी रोड, कळंब,
तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब, तालुका कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०४-२००८ रोजी फेर नोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी जाणुनबुजून त्यांचे प्रथम अपील फेटाळले, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक १, २ व ४ च्या संदर्भात अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली गेली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६ ते २००७ या कालावधीतील कामे वाटप व ना हरकत प्रमाणपत्राविषयी एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०५-२००७ व दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २८-०६-२००७ रोजी निर्णय देऊन, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिल्याचा निष्कर्ष काढून अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, विशेषतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १०-०५-२००७ रोजी पुरविण्यात आलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्येक मुद्दयावर शासनाच्या निर्णयाची प्रत मागितली होती. तथापि अशा प्रकारे शासनाच्या निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. तसेच मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात कोणतीही माहिती दिली नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्याकडे टॉवर उभारण्यासाठी कोणत्याही मोबाईल कंपनीने ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली नाही. या प्रकरणी शासनाचे कोणतेही आदेश त्यांना प्राप्त झाले नाहीत. वास्तविकतः ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या पत्रामध्ये समाविष्ट केली असती तर

अपिलार्थीस किमान त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील सर्व मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली गेली असे म्हणता आले असते. तथापि अपिलार्थीच्या या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये कोणतेही भाष्य केलेले नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती यांचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो संबंधीत शासनाच्या निर्णयाची प्रत आणि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या मूळ पत्राव्दारे दिलेली माहिती अपूर्ण असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी वर स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी व्यक्तिशः उपस्थित राहून हस्तगत करुन घ्यावी लागेल. हा कालावधी व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही.

अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुनिल विनायकराव मगर, राजमाता जिजाऊ चौक, ढोकी रोड, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७६७

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

१ श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानीवार, : अपिलार्थी
वेलमापुरा, वॉर्ड नं. ८, किनवट - ४३१ ८०४,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, (रोहयो), इस्लापूर,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक वनसंरक्षक, रोहयो, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वनक्षेत्रपाल, (रोहयो), इस्लापूर, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०३-२००८ रोजी फक्त कामाची यादी करुन दिली असून पूर्वीचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी कार्यभार हस्तांतरीत केला नसल्याचे सांगून माहिती देण्यास टाळाटाळ केली, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाकडील सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधीत, त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कामाविषयी एकूण २१ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०३-२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस दिनांक २०-०३-२००८ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०३-२००८ रोजी दोन पृष्ठांची माहिती पुरविली. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आश्वासीत केले. जन अपिलीय अधिकारी यांना आश्वासीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती का पुरविली नाही याची कारणे विचारली असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, ते या पदावर रुजू होण्यापूर्वी श्री. कदम नावाचे वनक्षेत्रपाल हे या पदावर कार्यरत होते. त्यांची बदली झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता लागणारे अभिलेखे त्यांच्याकडे हस्तांतरीत न केल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती विस्तृत अशी आहे. तथापि एवढे जरी असले तरी अपिलार्थीने मागणी

केलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतरही दोन महिन्याच्या कालावधीत ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे जन माहिती अधिकारी यांना अशक्य होते अशातली कोणतीही बाब या प्रकरणी येथे संभवत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०३-२००८ पूर्वी माहिती देण्याचे त्यांच्याकडील दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या आदेशाव्दारे आदेशित केले होते. तथापि या आदेशानंतरही एक वर्षाहून जास्त कालावधी ओलांडून गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुरवू शकले नाहीत ही वस्तुस्थिती दुर्लक्षित करुन चालणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त एका मुद्दयावरील माहिती दिली आहे. उर्वरित २० मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काहीही कळविले नाही हे पाहता व तसेच अपिलार्थीने माहितीची मागणी केल्याचा दिनांक व त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर करेपर्यंत व्यपगत झालेला पाच महिन्याचा कालावधी लक्षात घेता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली आहे असे म्हणण्यास भरपूर वाव आहे. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तात्काळ अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविणे अभिप्रेत होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची तसदी घेतली नाही. या संपूर्ण घटनाक्रमाचे अवलोकन केल्यानंतर, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करुन त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्वतःच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याची आयोगाची खात्री झाली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या पूर्वीचे वनक्षेत्रपाल श्री. कदम (सध्या वन विभागाच्या पुणे येथील कार्यालयात कार्यरत) यांनी त्यांना पदभार हस्तांतरीत केला नाही. तेव्हा या प्रकरणी उप वनसंरक्षक, नांदेड यांनी लक्ष घालून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यामध्ये समन्वय साधावा व अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सध्याच्या जन माहिती अधिका-यामार्फत त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैली-तील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल प्रधान वनसंरक्षक, औरंगाबाद यांना, त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. प्रधान वनसंरक्षक, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. यादवराव मुकुंदराव नेम्मानीवार, वेलमापुरा, वॉर्ड नं. ८, किनवट - ४३१ ८०४, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, (रोहयो), इस्लापूर, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, रोहयो, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ प्रधान वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७६८

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

१ श्री. अशोक उत्तमराव खरे, : अपिलार्थी
व्दारा, आर. पी. घुगे, दत्त कॉलनी, कॉलेज रोड कन्नड,
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका, फातिमा इंग्लीश स्कूल, कन्नड,
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापही कोणतीही कार्यवाही न करता व त्यांनीही अपिलार्थीस माहिती उपलब्ध न करुन दिल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेकडील शाळेसंदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ हा त्यांच्या शाळेला लागू होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपासून वंचित राहावे लागले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी या प्रकरणी मागणी केलेली माहिती ही संबंधितांकडून लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याची विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आता त्यांच्या सोबत आणली असून अपिलार्थीस ती माहिती, त्या आठ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अशा प्रकारच्या खाजगी विना अनुदानित शाळांच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाने अपील क्रमांक १८४५/२००७ श्री. पठाडे विष्णू विरुध्द मुख्याध्यापिका, फातिमा हायस्कूल यासदंर्भात दिनांक १९-११-२००८ रोजी दिलेला निर्णय हा येथे उद्‌धृत करणे आयोगास गरजेचे वाटते.

" या प्रकरणी संबंधीत शिक्षण संस्थेने त्यांच्या दिनांक ०५-११-२००५ च्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्राव्दारे त्यांची संस्था खाजगी व विना अनुदानित असल्याने त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होत नसल्याचे प्रतिपादन केले आहे. संबंधीत

शाळेमध्ये इयत्ता पाचवी ते दहावी अशा सहा तुकड्या आहेत. सदर शिक्षण संस्था सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे यांच्याकडील नोंदणीकृत संस्था आहे. धर्मादाय आयुक्त या सार्वजनिक प्राधिकरणाचा भाग असलेल्या कार्यालयाला अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेता येते त्यामुळे अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीनुसार ही माहिती अपिलार्थीस देय ठरते. तसेच या शाळेला शासनाच्या शिक्षण विभागाने दिनांक १३-०७-२००० रोजी मान्यता दिलेली आहे. या शाळेतील विद्यार्थी शासनाचे पूर्ण नियंत्रण असलेल्या बोर्डाच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस नियमीतपणे बसत असतात. सदर माध्यमिक शालांत परीक्षा मंडळ संबंधीत शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेत असते. सदर शाळा तपासणीचे अधिकार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना आहेत, याचबरोबर शिक्षण उपसंचालकांनी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना उद्देशून लिहिलेल्या क्रमांक २७९६/०१, दिनांक ३०-०१-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, या पत्राव्दारे शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व अनुदानित व विनाअनुदानित खाजगी शिक्षण संस्थांची व संस्थांमध्ये नेमलेले जन माहिती अधिकारी, सहाय्यक जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची यादी मागितली आहे. यावरुन संबंधीत शिक्षण संस्थेवर शासनाचे पूर्णपणे नियंत्रण असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) (घ) (एक) चे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, या कलमामध्ये समुचित शासनाची मालकी असलेले, त्यांचे नियंत्रण असलेले निकाय माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण ठरते, त्यामुळे केवळ शासनाकडून अनुदान मिळत नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ आपल्याला लागू नाही, अशी झालेली संस्थेची धारणा ही चुकीची ठरते व संबंधीत संस्था हे सार्वजनिक प्राधिकरण ठरते. एकदा सार्वजनिक प्राधिकरण ठरविल्यानंतर संस्थेला माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील सर्व तरतुदी लागू होतात, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या प्रथम अर्जातील संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे उचित राहील." याही पेक्षा महत्वाचे हे आहे की या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती मुख्याध्यापकाकडे मागितली आहे.

वरील परिच्छेदाचे अवलोकन केले असता आणि विशेषत: जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती आठ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याची आजच्या सुनावणीमध्ये तयारी दर्शविली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक उत्तमराव खरे, व्दारा, आर. पी. घुगे, दत्त कॉलनी, कॉलेज रोड कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, फातिमा इंग्लीश स्कूल, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७३४

निर्णय दिनांक ०३-०७-२००९

१ श्री. उगले संजय तात्याबा, : अपिलार्थी
मु. पो. दहेगांव, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी, नांदुर मधमेश्वर कालवा,
उपविभाग क्रमांक ६, गंगापूर, मुख्यालय बोरदहेगांव,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील बोर दहेगांव मध्यम प्रकल्पाच्या संदर्भात काही माहिती

मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सन २००३ ते २००७ या कालावधीशी संबंधित असून त्यांनी ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १३-०६-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०४-२००७ रोजी माहिती दिल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. तथापि माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्याचे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांनी ज्यावेळी माहितीसाठी त्यांच्या कार्यालयात अर्ज केला त्यावेळी जन माहिती अधिकारी म्हणून श्री. डी. एन. डाके कार्यरत होते. सध्या त्यांची उपसा सिंचन विभाग, उस्मानाबाद येथे कार्यकारी अभियंता म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यामुळे अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याची कारणे ते आयोगास अवगत करुन देऊ शकत नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी खरोखरच माहिती दिली किंवा कसे हे कळण्यासाठी आयोगाने त्यांना पुरावा मागितला असता ते सदर पुरावा आयोगास सादर करु शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर अंदाजे पावणे दोन महिने इतक्या विलंबाने प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस निश्चितपणे ही माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या पुराव्याअभावी कळण्यास मार्ग नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोन करता ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या कथित माहितीवर अपिलार्थीने त्यांचे कोणतेही अभिप्राय आयोगास लेखी पत्राव्दारे कळविलेले नाहीत अथवा यासंदर्भात कोणताही युक्तिवाद करण्यासाठी ते हजर नाहीत, हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यास हरकत नसावी. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक ३०-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे कळविले होते. हे पत्र कार्यकारी अभियंता यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिनांक ३१-०५-२००७ रोजी पाठवून तीन दिवसाच्या आत माहिती सादर करण्याचे संबंधित उप अभियंता यांना सूचित केले. यावरुन अपिलार्थीस दिनांक ३१-०५-२००७ पर्यंत माहिती प्राप्त झाली नसल्याचे सिध्द होत आहे. मात्र उपस्थित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस दिनांक २४-०४-२००७ रोजी माहिती पुरविल्याचा दावा करीत आहेत. मात्र उपस्थित जन माहिती अधिकारी हे, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याची पोच पावती आयोगास दाखवू शकत नसल्याने, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पाठवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने दिलेला व वर नमूद केल्याप्रमाणे सकृतदर्शनी संशयास्पद दिसत असलेला प्रतिसाद देऊन संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. डी. एन. डाके) यांनी व अपिलार्थीस

माहिती देण्यासाठी त्यांना सहायक करणारे त्यांचे सर्व सहायक कर्मचारी / अधिकारी, ज्यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे, अशा सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (जलसंपदा) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक कर्मचारी / अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उगले संजय तात्याबा, मु. पो. दहेगांव, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७७१
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

१. श्री. सुनिलकुमार कल्याणमल भारुका, : अपिलार्थी
ता.कन्नड, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता,
औरंगाबाद पाटबंधारे विभाग,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. गोविंद पाटीलबा नागरे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जावर अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.०९.२००७ व दि. ११.१०.२००७ रोजी जाणूनबुजून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती, तो त्रयस्थ पक्ष श्री. गोविंद नागरे हे खाजगी केसकरिता न्यायालयात हजर

असताना त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या मस्टरवर स्वतःची हजेरी नोंदविली होती. त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई व्हावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे अपील दाखल करण्याचे कारण म्हणून या प्रकरणी,"कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग,औरंगाबाद यांची प्रत्यक्ष भेट घेतली असता त्यांनी अपिलार्थीस तोंडी सांगितले, हा आमचा संसार आहे,आम्ही श्री.गोविंद पाटीलबा नागरे यांना आमच्या संसारातून कसे उद्ध्वस्त होऊ देणार,"असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष-वरिष्ठ लिपीक श्री. गोविंद पाटीलबा नागरे यांच्याबाबत, "वरिष्ठ अधिकारी यांची फसवणूक करुन गैरफायदा केल्याबाबत" या विषयासंदर्भात, दि. ०१.०४.१९९६ ते १६.०८.२००७ या कालावधीतील माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे विचारली होती. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे - त्रयस्थ पक्ष श्री. गोविंद पाटीलबा नागरे, हे वरिष्ठ लिपीक ०१.०४.१९९६ पासून प्रथम लिपीकाचे वेतन व भत्ते उचलतात का ?. श्री नागरे हे मराठा वंजारी जातीचे असल्यामुळे त्यांनी आजपर्यंत जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी पथकाकडून का पडताळणी करुन घेतली नाही. नियमानुसार त्यांना ते बंधनकारक नाही का ? जर नागरे हे प्रथम लिपीकाचे वेतन व भत्ते घेतात परंतु हेतूपुरस्सर जात पडताळणीचे प्रमाणपत्र दाखल करीत नाही. तर त्यांनी दि.०१.०४.१९९६ पासून घेतलेले प्रथम लिपीकाचे वेतन त्यांच्याकडून कपात करण्यात येईल काय? नागरे यांची मागील पाच वर्षापासून औरंगाबाद व कन्नड येथे न्यायालयात धनादेशाची (कलम १३८ ची) केस चालू आहे. संबंधित वरिष्ठ लिपीक पाटबंधारे उपविभाग कन्नड येथे कार्यरत आहेत ते न्यायालयात हजर राहतात ते मात्र शासकीय दौरा दाखवुन हे योग्य आहे काय ? तरी न्यायालयात हजर असून देखील त्यांनी त्यांच्या अधिकाऱ्यांची परवानगी का घेतली नाही ? आजपर्यंत अनेकदा टुर दाखवून हे आपल्या स्वतःची कामे करीत राहतात. नगरपालिका, बँक,भाजीपाला व तसेच (वासडी) येथे मेडीकल दुकानावर बसलेले राहतात यांच्यावर वरिष्ठ अधिकारी साहेब हे पालन का ठेवत नाही ?, न्यायालयात हजर असताना त्याची पगाराची कपात करता येईल का? तसेच कार्यालयात हजर असून सुध्दा

न्यायालयातपण हजर राहतात अशा अधिकाऱ्याला निलंबित करता येईल का? - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१४.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०१.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि. २१.०१.२००८ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी हे प्रकरण दक्षता पथकाकडे चौकशीकरिता पाठविण्याचे आदेश दिले व प्रकरणात अनियमितता आढळल्यास दोषींविरुध्द कारवाई करण्याचे सूचित केले. मात्र जन माहिती अधिकारी यांना यासंदर्भात कोणतेही आदेश दिले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ११.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे माहिती दिल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

त्रयस्थ पक्ष श्री. गोविंद नागरे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीकडून त्यांनी कर्ज घेतले होते. या कर्ज प्रकरणात ते व अपिलार्थी यांच्यामध्ये न्यायालयीन वाद होता. या प्रकरणात औरंगाबाद येथील दिवाणी न्यायालयाने दि.३०.०४.२००७ रोजी त्यांच्या बाजूने निकाल दिला असून हा निकाल अपिलार्थीस प्राप्त झाल्यापासून ते माहिती अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग करुन श्री.नागरे यांना त्रास देण्याच्या उद्देशाने माहिती मागवित असतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. १६.०८.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी श्री. अवलगावकर (सध्या वाल्मी येथे कार्यरत) यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा २५ दिवस इतक्या विलंबाने प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज पाहता अपिलार्थीने या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या मुद्यावरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीशी पूर्णतया विसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय व मत अपेक्षित करणारी माहिती त्यांच्या या अर्जामध्ये विचारल्याचे दिसून येते.माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबद्दल अथवा कोणत्याही कृतीबद्दल खुलासा, कारणे वा त्यांचे वैयक्तिक अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागणे अनुज्ञेय नाही. त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे, तीच माहिती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे अनुज्ञेय आहे. त्यामुळे मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्जच अवैध ठरत आहे. एवढे जरी असले तरी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस, त्यांचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, त्यांना अधिनियमातील कलम ७ प्रमाणे प्रथम प्रतिसाद देणे भाग होते. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १६.०८.२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयाचा दि. १६.०८.२००७ रोजीचा शिक्का त्यावर असल्याचे दिसून येते. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी एकूण २५ दिवसांचा विलंब लावल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती प्रथमतः अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (८) प्रमाणे नाकारणे या प्रकरणी योग्य राहिले असते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न करता अपिलार्थीस २५ दिवस इतक्या विलंबाने काही माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता यामध्ये त्यांनी मुद्दा क्र.२ द्वारे अपिलार्थीस, "सदर प्रकरण लवकरात लवकर पडताळणी

पथकाकडे पाठविण्यात येत आहे " असे आश्वासित केले आहे. तथापि आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांना पडताळणी पथकाचे या प्रकरणावर कोणते अभिप्राय आहेत, हे विचारले असता, त्यांना आयोगास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देता आली नाही.

उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी या प्रकरणी त्यांच्या कार्यालयातील एका उपअभियंत्याची एक वर्षापासून नेमणूक केली असून त्यांच्याकडून अद्याप अहवाल अप्राप्त आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २१.०१.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता, त्यामध्ये अधीक्षक अभियंता यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे मान्य केले आहे आणि सदर त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील प्रकरण दक्षता पथकाकडे पाठविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. तथापि या प्रकरणी देखील आजतागायत कोणतीही प्रगती झाल्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे केलेला युक्तिवादावरुन स्पष्ट होत नाही. या सर्व प्रकरणावरुन जलसंपदा विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा कारभार कशाप्रकारे चाललेला आहे, याची सचिव, जलसंपदा यांना कल्पना येण्यास हरकत नसावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी असे स्पष्ट झाले आहे की, त्रयस्थ पक्ष आता शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्ती वेतन व तद्नुषंगीक सर्व आर्थिक फायदे त्यांना प्राप्त झाले आहेत. त्रयस्थ पक्षाने आयोगास असेही अवगत केले की, त्यांनी औरंगाबाद पाटबंधारे विभागाकडे त्यांचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणी करण्याकरिता वेळीच पाठविले होते. तथापि विभागीय कार्यालयाने वेळीच कार्यवाही केली नाही.

या सर्व घटनाक्रमामध्ये त्रयस्थ पक्षाने त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी न करताही त्यांनी त्यांच्या जातीच्या अनुषंगाने सर्व फायदे उचलल्याचे दिसून येते. शासनाने कर्मचाऱ्यांच्या जात प्रमाणपत्रांची वैधता तपासण्यासंदर्भात वेळोवेळी अनेक आदेशही पारित केले आहेत. परंतु या आदेशांची जलसंपदा विभागातील क्षेत्रीय स्तरावरुन कशाप्रकारे विल्हेवाट लावली जाते, याचे हे प्रकरण म्हणजे एक मुर्तीमंत उदाहरण ठरावे. या प्रकरणाची सचिव, जलसंपदा यांनी गांभीर्याने नोंद

घ्यावी व सर्व संबंधितांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील प्रकरणी अपिलार्थीच्या दि.१६.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी २५ दिवसांच्या विलंबाने प्रतिसाद दिल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीने त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने, सचिव, जलसंपदा यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीचा माहितीचा मूळ अर्ज वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अवैध ठरत असल्याने, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

२) सचिव (जलसंपदा) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. अवलगावकर सध्या वाल्मी,औरंगाबाद येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिलकुमार कल्याणमल भारुका,शिवाजी पार्क, पोलीस स्टेशनसमोर, कन्नड,ता.कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,औरंगाबाद पाटबंधारे विभाग,औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७७२
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

१. श्री. मो.फारुख कादरी , : अपिलार्थी
परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांचे दि. ०४.०७.२००९ रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले एक पत्र सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांनी आयोगाकडे केलेले अपील क्र.७७२/०८ हे ते स्वखुषीने मागे घेत असल्याने ते रद्द करण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली आहे. सबब अपिलार्थीची, त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्याची विनंती मान्य करण्यात येऊन,

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र.७७२/०८, दि.०७.०४.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो.फारुख कादरी, दादाराव प्लॉट, इकबाल नगर, फारान स्कुल बिल्डींग,परभणी-४३१ ४०१

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७७३
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

१. श्री. बालासाहेब आश्रुबा भोजने, : अपिलार्थी
ता.माजलगाव, जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
बीड विभाग,बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
प्रदेश कार्यालय,सिडको,औरंगाबाद.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : विभागीय वाहतूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
बीड

जन अपिलीय अधिकारी : विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
बीड विभाग,बीड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे दि.३०.०६.२००९ रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले एक पत्र सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांनी आयोगाकडे केलेले अपील, त्यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मिळाल्याने, रद्द करण्याची विनंती आयोगास केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली आहे. सबब अपिलार्थीची विचाराधीन अपील खारीज करण्याची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र.७७३/०८, दि.०४.०३.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब आश्रुबा भोजने,खिल्लारे मिस्त्रीसमोर, सम्राट अशोकनगर, माजलगाव, ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतूक अधिकारी,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,बीड विभाग,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७७४
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

१. श्री. भागवत आत्माराम पुपलवाड : अपिलार्थी
मु.पो.पाटोदा (त.ब.) ता.नायगाव (खै),
जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नायगाव(खै.),जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांचे दि.०४.०७.२००९ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर केले असून, याद्वारे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे आजचे विचाराधीन अपील क्र.७७४/०८ हे, ते स्वखुषीने मागे घेत आहेत व ते रद्द करण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थी आयोगाकडील विचाराधीन अपील मागे घेत असल्याने, सदर अपील

खारीज करण्यात येऊन  खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र.७७४/०८, दि.२७.०५.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :     ०४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भागवत आत्माराम पुपलवाड,रा.पाटोदा (त.ब.),ता.नायगाव (खै.),जि. नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, नायगाव (खै.), जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.),जिल्हा परिषद, नांदेड यांना या  निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७७६
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

१. श्री. कचरु रामभाऊ टकले, : अपिलार्थी
ता.कळंब, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग,कळंब,
ता.कळंब,जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,
उस्मानाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी, त्या अपिलाची सुनावणी घेतली नाही. अपिलार्थीचे म्हणणे ऐकून त्यांना माहिती का देण्यात आली नाही, हे तपासले नाही व अपिलार्थीस काही माहिती पुरविली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमधील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती ही अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे व उर्वरित २ मुद्यांवर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. अशाप्रकारे जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही कायदेशीर बंधनकारक गोष्टींचे पालन न केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. तसेच त्यांनी या अपील अर्जामध्ये, त्यांना माहिती प्राप्त होण्याच्या हक्कापासून वंचित ठेवल्याबद्दल

संबंधीतांवर कायदेशीर दंड ठोठावण्यात यावा व कायद्याचा अपमान केल्यामुळे कायदेशीर कारवाई करण्यात यावी व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्याचे आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०२.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००५ ते २००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कळंब तालुक्यामध्ये किती माती नाला बंधारे तयार करण्यात आले, ते ज्या सर्व्हेनंबरमध्ये तयार करण्यात आले ते सर्व्हेनंबर व संबंधित शेतकरी यांच्या नावाची लेखी स्वरुपात माहिती, याच कालावधीमध्ये कळंब, आंदोरा,गोविंदपूर या तीन गावामध्ये तयार करण्यात आलेल्या माती नाला बंधाऱ्यांची संख्या व या सर्व माती नालाबांधकामाच्या मोजणी, मोजमाप पुस्तिकेच्या साक्षांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास आवश्यक तो कोर्ट-फी-स्टॅम्प न जोडल्याने अपिलार्थीचा प्रथम अर्ज दप्तरी दाखल केल्याचे त्यांना कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.०३.२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्या दि. १७.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती पुरविली. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भातील माहिती वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस पुरविली. याचबरोबर हीच माहिती संबंधित उपविभागाने दि.१९.०३.२००८ रोजी अपिलार्थीस पुरविल्याचे आढळून येत आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन व विद्यमान जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भात दि. १९.०३.२००८ रोजी पूर्णपणे माहिती दिली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ च्या संदर्भातील माहिती 'निरंक' असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या कळंब, आंदोरा व गोविंदपूर या गावामध्ये एकही माती नाला बांधकामाचे काम करण्यात आलेले नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या मोजमाप पुस्तिका श्री. आर.क्यू.कायमी, शाखा अभियंता, श्री. यु.एन. ठाकूर, कनिष्ठ अभियंता, श्री. ए.एम.गायकवाड, शाखा अभियंता व श्री. डी. सी.वरपे, कनिष्ठ अभियंता यांच्याकडे उपलब्ध होती. त्यांच्यापैकी श्री. कायमी व श्री. गायकवाड यांची जूलै,२००७ मध्ये व श्री. ठाकूर व श्री.वरपे यांची ऑगस्ट, २००८ मध्ये बदली होऊन ते कार्यमुक्त झाले आहेत, तथापि त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या मोजमापपुस्तिकेत आहे, त्या मोजमापपुस्तिका त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जमा केल्या नाहीत. या संदर्भात त्यांनी उपविभागीय अधिकारी स्तरावर दि. २०.०३.२००९ रोजी व विभागीय स्तरावर दि.२०.०४.२००९ रोजी त्यांनी कडक सूचना देऊनही त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात त्यांना कोणतीही माहिती देता आली नाही. तथापि आता सुनावणीच्या वेळी संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी या मुद्यासंदर्भात त्यांच्याकडे काही मोजमाप पुस्तिकेच्या प्रती सादर केल्या असून ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देण्यासाठी ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ३ मुद्यांच्या संदर्भात माहिती अपेक्षिली होती. त्यापैकी मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.०३.२००८ रोजी व जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०३.२००८ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये

असे नमूद केले आहे की, ही माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. यापैकी अपिलार्थीचा ही माहिती अपूर्ण असल्याचा दावा आयोग मान्य करीत आहे. कारण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भातील माहितीचा समावेश नाही. मात्र अपिलार्थीस प्राप्त झालेल्या मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भातील माहिती ही दिशाभूल करणारी कशी आहे, हे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. अथवा आज रोजी या मुद्यावर युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली, हा त्यांचा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहेत. मात्र उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०३.२००८ रोजी पुरविलेली माहिती अपूर्ण असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. कारण अद्यापपावेतो अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कनिष्ठ अभियंत्यांकडे उपलब्ध आहे त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेली नाही. वास्तविक पाहता, जलसंपदा विभागामार्फत केल्या जाणाऱ्या बांधकामाच्या व्यवस्थापनातील मोजमाप पुस्तिका हा एक अत्यंत महत्त्वाचा अभिलेख आहे. कनिष्ठ अभियंता यांनी त्यांची बदली होताच त्यांचा कार्यभार दुसऱ्या कनिष्ठ अभियंत्याकडे अथवा इतर कर्मचाऱ्याकडे सोपविताना, त्यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या मोजमापपुस्तिका देखील संबंधित कर्मचाऱ्यांकडे हस्तांतरित करणे हे सर्वसाधारण परिस्थितीत संबंधित कनिष्ठ अभियंत्याकडून केवळ अभिप्रेतच, नव्हेतर हे त्यांचे प्रथम कर्तव्य देखील आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने दि.१३.०२.२००८ रोजी माहिती मागितली असताना व कनिष्ठ अभियंत्यांपैकी श्री. गायकवाड व श्री.वरपे हे ऑगस्ट,२००८ पर्यंत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यरत असताना देखील त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिलेली नाही. यावरुन श्री. गायकवाड व श्री. वरपे यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास हेतूपुरस्सर टाळाटाळ केली असल्याचे सिध्द होत आहे. याचबरोबर श्री. कायमी व श्री.ठाकूर यांना उपविभागामार्फत दि.२०.०३.२००९ व विभागीय कार्यालयामार्फत दि.२०.०४.२००९ रोजी सूचना देऊनही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मोजमापपुस्तिका संबंधित उप अभियंता यांच्याकडे सादर केल्या नाहीत. ही बाब आयोगाने अत्यंत गांभीर्याने घेतली असून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी

अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी त्यांच्या कार्यालयात सादर न केल्याबाबत व त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील मोजमाप पुस्तिका गहाळ झाल्याप्रकरणी व परिणामी अपिलार्थीने मागितलेली माहिती एकप्रकारे नष्ट करण्याचा अथवा दडविण्याचा प्रयत्न केला असल्यामुळे त्यांनी सर्व संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्यावर हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत फौजदारी कारवाई करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, उस्मानाबाद यांनी, संबंधित जन माहिती अधिकारी हे ही कार्यवाही विहित मुदतीत करतील, याची दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जाबरोबर त्यांनी ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा जोडलेला असतानाही, जन माहिती अधिकारी यांची, अपिलार्थीस त्यांच्या दि. २५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कोर्टाचे तिकीट न लावल्यामुळे अपिलार्थीचा अर्ज दप्तरी दाखल करण्याची, त्यांची ही कृती सर्वथा गैर व अवैध आहे. कारण अधिनियमातील कलम ७(५) च्या तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्र.आर.टी.आय.२००५/सी.आर. ३१५/०५/५,दिनांक ११.१०.२००५ नुसार अर्जदाराने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा वैध पुरावा दाखल केल्यानंतर त्यांच्याकडून अशाप्रकारच्या शुल्काची आकारणी करण्यात येऊ नये, असे सूचित केले आहे. या सूचनेचा भंग जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विहित मुदतीत प्राप्त न होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. आर.क्यू.कायमी व श्री.गायकवाड, शाखा अभियंता व श्री. ठाकूर व श्री. वरपे कनिष्ठ अभियंता जबाबदार असल्याचे या प्रकरणी

नि:संशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी सुनावणीसाठी हे कनिष्ठ अभियंता, आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब त्यांना त्यांच्या बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून त्यांना दीर्घकाळासाठी वंचित ठेवल्याबद्दल, त्यांच्यावर एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचे वरील सहाय्यक - कनिष्ठ अभियंता जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिश: उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील मोजमापपुस्तिका गहाळ झाल्याप्रकरणी त्यांनी सर्व संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्यावर हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत फौजदारी कारवाई करण्याच्या कार्यवाहीसंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी.

४) संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित कार्यालयीन सहाय्यक (श्री. आर.क्यू. कायमी व श्री.गायकवाड,शाखा अभियंता व श्री. ठाकूर व श्री. वरपे, कनिष्ठ अभियंता) या सर्वांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात

येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कचरु रामभाऊ टकले,मु.पो.आंदोरा,ता.कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग,कळंब,ता.कळंब,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७७७
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

१. श्री. सुधीर राजाभाऊ सासवडे, : अपिलार्थी
भूम, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, भूम,जि.उस्मानाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,भूम,जि.उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. राजाभाऊ आबाराव सासवडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,भूम यांनी अपिलार्थीने त्यांना दि. ०३.०७.२००९ रोजी दिलेले एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांच्या जमिनीबद्दलचा फेर मंजूर होऊन त्यांच्या विहिरीची नोंद ७/१२ वर 'इतर हक्का'मध्ये झाल्यामुळे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना मिळाल्याचे कबूल केले आहे व त्याचबरोबर त्यांचे विचाराधीन प्रकरण बंद करावे, अशी तहसीलदार यांना विनंती केली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केले आहे, हे पाहता, खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील बंद करण्याची तहसीलदार यांना केलेली विनंती लक्षात घेऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र.७७७/०८, दि.०३.०४.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुधीर राजाभाऊ सासवडे,बाजार रोड,भूम,ता.भूम जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, भूम,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,भूम जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७७८
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

१. श्री. बचुटे एस.एस. : अपिलार्थी
मु.वलगुड, पो.चिलवाडी,ता. जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे प्राथमिक विद्यालय,
उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जावर अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्याकडून ३१ पृष्ठांच्या माहितीसाठी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी बेकायदेशीर रु.२००/- इतक्या शुल्काची वसूली केली. 'महाराष्ट्र दर्शन' रजा प्रवास सवलत योजनेचा सर्व कर्मचाऱ्यांनी प्रवास न करता व जादा अपत्ये असूनदेखील लाभ घेतला व त्याची माहिती जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी 'निरंक' म्हणून दिली, त्यांच्या पत्रामध्ये 'सोबत सेवाज्येष्ठता यादी जोडत आहे ', असा उल्लेख करुनही ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली नाही. त्यांनी मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आवश्यकता असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांनी एकूण ३१ पृष्ठांच्या माहितीसाठी वसूल केलेले जादा शुल्क संबंधितांकडून परत मिळावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संबंधी एकूण चार मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी, १९९६-९७ ते २००७-२००८ पर्यंतच्या संच मान्यतेच्या सत्यप्रती, कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता आदेशाच्या सत्यप्रती, शैक्षणिक पात्रता व व्यावसायिक पात्रता प्रमाणपत्राच्या सत्यप्रती व जन माहिती अधिकारी यांच्या विद्यालयातील दोन पेक्षा जास्त अपत्ये असलेल्या ज्या कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलतीचा लाभ घेतला, त्या कर्मचाऱ्यांचे वेतन देयक, अपत्य प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शैक्षणिक वर्ष १९९६-९७ ते २००७-०८ या कालावधीशी संबंधित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे रु.२००/- इतके शुल्क त्यांच्या शाळेच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उस्मानाबादच्या शहर शाखेमध्ये खाते क्र.९०११ मध्ये भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शहर शाखेमध्ये दि.०८.०२.२००८ रोजी रु.२००/- रकमेचा शाळेच्या खात्यात भरणा केला. शुल्काचा भरणा करुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१९.०४.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी झाली किंवा कसे, हे आयोगास या संदर्भातील जोडलेल्या त्यांच्या निर्णयाशिवाय कळण्यास मार्ग नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने मूलतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या चारही मुद्यावरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित केलेल्या मुदतीत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. अपिलार्थीच्या दि. ०१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडील दि. ३०.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२००/- इतके त्यांच्या शाळेच्या उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शहर शाखेतील शाळेच्या खाते क्र.९०११ मध्ये भरण्याचे सूचित केले व त्याप्रमाणे अपिलार्थीने या रकमेचा भरणा दि.०८.०२.२००८ रोजी संबंधित बँकेत केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी दि.२९.०४.२००८ रोजी माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्या दि.३०.०१.२००८ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या संभाव्य माहितीच्या पृष्ठांची अंदाजित संख्या व ती पुरविण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर कळविलेला नाही. जो जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे त्यांनी अपिलार्थीस देणे अनिवार्य आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दि. ३०.०१.२००८ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. अशाप्रकारच्या अवैध पत्रव्यवहारामुळे व अपिलार्थीकडून शुल्क स्विकारुनही त्यांना सशुल्क माहिती देण्याचा अनुज्ञेय कालावधी व्यपगत होऊनही त्यानंतर विलंबाने माहिती दिल्यामुळे अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी पात्र ठरत आहेत. परिणामी आता जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे प्राथमिक विद्यालय, उस्मानाबाद यांना अपिलार्थीस त्यांच्याकडून या प्रकरणी माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रु.२००/- इतके त्यांना परत करावे लागेल. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सेवाज्येष्ठता यादी दिलेली नाही, तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात 'निरंक' अशी खोटी माहिती दिलेली आहे, असे म्हटले आहे. यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी खरोखरीच सेवाज्येष्ठता यादी दिली किंवा कसे, हे सर्व

संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती पुरविल्याचे नमूद केले आहे. यासंदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे प्राथमिक विद्यालय, उस्मानाबाद या शाळेतील ज्या शिक्षकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सन १९९६-९७ ते २००७-०८ या कालावधीमध्ये महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलतीचा फायदा घेतलेला आहे, त्या सर्व संबंधितांच्या देयकाची त्यांच्या कार्यालयातील वेतन पडताळणी पथकामार्फत सखोल चौकशी करावी व जर या प्रकरणी त्यांना संस्थेमधील काही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी दोषी आढळले तर त्यांना देण्यात आलेली अवैध प्रवास देयकाची रक्कम सर्व संबंधितांकडून दंडनीय व्याजासह वसूल करावी. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी ही चौकशी, हे आदेश निर्गमित झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत पूर्ण करणे त्यांना बंधनकारक राहिल.

या प्रकरणी आयोगास असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांनी दि.२९.०४.२००८ रोजी माहिती पुरविली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस साठ दिवस इतक्या विलंबाने दिली असल्याने जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब मुख्याध्यापक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे प्राथमिक विद्यालय, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस साठ दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु. १५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विलंबाने माहिती पुरविल्याचे जन माहिती अधिकारी यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.२००/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

३) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याबद्दल त्यांना एकूण रु.१५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांनी वरील निर्णयात निर्देशित केल्याप्रमाणे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे प्राथमिक विद्यालय, उस्मानाबाद या शाळेची अपिलार्थीच्या दि.०१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ शी संबंधित बाबीच्या संदर्भात हे आदेश निर्गमित होताच नव्वद दिवसांच्या आत चौकशी करुन आपला अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बचुटे एस.एस., मु.वलगुड, पो.चिलवाडी,ता. जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे प्राथमिक विद्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,उस्मानाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७७९
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

१. श्री. उल्हास फुलचंद राठोड, : अपिलार्थी
ता.जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
ज्ञानदिप माध्यमिक आश्रम शाळा,तांबेवाडी
(तांडा), ता.बार्शी, जि.सोलापूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,सोलापूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथील कार्यालयाकडून प्राप्त झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जावर अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या वैयक्तिक माहितीसाठी व जनहित याचिका दाखल करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.११.२००७ रोजीच्या, मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ज्ञानदिप माध्यमिक आश्रम शाळा,तांबेवाडी (तांडा), ता.बार्शी, जि.सोलापूर यांच्याकडे त्यांच्या शाळेतील कर्मचाऱ्यांच्या संबंधी शैक्षणिक वर्ष १९९०-२००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने १४ मुद्यांवर मागणी केलेल्या माहितीमध्ये संबंधित कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक फाईलची साक्षांकित प्रत व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रशासकीय मान्यतेच्या साक्षांकित प्रती आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या एस.एस.सी. परीक्षेच्या प्रमाणपत्राच्या प्रती- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०२.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, प्रथमतः अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती पूर्णतया माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका पंधरा कलमी विशिष्ट विवरणपत्रात वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने माहितीची मागणी केल्यानंतर ही माहिती नव्याने तयार करुन देणे अपिलार्थीस अपेक्षित असावे, असे या विवरणपत्रावरुन दिसून येते. तथापि या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे, त्या अभिलेख्यांच्या प्रती अपिलार्थीस त्यांना देणे हे प्रामुख्याने माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीचा या १५ कलमी विवरणपत्राचे अवलोकन केले असता, या विवरणपत्रातील स्तंभ क्र.१३ व १४ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही खुलासा अपेक्षित केला आहे. व स्तंभ १५ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्या अभिप्रायाची त्यांनी त्यांच्याकडे विचारणा केलेली आहे. या तीनही स्तंभांच्या (क्र.१३,१४ व १५) संदर्भातील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली

माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र उर्वरित अकरा स्तंभांच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे त्या अभिलेख्यांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस देणे भाग आहे. अपिलार्थीने विहित केलेल्या विवरणपत्रातील क्र.१ च्या रकान्यात फक्त अनुक्रमांकाचा उल्लेख केला असल्यामुळे या स्तंभासंदर्भातील माहितीवर आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. याचबरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील विवरणपत्राव्यतिरिक्त उर्वरित तीनही मुद्यांवरील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी पाहता, वरील परिच्छेदात नमूद केलेल्या विश्लेषणाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील विवरणपत्रातील मुद्दा क्र. १, १३,१४ व १५ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०३.११.२००७ च्या मूळ अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि.३१.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल मुख्याध्यापक, ज्ञानदिप माध्यमिक आश्रम शाळा,तांबेवाडी (तांडा), ता.बार्शी, जि.सोलापूर हे या प्रकरणी अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र असल्याचे सिध्द होत असल्याने संबंधित मुख्याध्यापक यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध न करुन दिल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून कोणत्याही समर्थनीय

कारणाशिवाय वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या विवरणपत्रातील रकाना क्र.१, १३, १४ व १५ वगळता उर्वरित सर्व मुद्यांच्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उल्हास फुलचंद राठोड,मु.पो.घाटंग्री, तांडा नं.१ ता.जि.उस्मानाबाद-४१३ ५०१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,ज्ञानदिप माध्यमिक आश्रम शाळा,तांबेवाडी (तांडा), ता.बार्शी, जि.सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७८०
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

१. श्री. शेख शाकेर अहमद अ. गफुर, : अपिलार्थी
उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापिका,
शम्सूल उलूम ऊर्दू हायस्कूल, उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जावर अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर माहिती देण्यात आली, तथापि त्यांना पुरविण्यात आलेली माहिती अपूर्ण असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.या अपील अर्जामध्ये त्यांना अद्यापपावेतो न मिळालेल्या माहितीची त्यांनी मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांच्याकडे शिक्षक मान्यतेसाठी दाखल केलेल्या प्रस्तावातील पत्र क्र.२३७, दि.२७.०३.१९८९, २९७, दि.०६.०९.१९८९ व १०३/९०-९१, दि. १३.०८.९० या तीन पत्रांद्वारे दाखल केलेल्या प्रस्तावाच्या

प्रती, ऑक्टोबर, १९८८ ते सप्टेंबर,१९९० पर्यंतच्या सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन देयकाच्या सत्यप्रती व विना अनुदानित तत्वावर नेमणूक झालेल्या शिक्षकांच्या वेतन देयकांच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१६.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, त्यांनी मागणी केलेल्या अर्जामध्ये प्रत्येक पत्राचा जावक क्रमांक व दिनांक लिहिलेला आहे. म्हणजेच सदरील माहिती अपिलार्थीकडे उपलब्ध आहे व त्यांनी केवळ विद्यालयाच्या मुख्याध्यापकास मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने हे कारस्थान चालविले आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती संस्थेच्या सचिवांकडून किंवा अध्यक्षांकडून रीतसर अर्ज करुन प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२०.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन त्यांच्या दि. २५.०३.२००८ रोजीच्या आदेशाद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसांचे आत माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ मधील मार्च,१९८९ पासूनच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकाच्या प्रती पाठवून दिल्या. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व ३ शी संबंधित माहिती ही सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे उपलब्ध आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांनी दि. २९.०३.२००८ रोजी संबंधित सचिवांशी पत्रव्यवहार केला होता. तथापि त्यांनी ही माहिती जन

माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्या अपिलार्थीस माहिती पुरवू शकल्या नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील आता त्यांना द्यावयाची उर्वरित माहिती - अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ३ शी संबंधित माहिती - ही संस्थेच्या सचिवांकडे उपलब्ध आहे. वास्तविक पाहता, मुख्याध्यापकास जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केल्यानंतर शाळेच्या संबंधित संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे अनिवार्य आहे. मात्र बहुतांशी सर्व खाजगी अनुदानीत शाळांच्या संदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, संबंधित संस्था मुख्याध्यापकांची माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करतात परंतु संस्थेचे सर्व संबंधित अभिलेखे संस्थेचे सचिव किंवा अध्यक्ष यांच्याकडे ठेवले जातात. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या निकोप वाढीसाठी अशाप्रकारच्या माहिती व्यवस्थापनामध्ये वेळीच बदल होणे आवश्यक आहे, असे आयोगास वाटते. सबब सचिव, (शालेय शिक्षण) यांना त्यांच्या विभागामार्फत, शालेय संस्थांकडील माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहिती प्राप्त करुन घेण्यासंबंधी, संबंधित संस्थेचे अभिलेखे निश्चितपणे कोणाकडे उपलब्ध असावेत, यासंदर्भात आवश्यक ते परिपत्रक पारित केले जाणे उचित राहिल, अशी आयोगाची शिफारस आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सकृतदर्शनी सार्वजनिक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस कोणत्याही परिस्थितीत संबंधित संस्थेने देणे हे, त्या संस्थेस भाग आहे. ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत, सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी,उस्मानाबाद यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती हस्तगत करुन घ्यावी व ती अपिलार्थीस याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरविण्याची व्यवस्था करावी. या प्रकरणी जर सचिव,

शम्स एज्युकेशन सोसायटी यांनी त्यांना सहकार्य केले नाही तर शिक्षणाधिकारी हे जिल्हयातील पोलीस यंत्रणेचे सहकार्य घेऊ शकतील.या संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या प्रकरणी त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित रेकॉर्ड हस्तगत करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करावे, असे सूचित करण्यात येत आहे. या उपरही जर संबंधित संस्थेकडून माहिती उपलब्ध झालीच नाही तर संबंधित संस्थेवर माध्यमिक शाळा संहितेनुसार कारवाई करण्याचा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.उस्मानाबाद यांनी वेगळयाने विचार करावा, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.उस्मानाबाद यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख शाकेर अहमद अब्दुल गफुर,खाजानगर,गल्ली नंबर १३, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,शम्सूल उलूम ऊर्दू हायस्कूल, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७८१
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

१. श्री. भारत छोटूलाल चव्हाण, उस्मानाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,उस्मानाबाद. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०४.२००८ रोजी फेर नोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जावर अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी रु.३७/- इतके शुल्क आकारुनही सटीफाईड प्रतींत माहिती दिली नाही व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ व ५ च्या संदर्भातील माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे रो.ह.यो.अंतर्गत उस्मानाबाद ग.क्र.६१४ येथे शेततळे प्रकल्पाचे काम झाले परंतु या कामाचा मंजूर अंदाजपत्रकाचा गोषवारा व नकाशाची सर्टीफाईड प्रत आणि लाभार्थ्याने सादर केलेल्या गावनमूना ७/१२ च्या दस्तऐवजाच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत, हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे त्यांना मान्य नाही. कारण नकाशा व अंदाजपत्रकाच्या मंजूरीशिवाय रोहयोची कामे होणे शक्य नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हयातील ग.नं.६१४ मध्ये रो.ह.यो.अंतर्गत झालेल्या शेततळयाच्या संदर्भात काही माहिती मागविली होती. कालांतराने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ व ५ शिवाय प्राप्त झाली असल्याने ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०१.२००७ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३७/- भरले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी दि.०८.०२.२००७ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ व ५ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित माहिती दिली. त्यानंतर या प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२०.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दि. २०.०४.२००७ रोजीच्या आदेशाद्वारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ व ५ च्या संदर्भातील माहिती देण्याचे सूचित केले व तदनंतर त्यांनी दि.०२.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याकरिता स्मरणपत्र देखील दिलेले आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीप्रमाणे आयोगासमोर युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने

जन माहिती अधिकारी यांना मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून दि. ०४.०१.२००७ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३७/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करुन घेतले व अपिलार्थीस दि. ०८.०२.२००७ रोजी अपूर्ण माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क प्राप्त करुन घेऊन अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर अपूर्ण माहिती पुरविण्याची त्यांची सदरची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीस ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.३७/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, या कालावधीमध्ये जर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध झाली नाही तर, या प्रकरणी त्यांनी ही माहिती ज्या अधिकाऱ्याच्या ताब्यात असणे सर्वसाधारण परिस्थितीत अपेक्षित आहे, त्या अधिकाऱ्यावर फौजदारी अथवा प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा विचार करावा व यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास नव्वद दिवसांच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी

३) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.३७/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या कालावधीमध्ये परत करावे.

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.उस्मानाबाद यांनी, वरील आदेश क्र.२ चे अनुपालन होईल, असे पहावे, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक अथवा फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भारत छोटूलाल चव्हाण,द्वारा कापड विक्री केंद्र, पोलीस लाईन,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९८७
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. विलास त्रिंबकराव भालेराव,<br>रा.गंगापूर, जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,गंगापूर,<br>जि.औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, वैजापूर,<br>जि.औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती न देता टप्प्याटप्प्याने व विलंबाने माहिती दिली व तसेच या प्रकरणी त्यांनी पहिले अपील केल्यानंतरही त्यांना चुकीची व अपूर्ण स्वरुपाची माहिती दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई व्हावी. त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०५.२००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या खात्यातील अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्यासाठी प्रयत्न केले असून त्यांना वाचविण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी यांनी गोलमाल निर्णय दिला आहे व माहिती अधिकाराचा गैरवापर केला आहे. या अर्जामध्ये अंतीमतः त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उर्वरित माहिती विनामूल्य प्राप्त

व्हावी व संबंधितांवर नियमाप्रमाणे कलम २० प्रमाणे कारवाई व्हावी, अशी अपिलार्थीने आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ११.०३.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे, जो जन माहिती अधिकारी यांना दि. १२.०३.२००८ रोजी प्राप्त झाला, त्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि.०१.०१.२००६ ते १०.०३.२००८ या कालावधीची एकूण ११ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गंगापूर तालुक्यातील दक्षता समितीच्या सदस्यांची नावे, त्यांनी घेतलेल्या बैठकांची संख्या,अपर जिल्हाधिकारी यांनी तहसीलदार यांच्या घेतलेल्या बैठका, बैठकीचा भत्ता,ग्रामीण पातळीवरील दक्षता समितीची नावे व पत्ते, रास्त भाव दुकानांविरुध्द दक्षता समितीने तहसीलदारास पाठविलेल्या अहवालाची संख्या -इ. मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली असून या अर्जासोबत त्यांनी त्यांच्या दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपैकी काही मुद्यावरील माहिती त्यांच्या कार्यालयात समक्ष हजर राहून हस्तगत करुन घेण्याचे त्यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०२.०४.२००८ रोजी स्वतः उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली. तथापि या वेळी अपिलार्थीस माहिती मिळाली नाही. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२४.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दोन दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व जन माहिती अधिकारी हे विहित मुदतीत

माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचा निष्कर्ष काढला. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून या युक्तिवादामध्ये त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४,६ व ११ च्या संदर्भातील माहिती विनामूल्य देण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती प्राप्त झाल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारावा, अशी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि.३१.०५.२००८, दि.१७.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली असून अपिलार्थीच्या दि. १२.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ६ च्या संदर्भात जी माहिती अपिलार्थीस देणे भाग होते, ती संकलीत झाली असून, ही माहिती अपिलार्थीस तात्काळ व विनामूल्य देण्यास ते तयार आहेत. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीच्या मागणीचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला होता त्यावेळी श्रीमती सविता चौधर (सध्या ता.वाशी, जि. उस्मानाबाद येथे कार्यरत ) या जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होत्या.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दि.१२.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१९.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रथम प्रतिसाद हा काहीसा सकारात्मक वाटतो. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या

दि.१९.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या कार्यालयातून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले.तथापि दि.०२.०४.२००८ रोजी अपिलार्थी हे माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले परंतु त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२,५,७,८,९ व १० या मुद्याशी संबंधित माहिती प्रथमतः दि.३१.०५.२००८ रोजी दिली, हे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. यानंतर दि.१७.०७.२००८ रोजी अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१,३,४ व ६ शी संबंधित माहिती पुरविली, तथापि याही माहितीमध्ये मुद्दा क्र.४ व ६ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्णतः न पुरविता, अपूर्ण स्वरुपात पुरविली व आज रोजी आयोगाकडे होणाऱ्या सुनावणीच्या वेळी मुद्दा क्र.४ व ६ शी संबंधित उर्वरित माहिती व मुद्दा क्र.११ शी संबंधित पूर्ण माहिती त्यांनी त्यांच्यासोबत आणली आहे. यावरुन असे सिध्द होत आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पूर्णतया माहिती दिलेली नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचा निष्कर्ष जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.२१.०५.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये काढला आहे. हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निश्चितपणे पात्र ठरत आहेत, असे आढळून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे त्यांना बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने आयोगातर्फे असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न देता व मुदतीनंतर टप्प्याटप्प्याने अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार

असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने व तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४, ६ व ११ शी संबंधित अपिलार्थीस देय माहिती त्यांना तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४, ६ व ११ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४,६ व ११ या मुद्यांशी संबंधित उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्रीमती सविता चौधर,सध्या वाशिम,जि.उस्मानाबाद येथे कार्यरत) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न देता व तदनंतर टप्प्याटप्प्याने अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ

नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलास त्रिंबकराव भालेराव,मु.पो.नृसिंह कॉलनी,ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७३५
निर्णय दिनांक ०४-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. विकास वल्लभदास कोंडेकर,<br>रा. शिराढोण,ता.कळंब,जि.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, कळंब, जि.उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०५.२००७ रोजी नोंदविलेले दि. ०१.०४.२००८ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जावर अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणताही आदेश पारित न केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०९.०९.२००५ रोजीच्या व दि.११.१०.२००५ रोजी दिलेल्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती व “ग्रामपंचायत, शिराढोण

येथील अनामत रकमेपोटी दिलेले रु.३०,०००/- इतके व्याजासह परत करण्याबाबत" अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दि.२८.०२.२००७ रोजी प्रथम अपील केले.अपिलार्थीचा सदर अपील अर्ज उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.उस्मानाबाद यांच्याकडे प्राप्त झाला. तथापि त्यांनी अपिलार्थीचा हा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांच्याकडे न पाठविता स्वतःच्या स्तरावर दि. ०८.०४.२००७, २४.०४.२००७, २७.०६.२००७, १८.०९.२००७ व दि.२२.११.२००७ अशा पाच वेळेस सुनावणी घेतली व अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना तोंडी सूचना दिल्या. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या तोंडी सूचनेनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०३.०४.२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०३.०४.२००७ रोजी पूर्णतया माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ शी संबंधितच माहिती अपिलार्थीस या प्रकरणी देय होत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०३.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती त्यांच्या मूळ अर्जातील माहितीशी विसंगत आहे, असे अपिलार्थीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणले आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे की, त्यांनी दि.०९.०९.२००५ रोजी व दि.११.१०.२००५ रोजी केलेल्या तक्रारीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी ही कार्यवाही केलेली नाही. श्री.डी.एफ.पुदाले, ग्रामसेवक यांच्याविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी केलेली कार्यवाही ही दुसऱ्या प्रकरणाशी संबंधित आहे, ती अपिलार्थीने केलेल्या तक्रारीशी संबंधित नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली ही माहिती दिशाभूल करणारी व बोगस असल्याचे वाटत आहे. अपिलार्थीच्या या युक्तिवादामध्ये आयोगास तथ्यांश आढळून येत आहे. कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०९.२००५ व दि.११.१०.२००५ रोजी तक्रार अर्ज दिला असताना, या दिनांकाच्या आधीचे ग्रामसेवक श्री. पुदाले यांच्याविरुध्द केलेल्या कार्यवाहीचे आदेश हे नेमक्या कोणत्या चौकशी संदर्भात आहेत, याचा आयोगास उलगडा होत नाही. अपिलार्थीने या मुद्यावर मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दि. ०९.०९.२००५ व दि. ११.१०.२००५ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने त्यांना या प्रकरणाशी संबंधित सर्व संबंधितांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात, असे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही माहितीची मागणी केल्याचे दिसून येत नाही. या मुद्याद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची रु.३०,०००/- इतकी रक्कम व्याजासह परत करण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे. ही विनंती मान्य करणे अथवा अमान्य करणे ही माहिती , ती पूर्णतया प्रशासकीय बाब असल्यामुळे, अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याचे सिद्ध होत आहे. परिणामी ही माहिती

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या या मुद्यासंदर्भात आयोगाचे अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

उपरोक्त कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या दि. २१.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.उस्मानाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. साळुंके बाबूराव सध्या गट विकास अधिकारी, तुळजापूर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विकास वल्लभदास कोंडेकर,मु.पो.शिराढोण,ता.कळंब,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७८८

निर्णय दिनांक ०६-०७-२००९

१ श्री. लिंबाजी आबाजी गाडे, : अपिलार्थी
मु. रिधोरा, पो. पुसेगांव, तालुका सेनगांव,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव,
तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
हिंगोली

त्रयस्थ पक्ष : १. श्री. आर. ए. काळे
२. श्री. विठ्ठल ग्यानुजी शिंदे
३. सौ. सखुबाई विश्वनाथ गाडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे हायकोर्ट रिट पिटीशन क्रमांक ५८८८/०७ या न्यायालयीन आदेशाच्या संदर्भात मागणी केलेली माहिती त्यांनी न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील

केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव जिल्हा हिंगोली यांच्याकडे एकूण सात मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - चौकशीमध्ये संबंधित तारखा हया रेकॉर्ड आधारे घेतल्या आहेत की मनाप्रमाणे टाकल्या आहेत, श्री. आर. ए. काळे, ग्रामसेवक यांचा कार्यकाळ केव्हापासून कोठपर्यंत, त्यांना चौकशीसाठी बोलाविले होते काय, रिट याचिका क्रमांक ५८८८/०७ च्या अनुषंगाने चौकशीमध्ये दोषी असणा-या व्यक्तीवर कोणी व काय कार्यवाही केली व केली नसल्यास न करण्याची कारणे काय, निर्णय अधिकारी कोण, जुलै २००३ ते डिसेंबर २००३ च्या दरम्यान कोणते ग्रामसेवक रिधोरा येथे कार्यरत होते, श्री. विठ्ठल ग्यानुजी शिंदे यांच्या घराची नोंद कोणी, केव्हा व कशाच्या आधारे नमुना नंबर ८ ला घेतली आहे, विना रेकॉर्ड अशा नोंदी घेता येतात काय, याचा उल्लेख चौकशीमध्ये नसल्याचे कारण काय, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्या दिनांक २०-०२-२००६ रोजीच्या पत्रासंबंधी चौकशीमध्ये उल्लेख केला अथवा नाही, केला नसल्यास न करण्याची कारणे काय, सौ. सखुबाई गाडे यांना चौकशीसाठी बोलाविले होते किंवा नाही व याचिका क्रमांक ५८८८/०७ चा चौकशी अहवाल न्यायालयाकडे पाठविल्याचा दिनांक - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने या अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहिती शिवाय इतर कोणत्याही मुद्दयांचा तपशील जन माहिती अधिकारी यांना दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिनांक २२-०१-२००८, २८-०१-२००८ व १५-०२-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे स्मरण देऊन अपिलार्थीस माहिती

देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक १९-०३-२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांना आवश्यक असलेली माहिती घेण्यासाठी ते तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जमादार यांच्याकडे गेले असता त्यांनी अपिलार्थीस, त्यांना फक्त माहिती देण्याचे काम निर्धारित केले गेले नसून त्यांना इतर बरीच कामे करावयाची आहेत असे कारण दर्शवून, अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही श्री. जमादार यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांना माहिती देण्यासाठी जबाबदार असलेल्या अधिका-यावर योग्य ती कारवाई करावी अशी त्यांनी अखेरीस आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, सध्या कार्यरत असलेले गट विकास अधिकारी तथा सध्याचे जन माहिती अधिकारी हे पंचायत समितीच्या दिनांक १३ जुलै रोजी होणा-या बैठकीसाठी तयारी करण्यात व्यस्त असल्यामुळे त्यांनी त्यांच्या कार्यालया-

तील वरिष्ठ लिपीक दर्जाच्या अधिका-याला आयोगाकडे पाठविले आहे. त्यांनी आयोगास जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती अद्यापपावेतो पुरविली नसल्याचे मान्य केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत रिधोरा येथील रिट पिटीशन क्रमांक ५८८८/०७ च्या चौकशी अहवालासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सात मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या या अर्जाचे अवलोकन केले असता या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे बहुतांशी प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी अशी माहिती मागितली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने या अर्जामध्ये प्रश्नार्थक व जन माहिती अधिकारी यांचे मत अपेक्षित करणारी जी माहिती मागितली आहे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जरादाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारणे, त्यांचा खुलासा, स्पष्टीकरणे विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अशा प्रकारच्या त्यांच्या कृतीबद्दलचे खुलासे देणे आणि त्यांचे समर्थन करणे अशा प्रकारच्या प्रक्रिया, माहिती अधिकार अधिनियमामध्ये अंतर्भूत नाहीत. त्यामुळे मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीच्याबाबत जवळजवळ निम्म्याहून जास्त माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना जन माहिती अधिकारी याच्याकडून देय होणारी माहिती ही मुद्दा क्रमांक २ अंशतः - श्री. आर. ए. काळे ग्रामसेवक यांचा कालावधी, चौकशीमध्ये दोषी असलेल्या व्यक्तीवर कोणी व काय कारवाई केली, जुलै २००३ ते डिसेंबर २००३ या कालावधीमध्ये मौजे रिधोरा येथे कार्यरत असलेल्या

ग्रामसेवकांची यादी, श्री. विठ्ठल ग्यानुजी शिंदे यांच्या घराची नोंद कोणी, केव्हा व कशाच्या आधारे नमुना नंबर ८ ला घेतली आहे, विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांच्या दिनांक २०-०२-२००६ रोजीच्या पत्रासंबंधी केलेल्या चौकशीची प्राप्त आणि चौकशी अहवाल न्यायालयाकडे पाठविल्याचा दिनांक, एवढीच माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. ही माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर आज कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वरील निर्णयात स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना पूर्णपणे न भरता तो अपूर्ण स्वरुपात सादर केला. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाकडे व तदनंतर अपिलार्थीने पाठविलेल्या पत्राकडे कोणतेही लक्ष न पुरविता अपिलार्थीस प्रथमतः माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या निर्णयाप्रमाणे देखील अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही सकारात्मक कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशा प्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरविले असल्याचे सिध्द होत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी (सध्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला या पदावर कार्यरत) यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना माहिती

प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतक्या रकमेची शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य आहे असे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ५ अंशत: व मुद्दा क्रमांक ४ व ७ यासंदर्भातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. जवंजाळ, सध्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला या पदावर कार्यरत) यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लिंबाजी आबाजी गाडे, मु. रिधोरा, पो. पुसेगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. जवंजाळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोदणीकृत टपालाद्वारे)

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७८९

निर्णय दिनांक ०६-०७-२००९

१ श्री. संजय मुरलीधर व्यास, : अपिलार्थी

पोलीस उप निरीक्षक, बि. स. व्दारा समादेशक रा. रा. पो.

बल गट ३, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

कार्यालय समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ३,

जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.३, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांना देय प्रवासभत्ता व इतर अनुज्ञेय देयके सादरीकरण ते बिलाची अदायगी होईपर्यंत लागू असलेल्या नियमावलीच्या प्रतीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये सहा इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांच्या दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, जालना येथील शाखेत दिनांक १६-०२-२००८ रोजी केला व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०२-२००८ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी ही माहिती सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण असल्याचे का वाटते हे आयोगास अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे व यासंदर्भात त्यांनी कोणताही लेखी पुरावा त्यांच्या व्दितीय अपील अर्जाबरोबर अथवा तदनंतर सादर केला नसल्याने, कळण्यास मार्ग नाही.

या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास दिनांक १८-०१-२००८ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम प्रतिसाद देणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत होते. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२००८ रोजी प्रथम अपील अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस सहा रुपये इतके शुल्क भरण्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दिनांक २२-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले गेले. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची मुदत या प्रकरणी दिनांक १८-०१-२००८ पर्यंतच होती. तथापि ही मुदत व्यपगत होऊन गेल्यानंतरही अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याची जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. त्यामुळे आता त्यांना अपिलार्थीकडून दिनांक १६-०२-२००८ रोजी त्यांच्या कार्यालयाने घेतलेले शुल्क रुपये सहा इतके अपिलार्थीस परत करावे लागेल. हे शुल्क त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.३, जालना यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये सहा इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

३. समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.३, जालना यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय मुरलीधर व्यास, पोलीस उप निरीक्षक, बि. स. व्दारा समादेशक रा. रा. पो. बल गट क्र. ३, जालना.

२ जन माहिती अधिकारी, कार्यालय समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.३, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.३, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७९०

निर्णय दिनांक ०६-०७-२००९

१ श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, : अपिलार्थी
गोविंदराज प्रिटींग प्रेस, रेल्वे स्टेशनजवळ, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००६ ते २००८ या कालावधीतील केंद्रीय

ग्राम निधी योजने अंतर्गत झालेल्या रस्त्याच्या डांबरीकरणाची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शेकापूर, देवर्जन, शंभूउमरगा, दैठणा, शिरुर, अनंतपाळ व सुगांव या रस्त्याच्या कामाची माहिती, केंद्रीय ग्राम निधी अंतर्गत व इतर राज्य शासनाच्या निधीतून कोणकोणती कामे झाली, त्यावर किती खर्च आला, ते कि. मी. क्रमांकासह व ठेकेदाराच्या नावासहीत आणि शिरुर अनंतपाळ - पांढरवाडी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी काढण्यात आलेल्या निविदेशी संबंधीत अंदाजपत्रकाची प्रत व निविदा रक्कम - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पोस्टाव्दारे पुरविली. तथापि ही माहिती अपिलार्थीस न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडील दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व निलंगा विभागातर्फे अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०५-०३-२००८ रोजी पुरविली.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी उपविभागा-मार्फत दिनांक २५-०३-२००८ रोजी व विभागामार्फत कार्यकारी अभियंता यांनी दिनांक ०५-०३-२००८ रोजी आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पोस्टाने पाठविली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली किंवा कसे याबाबत त्यांच्याकडे विचारणा केली असता अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांना कबूल केले असल्याचे व जन माहिती अधिकारी यांना देखील सुनावणीसाठी उपस्थित न राहण्याची अपिलार्थीने त्यांना विनंती केली असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी असलेली अपिलार्थी यांची अनुपस्थिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती पाहता, अपिलार्थीस आता ही माहिती प्राप्त झाली असून आता या प्रकरणाशी संबंधीत माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये त्यांना फारसे स्वारस्य उरले नसल्याचे दिसून येत आहे. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, गोविंदराज प्रिटींग प्रेस, रेल्वे स्टेशनवजळ, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ७९१/२००८ व ७९२/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७९१ व ७९२

निर्णय दिनांक ०६-०७-२००९

१ श्री. गणेश नंदराम बहुरे, अपिलार्थी
व्दारा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बदनापूर,
तालुका बदनापूर, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र
पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र
पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद

**निर्णय**

अपील क्रमांक ७९१/२००८

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती न दिल्याने किंवा ती चुकीची असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक लवेसू-२००७/ प.क्र. ७४/मावक-५ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ दिनांक २२ ऑगस्ट २००७ चे शासन निर्णयाआधारे आपले कार्यालयामार्फत किती राजपूत भामटा जातीचे वैध प्रमाणपत्र निर्गमित केले त्यांचे नाव व पत्त्यासहीत माहिती द्यावी किंवा वरिल परीपत्रका अधारे वैध प्रमाणपत्र दिले नसल्यास कोणत्या त्रुटी अभावी प्रमाणपत्र दिले नाही याची माहिती द्यावी. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने ज्या स्वरुपाची मागणी त्यांच्याकडे केली आहे तशा स्वरुपात त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस या पत्राव्दारे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे जातीनिहाय माहिती ठेवली जात नाही. जाती पडताळणी समितीचे कामकाज अर्धन्यायिक स्वरुपाचे असल्याने प्रत्येक प्रकरणी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या पुराव्यावर जात वैधते संदर्भात ते निर्णय देत असतात. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध आहे ते अभिलेखे जन माहिती अधिकारी अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन देऊ शकतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती यांचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २२-०८-२००७ ते १२-१२-२००७ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने राजपूत भामटा जातीची किती प्रमाणपत्रे निर्गमित केली आहेत त्यांची नावे व पत्ते व तसेच या कालावधीमध्ये सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रमाणपत्रे दिली नसल्यास कोणत्या त्रुटीअभावी ही प्रमाणपत्रे दिली गेली नाहीत याची माहिती आवश्यक असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या कार्यालयाची कार्यपध्दती स्पष्ट करुन आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीस अपेक्षित माहिती फक्त त्यांच्या कार्यालयात संबंधित अभिलेख्याची तपासणी अपिलार्थीने केल्यास त्यांना प्राप्त होऊ शकेल. अपिलार्थीस ज्या स्वरुपात माहिती अपेक्षित होती त्या स्वरुपात त्यांच्या कार्यालयामध्ये माहितीचे व्यवस्थापन केले जात नाही. जन माहिती अधिकारी यांनी केलेला हा युक्तिवाद आयोगास योग्य वाटतो व यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात संबंधित अभिलेख्याची तपासणी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत करावी.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस हे अभिलेखे तपासणीकरिता उपलब्ध करुन देतांना त्यांनी कोणतेही शुल्क आकारु नये असेही जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील आवश्यक ते अभिलेखे विनामूल्य तपासणीकरिता उपलब्ध करुन द्यावेत असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

अपील क्रमांक ७९२/२००८

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी न दिल्याने किंवा ती चुकीची असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या स्वतःच्या राजपूत भामटा या जातीच्या दाव्यासंबंधात समितीकडे प्रलंबीत असलेल्या प्रकरण क्रमांक निवड मंडळ/१७८ च्या बाबतीत त्यांचे वैयक्तीक अभिप्राय नोंदविले असून त्यांच्या मूळ अर्जातील प्रत्येक प्रश्नाला जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरातील माहिती कशा प्रकारे दिशाभूल करणारी आहे याचे समर्थन त्यांनी या अर्जामध्ये केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीच्या राजपूत भामटा या जातीच्या दाव्याशी संबंधीत प्रकरण क्रमांक निवड मंडळ/१७८ या संदर्भात समितीने आतापर्यंत निर्णय का घेतला नाही, त्यांच्याशी आजपर्यंत कोणताही पत्रव्यवहार का केला नाही, जन माहिती अधिकारी यांच्याकडे राजपूत भामटा जातीची किती प्रकरणे प्रलंबीत आहेत व ते प्रस्ताव कधी दाखल केले याची माहिती, तसेच एक महिन्याच्या आत जाती पडताळणी समितीला जाती पडताळणी करणे बंधनकारक असतांना का करण्यात आली नाही, शासन निर्णय असतांना समिती अधिक पुराव्याची मागणी करु शकते तर ते कोणत्या आधारे ? अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या पत्रावर कोणतीही कार्यवाही का करण्यात आली नाही - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या प्रश्नांना उत्तरे दिली. तथापि या उत्तरांनी समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत खुलासा देणे बंधनकारक नाही असे नमूद करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या निकालपत्रकाच्या प्रतीवर मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी रविंद्र ज्ञानदेव सोलंकी विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या निर्णयामध्ये दिलेल्या निर्णयाची प्रत अपिलकार यांना देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील संदर्भित केलेले राजपूत भामटा संदर्भातील प्रकरण क्रमांक निवड मंडळ/१७८ हे आता त्यांनी निकाली काढले असून अपिलार्थीचे राजपूत भामटा जातीचे प्रमाणपत्र वैध ठरवून सदर वैधता पत्र क्रमांक २८६० हे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-१२-२००८ रोजी निर्गमित केले आहे. अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या जातीचे वैधता प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या दबावतंत्राचा वापर करु पाहत आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील एकूण सात मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक २ वगळता उर्वरित त्यांच्या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या निर्णयाबद्दलचे स्पटीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात अर्जदारास ती देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सिमीत प्रक्रिया अभिप्रेत आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांच्या कृतीबाबतची अथवा निर्णयाबद्दलची कारणे, स्पष्टीकरणे अपेक्षित करणे अनुज्ञेय नाही. अशा प्रकारे अपिलार्थीने या मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींच्या व्याप्तीबाहेरची असल्याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ वगळता उर्वरित

मुद्दयावरील माहिती  जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही.  अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगास त्यांच्या कार्यालयाची कार्यपध्दती अवगत करुन देण्यात आली आहे.  या कार्यपध्दतीवरुन आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस ज्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे त्या स्वरुपात ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जतन केली  जात नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल होणा-या प्रत्येक प्रकरणावर त्यांच्या कार्यालयातर्फे अर्धन्यायिक स्वरुपाची कार्यवाही करुन नंतरच वैध प्रमाणपत्रे देण्यासंदर्भात निर्णय घेतला जातो, हे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे संबंधित माहितीच्या अभिलेख्यांच्या तपासणीसाठी वेगळ्याने अर्ज करावा, म्हणजे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून त्यांना प्राप्त करुन घेण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करता येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण सात मुद्दयापैकी एका मुद्दयावरील त्यांना देय असलेली माहिती ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित अभिलेख्याची तपासणी करुन प्राप्त करुन घेऊ शकतात. अपिलार्थीने याप्रमाणे कार्यवाही करावी, असे त्यांना या टप्प्यावर आयोगातर्फे सुचविण्यात येत आहे.

प्रसंगावशात् आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, विभागीय जाती पडताळणी समिती यांच्याकडे बहुतांशी माहितीसाठी प्राप्त होणारे अर्ज हे या प्रकरणी अपिलार्थीने विचारलेल्या माहितीशी सुसंगत असे असतात.  बहुसंख्य अर्जदारांना या समितीकडे जातीनिहाय किती प्रकरणे प्राप्त झाली, त्यापैकी किती प्रकरणे वैध ठरवली गेली, किती अवैध ठरली गेली अशा प्रकारची माहिती मिळविण्यामध्ये स्वारस्य असते.  त्यामुळे सामाजिक न्याय विभागाने जाती पडताळणी समितीकडील माहितीच्या व्यवस्थापनासाठी संगणकाचा वापर करणे अधिक योग्य राहील, असे

आयोगास वाटते. तसेच या समितीने प्रत्येक प्रकरणी दिलेला निर्णय सामाजिक न्याय विभागाने त्यांच्याकडील संकेतस्थळावर त्याच दिवशी जर प्रसिध्द केला तर सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या जाती पडताळणी समितीच्या कारभारामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणणे या विभागास सुलभ होईल आणि त्यांच्याकडे माहिती मागण्याचे प्रमाण देखील कमी होईल असे आयोगास वाटते. या सूचना सचिव (सामाजिक न्याय) यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार) च्या तरतुदीप्रमाणे देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गणेश नंदराम बहुरे, व्दारा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७९३

निर्णय दिनांक ०६-०७-२००९

१ श्री. सदाशिव भिमराव कराड, : अपिलार्थी
रुकमे नगर, अहमदपूर, तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, अहमदपूर,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

सध्याचे जन माहिती अधिकारी : कार्यालय अधिक्षक,
नगर परिषद, अहमदपूर, जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील मान्य केले, जन माहिती अधिकारी यांनी पृष्ठसंख्या व शुल्क नमूद न करुन, त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केले असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी मान्य केले आहे आणि जन माहिती अधिका-यावर शास्ती लावण्याबाबत आणि सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे अधिकार नसल्याने त्यांनी ती कारवाई करण्याची असमर्थता दर्शविली, जन अपिलीय अधिकारी यांनी सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देणे त्यांना बंधनकारक असतांना त्यांनी तसे आदेश दिले नाही व सात दिवस पूर्ण झाले तरी त्यांना

अद्यापही माहिती मिळाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील ११ कर्मचा-यांच्या संदर्भात ते रुजू झाल्यापासून ते दिनांक १७-०६-२००२ च्या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कर्मचा-यांनी उचललेला पगार कोणत्या आधारे उचलला त्याची नोंद ज्या रेकॉर्डवर केली गेली आहे त्या रेकॉर्डच्या सत्यप्रती आणि त्या कर्मचा-यांनी शाळा सोडल्याचा दाखला, मार्कस् मेमो व सनद - यांच्या प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमत: त्यांच्या दिनांक १२-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असल्याचे व ती हस्तगत करुन घेण्यासाठी कळविले व त्यानंतर दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३७८ इतके त्यांच्या कार्यालयात भरणा करुन माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील २ मुद्दयापैकी एका मुद्दयावरील माहिती दिली व उर्वरित मुद्दयाव्दारे अपिलार्थीने त्यांच्यकडे मागणी केलेली माहिती कर्मचा-यांच्या वैयक्तीक अभिलेख्याशी संबंधित असल्याने ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांच्या माहिती अधिकाराचे हनन झाल्यामुळे व अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत माहिती प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर आर्थिक व शिस्तभंगविषयक कारवाईची

शास्ती लावण्याची मागणी केली. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक १८-०३-२००८ रोजी निर्णय घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती त्यांना दिनांक २८-०४-२००८ रोजी दिली. तथापि अपिलार्थीने यापूर्वीच वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले होते.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी सध्याचे जन माहिती व तत्कालीन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दिनांक २१-०२-२००८ रोजी व तदनंतर दिनांक २८-०४-२००८ रोजी माहिती पुरविली आहे. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याच्या त्यांच्या विधानाप्रीत्यर्थ त्यांनी अपिलार्थीस माहिती मिळाल्याची दिनांक २८-०४-२००८ रोजीची पोच पावती आयोगास सादर केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची अपेक्षा केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील उर्वरित सर्व घडामोडी ज्ञात करुन घेणे ही अर्जदाराची वैयक्तीक जबाबदारी आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असल्याचे अपिलार्थीस कळविण्याची या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना आवश्यकता नव्हती तरीही त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १२-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती तयार असल्याचे अवगत केले आहे. तदनंतर दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३७८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या

शुल्काचा तपशील, जसे, अपिलार्थीस देण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची अंदाजित संख्या, याकरिता निर्धारित केलेला प्रतिपृष्ठ दर, शुल्क कोणत्या शीर्षाखाली व कोठे भरावयाचे याचा तपशील, जो अधिनियमातील कलम ७ (३) (क) अन्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविणे आवश्यक होते तो दिलेला नाही. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दिनांक २१-०२-२००८ रोजीचे शुल्क भरण्याचे पत्र अवैध ठरत आहे. परिणामी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ३७८ त्यांना आता परत करावे लागेल.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये आयोगाकडून जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित करण्याचे अपेक्षित केले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर असद्‌हेतूने टाळाटाळ केली असल्याचे अथवा दुष्ट हेतूने अपिलार्थीपासून माहिती दडवून ठेवली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे मुद्दा क्रमांक १ ची माहिती दिली आहे व मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्याने देण्याचे नाकारले. ही माहिती अपिलार्थीस देण्याचे नाकारतांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारण्याची कारणे अपिलार्थीला कळविली आहेत. त्यामुळे ही माहिती न देण्यामध्ये यांचा कोणताही असदहेतू असल्याचे संभवत नाही. आयोगास, सर्वसाधारणपणे जन माहिती अधिकारी यांचा असा समज असल्याचे आढळून आले आहे की, अर्जदाराने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप कसेही असले तरी, ही माहिती, मागणी करणा-या अर्जदारास देण्यासाठी त्रयस्थ पक्षाची संमती मागणे त्यांना अनिवार्य आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यास ती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्रयस्थ पक्षाच्या संमतीची, सर्वसाधारण परिस्थितीत आवश्यकता असू नये. कारण त्रयस्थ

पक्षास संबंधित प्राधिकरणाकडे त्यांनी सादर केलेल्या त्यांच्या अशाप्रकारच्या मार्कस् मेमो, शाळा सोडल्याचा दाखला इत्यादी कागदपत्राआधारे नेमणूक दिली जाते व तदनंतर त्यांच्या सेवेचे सर्व आर्थिक फायदे त्यांना हयातभर संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त होत असतात. त्रयस्थ पक्षाचे वेतन व इतर प्राप्त होणारे आर्थिक फायदे हे जनतेकडून सार्वजनिक प्राधिकरणास प्राप्त होणाऱ्या कराच्या रकमेतून अदा करण्यात येत असल्याने या माहितीचे स्वरुप सात्रजनिक होत आहे, त्यामुळे जनसामान्यांना त्रयस्थ पक्षासंदर्भात ही माहिती मिळण्याचा अधिकार आपोआप प्राप्त होत असतो. ही पार्श्वभूमी पाहता अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती व शिस्तभंगविषयक कारवाईच्या संदर्भात केलेली विनंती आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ३७८ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सदाशिव भिमराव कराड, रुकमे नगर, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७९४
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

१. श्री. बाबासाहेब वाल्मीक नरोडेपाटील, : अपिलार्थी
ता.जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय,गंगापूर, जि.औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना निर्धारित वेळेच्या आत माहिती मिळाली नाही व जी माहिती प्राप्त झाली ती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०१.०१.२००५ ते दि. १६.०४.२००८ पर्यंतच्या कालावधीतील गंगापूर शहरातील स्वस्त धान्य दुकानाच्या स्टॉक रजिस्टर व सेल रजिस्टरच्या प्रतींची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गंगापूर शहरातील स्वस्त धान्य दुकानांची संख्या, त्यांचे स्टॉक व सेल रजिस्टर, स्वस्त धान्य दुकानदार रेशनचा माल काय किंमतीने विकत आहेत, गंगापूर तालुका व शहरामधील एका नावाच्या दुकानांची संख्या- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी केव्हा प्रतिसाद दिला हे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे व तसेच त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती त्यांनी आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडली नसल्याने कळण्यास मार्ग नाही. त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भात निर्णय दिला किंवा कसे हे आयोगास, अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जाबरोबर जोडलेल्या कागदपत्रांमध्ये समाविष्ट केले नसल्याने, आयोगास, कळण्यास मार्ग नाही. यानंतर अपिलार्थीने दि. १५.०९.२००८ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे त्यांना निर्धारित वेळेच्या आत माहिती मिळाली नाही व अपूर्ण माहिती मिळाली हे कारण दर्शवून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाही. अपिलार्थीने आयोगास त्यांच्या द्वितीय अपील अर्जाबरोबर त्यांच्या माहितीसाठीच्या विहित नमुन्यातील प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज एवढीच कागदपत्रे झेरॉक्स प्रतीमध्ये सादर केली आहेत. यावरुन अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अप्राप्त आहे व तसेच त्यांना माहिती कधी मिळाली याचा बोध होत नाही. यासंबंधी अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत त्यांच्या म्हणण्यापृष्ठ्यर्थ कोणतीही कागदपत्रे व पुरावा सादर न केल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०७-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबासाहेब वाल्मीक नरोडेपाटील,आर.एक्स.६१२,विकास हौसिंग सोसायटी,अयोध्या-नगर रोड, बजाजनगर,एम.आय.डी.सी. वाळुज, ता.जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७९५
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

१ श्री. डी. ए.देशमुख, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अप्राप्त असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले व त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय अद्यापपावेतो प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "स्व.मिनाताई ठाकरे बचत गट दहिगाव येथील बचत गटाचे खाते नंबर ९२१ मधील रु.१,१०,०००/- परस्पर काढण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीच्या प्रती" ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.०९.२००७ रोजीच्या पत्रान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद यांना सूचना देऊन स्वर्गीय मिनाताई ठाकरे महिला बचत गट यांच्याविरुध्द आलेल्या तक्रारीसंदर्भात सविस्तर चौकशी करुन त्यांच्या कार्यालयात अहवाल सादर करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २९.०९.२००७ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली आहे व तसा पुरावा आयोगास सादर केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची त्यावेळेची स्थिती अपिलार्थीस पोस्टाद्वारे प्रथमतः दि. २९.०९.२००७ रोजी कळविल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांचे दि.२९.०९.२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने व त्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याचा समज झाल्याने, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.११.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले.अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.११.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. परंतु हे आदेश त्यांनी अपिलार्थीस लागलीच न पाठविता, आयोगाकडील आज रोजीच्या सुनावणीच्या आदल्या दिवशी पाठविले आहेत. परिणामी जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. २७.०९.२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात कोणतेही पत्र अद्यापपावेतो प्राप्त झालेले नाही. त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाने माहिती मागितली असता, त्यांना साध्या पोस्टाने माहिती पाठविली आहे. या जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याशी ते सहमत नाहीत.

तसेच जन अपिलीय अधिकारी यांचा, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय त्यांना अद्यापपावेतो प्राप्त झालेला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, मौ.दहिगाव ता.जाफ्राबाद जि.जालना येथील  स्वर्गीय मिनाताई ठाकरे महिला बचत गटातील सदस्यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,जालना यांच्याकडे दि.२८.०८.२००७ रोजी एक तक्रार केली होती की, या बचत गटातील काही सदस्यांनी रु.१,१०,०००/- इतक्या रकमेची अफरातफर केली आहे. ही तक्रार जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी संबंधित बचत गटाचे अध्यक्ष व सचिव यांना खुलासा करण्याचे पत्र दिले आणि या पत्राची प्रत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद यांना व शाखा व्यवस्थापक,बँक ऑफ महाराष्ट्र,शाखा टेंभुर्णी यांना पाठविली. तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद व शाखा व्यवस्थापक,बँक ऑफ महाराष्ट्र,शाखा टेंभुर्णी यांना स्वतंत्र पत्र पाठवून या प्रकरणात चौकशी करण्याबाबत कळविले व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दि.२९.९.२००७ रोजी पाठविली असून चौकशी अहवाल प्राप्त होताच चौकशी अहवालाची प्रत त्यांना देण्यात येईल, असे आश्वासित केले होते. तथापि पुढे या बचतगटातील तक्रारकर्त्या सदस्यांनी त्यांची ही तक्रार स्वत:हून मागे घेतली असल्याने, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील संदर्भित केलेल्या तक्रार अर्जावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णय वेळीच पाठविला नसल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले व याबाबत आयोगाकडे दिलगिरी व्यक्त केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि.२७.०९.२००७ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कार्यवाही करुन अपिलार्थीने संदर्भित केलेल्या तक्रारीसंदर्भातील चौकशी अहवाल गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद यांना त्यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीला दिलेली आहे. तथापि ती प्रत अपिलार्थीस प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे

आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याचा सबळ पुरावा - त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीमधील नोंदीची प्रत - आयोगास सादर केली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित तत्कालीन वस्तुस्थिती त्यांना अवगत केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी पत्र पाठवूनही जर ते अपिलार्थीस प्राप्त झाले नसेल तर ते पोस्टातून गहाळ झाले असल्याची किंवा इतर कारणास्तव अपिलार्थीस प्राप्त झाले नसावे, असे अनुमान काढण्यास हरकत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे,फक्त त्यामध्ये अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचा संदर्भ त्यांनी दिल्याचे आढळून येत नाही. या प्रकरणाशी संबंधित सर्व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत त्यांच्या दि.०४.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे गट विकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविली आहे, या प्रीत्यर्थ त्यांच्याकडील पोस्टाची पावती जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केली आहे. ही पावती अपिलार्थीस दाखविली असता, या पावतीवरील सही त्यांची नाही, असे अपिलार्थीने आयोगास अवगत केले आहे. या संपूर्ण घटनाक्रमातील या दोन घटना पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्‌हेतूने माहिती दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे संबंधितांच्यावर कारवाई करण्याची केलेली मागणी आयोग अमान्य करीत आहे.

या प्रकरणी असेही निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीच्या दि.११.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.११.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. परंतु हे आदेश त्यांनी अपिलार्थीस लागलीच न पाठविता, आयोगाकडील आज रोजीच्या सुनावणीच्या आदल्या दिवशी पाठविले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थीस असे अवगत केले आहे की, त्यांना अपेक्षित असलेला अहवाल, संबंधित बचत गटाने तक्रार मागे घेतली असल्याने तयार केला गेला नाही, त्यामुळे बचत गटाने तक्रार मागे घेतलेल्या निवेदनाची प्रत अपिलार्थीस देण्यात यावी. अशारितीने, अपिलार्थीच्या प्रथम

अपील अर्जावरील जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयाची प्रत अपिलार्थीस एक वर्ष सात महिने इतक्या विलंबाने दिली गेली आहे. यासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे दाखल झालेल्या प्रत्येक अपील अर्जावर त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) प्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही करुन आपल्या निर्णयाची प्रत सर्व संबंधितांना वेळेत पोहोचेल याची दक्षता घ्यावी, तसेच त्यांच्या कार्यालयातील ज्या लिपीकाने अपिलार्थीस त्यांच्या दि. २७.११.२००७ रोजीचा निर्णय वेळीच कळविला नाही, त्या लिपीकावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जरी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना यापूर्वी पाठविली असली तरी ती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे त्यांचे म्हणणे असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वर निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत पुरवावी, म्हणजे याबाबत अपिलार्थीची पुढे कोणतीही तक्रार शिल्लक राहणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वर निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः, दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०७-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. डी. ए.देशमुख,संपादक, साप्ताहिक जालना-शक्ती,देहेडकरवाडी,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७९६
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. रमेश गणपतराव तारगे,<br>रा.घनसावंगी, ता.घनसावंगी,जि.जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल-२),<br>तहसील कार्यालय,घनसावंगी,जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,घनसावंगी,जि.जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग घनसावंगी यांच्यामार्फत, दि. ०१ ऑक्टोबर,२००७ ते दि.१५ मार्च, २००८ या कालावधीमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत केल्या गेलेल्या कामाच्या साप्ताहिक अहवालाच्या नकला मागितल्या होत्या. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर तहसीलदार घनसावंगी यांनी त्यांच्या दि. २४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे उपअभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग,घनसावंगी यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या साप्ताहिक अहवालाच्या प्रती, त्यांच्या कार्यालयात पाठविण्याचे किंवा ही माहिती

अपिलार्थीस परस्पर देण्याचे त्यांना सूचित केले व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२४.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर तहसीलदार, घनसावंगी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता, उपअभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) घनसावंगी उपविभाग यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले व न दिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उपअभियंता यांच्यावर राहिल, असे त्यांना त्यांच्या दि. ०५.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयास उपअभियंता,ल.पा.(स्थानिक स्तर) उपविभाग,घनसावंगी यांच्या कार्यालयातून, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या कालावधीतील मजूरांच्या साप्ताहिक अहवालाच्या प्रती त्यांना प्राप्त झाल्या नाहीत, त्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी स्वतः प्रतिसाद देण्याच्याऐवजी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित आहे, त्या कार्यालयाशी पत्रव्यवहार करुन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी, ती त्यांच्या कार्यालयात पाठविण्याची किंवा अपिलार्थीस ती माहिती परस्पर देण्याचे त्यांच्या दि. २४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. याच प्रकारची पुनरावृत्ती त्यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रथम अपील

अर्जाच्या संदर्भात केली आहे.यासंबंधी तहसीलदार,घनसावंगी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसलेली माहिती, त्यांना प्राप्त झालेल्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार मागितली असल्याने, त्यांनी अपिलार्थीशी सर्व पत्रव्यवहार करणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशी कोणतीही कृती न करता,अपिलार्थीने ज्या कार्यालयाशी संबंधित माहिती त्यांच्याकडे मागितली आहे, त्या कार्यालयास अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे सूचित केले, ही तहसीलदार,घनसावंगी यांची कृती सर्वथा गैर व त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करणारी आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही, असे अधिनियमातील कलम ७ (८) च्या तरतुदीनुसार त्यांना कळवावयास हवे होते. त्याचबरोबर अपिलार्थीच्या दि.२४.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी सुनावणी घेऊन यासंबंधी आपला निर्णय दिला असता तर कदाचित अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीची तत्कालीन स्थिती ज्ञात झाली असती. परंतु अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर देखील तहसीलदार,घनसावंगी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे चुकीची कृती केली आहे.तेव्हा अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित उपअभियंता यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. जर ही माहिती त्यांना त्रयस्थ पक्षाकडून उपलब्ध करुन दिली गेली नाही तर त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अधिनियमातील कलम ७ (८) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस कळवावे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केल्यास असे आढळून येते की, मजूरांच्या साप्ताहिक अहवालाच्या प्रतींची माहिती तहसीलदार कार्यालयात निश्चितपणे उपलब्ध असावयास हवी. कारण रोजगार हमी योजनेच्या कामासंबंधी प्रत्येक क्षेत्रीय यंत्रणेकडून साप्ताहिक अहवालाच्या प्रती संबंधित तहसीलदार यांच्याकडे पाठविल्या जातात. या प्रकरणी जर अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या दि. ०१.१०.२००७ ते दि.१५.०३.२००८ या कालावधीमध्ये कामे बंद असतील तर त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावे, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे,हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेश गणपतराव तारगे,रा.घनसावंगी, ता.घनसावंगी,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२),तहसील कार्यालय, घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,घनसावंगी,जि.जालना यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७९७
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सदाशिव रामभाऊ तिडके,<br>रा.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा परिषद,जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद,जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.१७.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.११.०३.२००८ रोजी घेतलेल्या सुनावणी संदर्भातील निर्णय त्यांना अद्यापपावेतो प्राप्त झाला नाही. त्यांच्या दि. २२.१२.२००७ रोजीच्या अर्जामधील माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नाही. जी माहिती दिली ती चुकीची व दिशाभूल करणारी दिली. यानंतर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली,त्या सुनावणी संदर्भातील आदेश त्यांना अद्यापपावेतो प्राप्त झालेले नाहीत, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. व्ही.आर.तिडके,वैद्यकीय अधिकारी,नागरी रुग्णालय,परतूर

जि.जालना यांच्या संबंधी सन १९९३ ते १९९६ या कालावधीतील काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. व्ही. आर.तिडके, वैद्यकीय अधिकारी हे जालना जिल्हा परिषदेमध्ये कोणत्या ठिकाणाहून बदलून आले व कधी रुजू झाले तो दिनांक, त्रयस्थ पक्षाला सेवाविषयक सर्व लाभ देण्यात आले आहेत काय, त्रयस्थ पक्षाचे सेवापुस्तिका अद्ययावत करुन वेतननिश्चिती करण्यात आली आहे काय, त्रयस्थ पक्षाच्या अंतिम वेतन प्रमाणपत्राची व सेवापुस्तिकेची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, त्रयस्थ पक्ष ज्या ठिकाणाहून त्यांच्याकडे बदलून आला त्या ठिकाणाहून त्रयस्थ पक्षाची सेवापुस्तिका त्यांच्या कार्यालयात प्राप्त न झाल्याने माहिती देण्यास विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांनी पुढे असेही कळविले आहे की, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देणे शक्य नाही. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०३.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित केले. तथापि या निर्णयाची प्रत जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागातील जावक विभागातून दि.२२.०४.२००८ रोजी निर्गमित केली गेली. त्यामुळे प्रत्यक्षात अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची प्रत त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दि. १०.०३.२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात

उपलब्ध असलेली माहिती त्यांना व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. अपिलार्थीस दिलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या नऊ इतकी आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील एकूण पाच मुद्यांपैकी मुद्दा क्र.२ व ३ शी संबंधित माहिती त्यांना देय नाही. कारण अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशाप्रकारे कोणत्याही विषयावरील जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय, स्पष्टीकरणे अथवा त्यांच्या कृतीबद्दलचे कारणे विचारणे अनुज्ञेय नाही. या अधिनियमामध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांना ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया समाविष्ट आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ च्या संदर्भातील माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या, 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याचे दिसून येते व त्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. त्याचबरोबर या प्रकरणाचे वैशिष्ट्य असे आहे की, श्री.व्ही.आर.तिडके,वैद्यकीय अधिकारी यांची सेवापुस्तिका जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात ते ज्या ठिकाणाहून बदलून आले, त्या ठिकाणाहून प्राप्त झाली नव्हती, त्यामुळे देखील त्यांना अपिलार्थीच्या मुद्दा क्र.२ व ३ च्या संदर्भातील माहिती  देणे शक्य होणार नव्हते. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१,४ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने, देय होत आहे व ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.०३.२००८ रोजी व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. वास्तविक पाहता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देण्यासाठी फारसे कष्ट पडले असते,

अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. केवळ अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जावर करावयाच्या कार्यवाहीपासून सुटका करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२१.०१.२००८ रोजी त्रयस्थ पक्षाची सेवापुस्तिका त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने माहिती देण्यास विलंब लागेल, असे मोघम विधान या पत्राद्वारे त्यांनी केले.जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.११.०३.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये देखील या प्रकरणी जिल्हा परिषद,जालना यांच्याकडील आरोग्य विभागातील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाची निष्काळजीपणे हाताळणी केल्याचे नमूद केले आहे व त्याचबरोबर त्यांनी आरोग्य विभागातील कार्यालयीन पध्दतीबाबत त्यांचे अभिप्राय देखील नोंदविले आहेत. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी एकूण ४७ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याचे आयोगास आढळून आले आहे. या विलंबाची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली असता, त्यांनी या पदावर ते दि. ०३.०१.२००८ पासून कार्यरत असल्याचे व अपिलार्थीने विचारणा केलेली यासंबंधातील कागदपत्रे त्यांच्या कार्यालयातील आस्थापना विभागातील जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी वेळेवर सादर न केल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस पुरविण्यासाठी विलंब लागला असे आयोगास अवगत केले. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे, ही तरतूद पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील आस्थापनाविषयक बाबी हाताळणारे सर्व संबंधित कर्मचारी एकत्रितपणे जबाबदार ठरत आहेत. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने माहिती देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक/कर्मचारी यांच्यावर

प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१०.०३.२००८ रोजी पुरविलेली माहिती ही त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सदाशिव रामभाऊ तिडके,महात्मा फुले मार्ग, हनुमान मंदिर रोड,शाहुनगर, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,जालना यांना या

निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७९८
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. रमाकांत गुरुलिंगअप्पा तिळकरी,<br>रा.परळी वैजनाथ,जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>स्वामी विवेकानंद विद्यामंदिर,<br>परळी वैजनाथ,जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती,परळी वैजनाथ,<br>जि.बीड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०४.२००८ रोजी फेर नोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही व जी माहिती दिली ती चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे वाटल्यावरुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नसल्याने व यासंबंधी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या संबंधी सन १९९४ ते २००६ या कालावधीतील काही माहिती एकूण १४ मुद्यांद्वारे व पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०९.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१३०/- इतके त्यांच्या शाळेमध्ये भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.०१.२००७ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.०२.२००७ रोजी पोस्टाद्वारे माहिती पाठविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.०३.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याचे त्यांना वाटल्यावरुन, त्यांनी  वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ ते ७ व १० ते १४ या मुद्यासंबंधातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणूनबुजून दिली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन शिस्तभंगाची कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीकडून त्यांना माहितीसाठी प्राप्त झालेल्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने फक्त दहा मुद्यांचाच उल्लेख केलेला आहे. उर्वरित चार मुद्यांचा उल्लेख असलेल्या अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एका पृष्ठाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही

व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. १५.०२.२००७ रोजी पोस्टाद्वारे पाठविली आहे. त्यांच्याकडून अपिलार्थीस आता फक्त अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ शी संबंधित माहिती देणे बाकी आहे. ही माहिती गट शिक्षणाधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडे असण्याची शक्यता आहे. त्यांच्याकडे सध्या ही माहिती उपलब्ध नाही, कारण ही माहिती ज्या मुख्याध्यापकाच्या ताब्यात होती, ते मुख्याध्यापक आता शाळेमध्ये शिक्षक या पदावर कार्यरत आहेत, ते ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी, जन माहिती अधिकारी तयार नाहीत. अपिलार्थी हे त्यांच्या शाळेत सेवक या पदावर काम करणारे कर्मचारी असून ते जन माहिती अधिकारी यांना केवळ त्रास देण्यासाठी अशाप्रकारची माहिती मागवित असतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय नाही, कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ ते ७ व १० ते १४ या मुद्यांशी संबंधित माहिती त्यांना मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. तथापि त्यांचा हा दावा सिध्द करण्यासाठी त्यांनी आयोगास उद्देशून केलेल्या आपल्या द्वितीय अपील अर्जासोबत कोणताही पुरावा जोडलेला नाही.आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्याकडे अपिलार्थीच्या प्राप्त झालेल्या अर्जामध्ये फक्त दहाच मुद्यांचा उल्लेख आहे आणि त्यापैकी मुद्दा क्र. ६ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही व ती माहिती ज्या शिक्षकाकडे उपलब्ध आहे, ती माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात ते कोणतेही सहकार्य करीत नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.६ शी संबंधित माहिती गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,परळी वै. अथवा शिक्षणाधिकारी जि.प.बीड यांच्याकडे असण्याची शक्यता वर्तविली आहे व ही माहिती

अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे स्पष्ट केल्याप्रमाणे, सचिव,श्री गजानन शिक्षण संस्था,परळी वै.यांना, त्यांच्या संस्थेच्या या शाळेतील शिक्षक श्री. एम.ए.बुद्रुककर यांच्यावर त्यांनी शाळेचे अभिलेखे हेतुपूरस्सर दडवून ठेवल्याबद्दल सचिवांना आवश्यक वाटल्यास फौजदारी कारवाई करण्याचा विचार करावा, असे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०९.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१३०/- इतके त्यांच्या शाळेमध्ये भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दि. ११.०१.२००७ रोजी सदरचे शुल्क शाळेमध्ये भरले. तथापि ही माहिती त्यांना दि. १५.०१.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी देण्याच्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दि.१५.०२.२००७ रोजी पुरविली. याचाच अर्थ त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवूनही, माहिती देण्यासाठी अपिलार्थीकडून शुल्क आकारले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असल्याने आता त्यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे आकारलेले शुल्क रु.१३०/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.६ शी संबंधित वर निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच त्यांना तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.१३०/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमाकांत गुरुलिंगअप्पा तिळकरी,पेठ गल्ली, मु.पो.परळी वैजनाथ,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,स्वामी विवेकानंद विद्यामंदिर,परळी वैजनाथ,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,परळी वैजनाथ,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७९९
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. उध्दव रंगनाथ रासकर,<br>मु.पो.कोळगाव,रा.गेवराई,जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद,बीड यांचे कार्यालय. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद,बीड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देता,प्रथमतः खोटी माहिती पुरविल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले असता, तरतुदीनुसार सुनावणी ठेवली नाही व यासंबंधी आपला निर्णय पारित केला नाही. त्यामुळे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना अधिनियमानुसार दंडित करुन अपिलार्थीस विनाशुल्क माहिती देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०१.२००८ रोजी त्यांच्या नुतन डोमरेश्वर विद्यालय,डोमरी, ता.पाटोदा,जि.बीड या शाळेशी संबंधित काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी दि. ०४.०२.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याने व अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहिल्याने, त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,बीड यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला अंतिम निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०४.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य

विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०७-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उध्दव रंगनाथ रासकर,मु.पो.कोळगाव,ता.गेवराई,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी,शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,बीड यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८००
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

१. श्री. वैजनाथ भानुदास गायकवाड, : अपिलार्थी
रा.परळी वैजनाथ,जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, बीड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,बीड.

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,बीड.

त्रयस्थ पक्ष : श्री. उध्दव संदीपान भोरे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपील अर्जासोबत त्यांनी मा. आयुक्तांना उद्देशून एक वेगळा अर्ज केला असून त्या अर्जामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना हवी असलेली माहिती त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दिनांकापासून आठ दिवसांच्या आत पुरविण्यात यावी, असा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी दि. ०७.०३.२००८ रोजी देऊन वीस दिवसांचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही. या अर्जामध्ये अपिलार्थीने माहिती आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी व आदेशाचे पालन न करणाऱ्या

निगरगट्ट माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जि.प. बीड यांना नियमाप्रमाणे दंडीत करुन अपिलार्थीस न्याय मिळावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जि.प.बीड यांनी अंबाजोगाई येथे दि.२९.१२.२००७ व दि.३१.१२.२००७ रोजी श्री. उध्दव संदीपान भोरे यांच्या केलेल्या चौकशी अहवालाच्या सत्यप्रतीबाबत आणि या चौकशीमध्ये श्री. भोरे यांनी केलेल्या खुलाशाच्या सत्यप्रतीसह इतर ६ मुद्यांवर माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये चौकशी अहवाल आणि श्री. उध्दव भोरे यांनी केलेल्या खुलाशाच्या प्रतीव्यतिरिक्त अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या दि.०१.०१.२००५ ते दि.३१.०१.२००८ च्या आवक-जावक रजिस्टरच्या सत्यप्रती, जन माहिती अधिकारी यांनी उपोषणार्थी राजाभाऊ निवृत्ती आदमाने यांना दिलेल्या पत्रानुसार श्री. उध्दव भोरे यांच्यावर काय कारवाई केली व चौकशीसाठी केव्हा व कोणाची नियुक्ती केली, "गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाईकरिता" म्हणून जी स्वाक्षरी केली आहे, ती स्वाक्षरी कोणाची, याचे स्पष्टीकरण, श्री. उध्दव संदीपान भोरे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना पंचायत समिती कार्यालय,अंबाजोगाईमार्फत दिलेल्या उत्तराची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जि.प.बीड कार्यालयाने कोणत्या आवक-जावक रजिस्टरमध्ये नोंद केली आहे, त्याचा आवक क्रमांक दिनांकासह साक्षांकित करुन,गट विकास अधिकारी,पंचायत समिती,अंबाजोगाई यांनी दि.१२.०९.२००६ व दि.११.१०.२००६ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.बीड यांना दिलेला चौकशी अहवाल खोटा आहे काय, याचे स्पष्टीकरण व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांच्या दि.२९.१.२००७ रोजीच्या पत्रातील मजकूर, त्यामध्ये नोंद असलेल्या पत्रानुसार खरा किंवा खोटा आहे, याचा खुलासा - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते

दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे व जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०४.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१४,०९४/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता अपिलार्थीने दि. ११.०२.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा प्रथमतः सादर केला. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.२०.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून तपासावी, असे सूचित केले. त्यांच्या अशाप्रकारच्या सूचनेसह जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये असा खुलासा केला आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी एकूण ८ ते ९ हजार रुपये इतका खर्च येणार आहे. परंतु त्यांच्या कार्यालयाकडे आकस्मिक खर्चापाटीची फक्त रु.१०६०/- इतकी रक्कम शिल्लक आहे. यावरुन आवश्यक त्या निधीच्या अनुपलब्धतेमुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दाखविण्यासाठी सूचविले असावे, असे अनुमान काढण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात हजर राहिले नाहीत, मात्र तदनंतर त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच त्रयस्थ पक्ष त्यांच्या वकिलासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीसाठीच्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०३.२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी सादर केला. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते ही माहिती तपासणीसाठी कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या अंदाजे ७०४५ इतकी असल्याने व इतक्या पृष्ठांच्या प्रतींची झेरॉक्स काढण्याइतपत त्यांच्याकडे अनुदान उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीस माहितीची तपासणी करण्याचे त्यांच्याकडील दि.२०.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचविले.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी त्यांचा काहीही संबंध नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागविली आहे, परंतु जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये एकूण ७ मुद्यांशी संबंधित माहिती मागविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये मुद्दा क्र.३ चा त्यांनी आयोगाकडे, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या तपशीलामध्ये समावेश केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३

व्यतिरिक्त उर्वरित माहितीचा परामर्ष या निकालपत्रामध्ये घेण्यात येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या अर्जातील मुद्दा क्र.३,६ व ७ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे मत व स्पष्टीकरण अपेक्षिले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे मत,अभिप्राय व स्पष्टीकरणे अपेक्षित करणाऱ्या स्वरुपात माहिती मागणे त्यांना अनुज्ञेय नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती ज्या स्वरुपात त्यांच्याकडे उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंबंधी कार्यवाही करण्याइतपत सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील मुद्दा क्र.३,६ व ७ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र आयोगाकडे केलेल्या अर्जातील मुद्दा क्र.१,२ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षिली आहे.त्यामुळे आता अपिलार्थीस आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील मुद्दा क्र.१,२ व ५ शी संबंधित माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, पूर्वनियोजित वेळेत व दिनांकास स्वतः हजर राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.३,६ व ७ वगळता उर्वरित सर्व मुद्यावरील संपूर्ण माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, हा कालावधी व्यपगत झाल्यानंतर ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही.

या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीस माहिती देण्याचे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही विशिष्ट असद्हेतूने टाळाटाळ केली नाही किंवा एखाद्या दुष्ट हेतूने माहिती दडविली नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधाने त्यांनी प्रत्येक टप्प्यावर सकारात्मक दृष्टीकोन ठेवला आहे. अपिलार्थीस माहिती प्रत्यक्षतः तपासून घेऊन जाण्याच्या त्यांच्या अपिलार्थीस दिलेल्या सूचनाही त्यांनी त्यांच्याकडील आवश्यक त्या अनुदानाच्या अनुपलब्धतेच्या पार्श्वभूमीवर केल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस खरोखरीच माहितीची आवश्यकता होती किंवा कसे हे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सूचना करुनही ते त्यांच्या कार्यालयात उपस्थित न राहिल्याने, आयोगास कळण्यास मार्ग नाही. या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाईची शिफारस करणे आयोग उचित समजत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील मुद्दा क्र.१,२ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०७-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वैजनाथ भानुदास गायकवाड,सिध्दार्थनगर,परळी वैजनाथ,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८०१
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दत्ताजी पिराजी जेगतकर,<br>रा.अंबाजोगाई,जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>योगेश्वरी नूतन विद्यालय,अंबाजोगाई, जि. बीड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव,<br>योगेश्वरी शिक्षण संस्था,अंबाजोगाई,<br>जि.बीड | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती न मिळाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०१.२००८ रोजी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, परंतु ही माहिती सुधारित करुन अपिलार्थीस देण्याचे सूचित करण्याचा त्यांचा आदेश पूर्णपणे चुकीचा आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती न पुरविल्याने, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी तथा मुख्याध्यापक, योगेश्वरी नूतन विद्यालय, (माध्यमिक विभाग),अंबाजोगाई, जि.बीड यांच्याकडे सन १९८६-८७ व १९८७-८८ या कालावधीतील सेवाज्येष्ठतेच्या यादीसंदर्भातील माहितीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०१.२००८ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याचे मान्य केल्यामुळे, अपिलार्थीचे अपील निकाली काढले व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नवीन सुधारीत याद्या तयार करुन त्या देण्याची व्यवस्था करावी, असे त्यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी  वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार ही माहिती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांना बंधनकारक आहे. परंतु सर्वसाधारणपणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये साधारणत: प्रतिवर्षी त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठता यादी नियमितपणे प्रसिध्द केल्या जाव्यात, असे संकेत आहेत. त्याप्रमाणे अपिलार्थीने ज्या शाळेकडे माहिती मागितली होती, त्या शाळेने

अशाप्रकारे दरवर्षी सेवाजेष्ठता याद्या करुन ठेवल्या असाव्यात, असे गृहीत धरण्यात येत आहे. तथापि माध्यमिक शाळा संहितेमध्ये शिक्षकांच्या सेवाज्येष्ठता याद्या जतन करुन ठेवण्याच्या कालावधीचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या दि.११.०१.२००८ रोजीच्या आदेशाचे, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत अनुपालन करुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना,हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्ताजी पिराजी जेगतकर,योगेश्वरी नूतन विद्यालय (माध्यमिक विभाग),अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, योगेश्वरी नूतन विद्यालय,(माध्यमिक विभाग) अंबाजोगाई, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,योगेश्वरी शिक्षण संस्था,अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८०२
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

१. श्री. आसिफ खान युसूफ खान, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
संचालक,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव (शैक्षणिक विभाग)
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध असतानादेखील त्यांना माहिती न दिल्याने नाराजीने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०३.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील ४२ महाविद्यालयांच्या प्राचार्य व प्राध्यापक यांच्या

शैक्षणिक अर्हता, राहण्याचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक,पिनकोडसह व भ्रमणध्वनी क्रमांक यांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन २००१-२००७ असा आहे. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.०५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.८०/- इतके विद्यापीठाच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सशुल्क माहिती देण्याचा विहित कालावधी व्यपगत झाल्यामुळे त्यांनी दि.२२.०५.२००७ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१७.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्याचे आदेशित केले.जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.०३.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे ज्या ४२ महाविद्यालयांच्या प्राचार्य व प्राध्यापक यांच्याशी संबंधित माहिती मागितली आहे त्या महाविद्यालयांच्या दैनंदिन कामकाजावर विद्यापीठाचे प्रशासकीय नियंत्रण नाही. ही महाविद्यालये फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित आहेत. अपिलार्थीने या

महाविद्यालयाशी संबंधित जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे त्यातील महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राचार्यांच्या नावाव्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती त्यांच्याकडे कोणत्याही स्वरुपात उपलब्ध नाही. त्यामुळे ती माहिती अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती, ती त्यांनी दि. २२.०५.२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे बादशाही अंजुमन इशाते तालिम या शैक्षणिक संस्थेचे सचिव असून त्यांच्या संस्थेद्वारे चालविण्यात येत असलेले कला महाविद्यालय, विहामांडवा, ता.पैठण, जि.औरंगाबाद या महाविद्यालयाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी असलेले संलग्नीकरण, विद्यापीठाने त्यांच्या दि.२४ जून, २००९ रोजीच्या आदेशान्वये काढून घेतले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध असल्याचे नमूद केले. परंतु यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही किंवा यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी देखील ते आयोगासमोर आज सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीकडून मागणी केलेल्या माहितीशी संबंधित महाविद्यालयांवर कोणत्याही प्रकारे दैनंदिन प्रशासकीय बाबीवर नियंत्रण नाही तसेच या महाविद्यालयांचे दूरध्वनी क्रमांक मुद्दामहून दडवून ठेवल्याचे जन माहिती अधिकारी यांचे प्रयोजन असावे, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०७-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आसिफ खान युसूफ खान,प्लॉट नं.४,रॉयल कॉलनी,डी-३,सिडको एन-८,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शैक्षणिक विभाग), डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक,महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८०३
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

१. श्री. अंकुशराव विष्णूपंत चव्हाण, : अपिलार्थी
ता.मंठा,जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,सेलू,
जि.परभणी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,सेलू,
जि.परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,सेलू,
जि.परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत सन २००७-२००८ या कालावधीमध्ये मौ. देवगाव,हादगाव,नरसापूर,नांदगाव येथे करण्यात आलेल्या बांधबंदिस्तीच्या कामाशी संबंधित हजेरीपुस्तकाच्या प्रतींची मागणी केली होती. अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.०६.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१७१२/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २९.०७.२००८ रोजी पत्र लिहून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रथमतः भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी अथवा जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कोणतीही कार्यवाही न करता व आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१७१२/- इतके स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा सेलू येथे चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले होते. परंतु अपिलार्थीने हे शुल्क भरण्याची कधीही तयारी न दर्शविल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस पुरविता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ती माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी ते कधीही तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की,

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे प्रतिसाद देऊन माहितीसाठी आवश्यक असलेल्या शुल्काचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबादमध्ये करण्याचे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२६.०६.२००८ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी लागणाऱ्या शुल्काचा आवश्यक तो तपशील दिला आहे. परंतु अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची कधीही तयारी दर्शविली नाही. अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देणे हे जसे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे, तसेच आपणास आवश्यक असणाऱ्या माहितीपोटीच्या आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे करणे हे देखील अर्जदाराचे तितकेच उत्तरदायित्त्व आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेल्या प्रथम अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत, असे स्पष्टपणे नमूद केले आहे. तथापि एवढे असूनही मोठ्या व्याप्तीची माहिती मागूनही माहितीपोटीचे शुल्क भरण्याची तयारी मात्र अपिलार्थीने या प्रकरणी दाखविली नसल्याने व त्यांचे उत्तरदायित्त्व त्यांनी योग्य प्रकारे पार पाडले नसल्याने त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अंकुशराव विष्णूपंत चव्हाण,मु.पो.खोराड सावंगी,ता.मंठा,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८०४
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

१. श्री. प्रकाश विठ्ठलराव कुडदे, वडवणी,जि.बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (संशोधन), अनुसूचित जमाती जात पडताळणी समिति, औरंगाबाद : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त, अनुसूचित जमाती जात पडताळणी समिति, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक (संशोधन), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०४.२००८ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे देऊन माहिती न देण्याच्या उद्देशाने निर्णय दिला आहे. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.०६.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, 'मन्नेरवारलु' व 'महादेव कोळी' या जातीच्या वैधता व अवैधता प्रमाणपत्रांच्या संदर्भातील त्यांच्या कार्यक्षेत्रातील जानेवारी २००० ते दि.३०.०६.२००६ या कालावधीशी संबंधित माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने ही माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०८.०८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०५.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने प्रथम अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या त्यांच्या सर्व आक्षेपांचे निरसन करुन दि.२३.०५.२००७ रोजी आपला निर्णय दिला व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. ०८.०८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथमतः माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती इतक्या विस्तृत प्रमाणात आहे की, त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री प्रमाणाबाहेर त्यांना वळवावी लागेल व ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये असाही मुद्दा उपस्थित केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असून त्यांना या प्रकरणी अंदाजे दोन हजार इतक्या त्रयस्थ पक्षाशी संपर्क

साधावा लागेल. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाच्या गोडाऊनमध्ये असून ते ती माहिती अपिलार्थीस तपासणीसाठी केव्हाही उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणाशी संबंधित असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची कार्यपध्दती समजून घेणे अगत्याचे राहिल. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची नियमित कार्यपध्दती ही अर्धन्यायिक स्वरुपाची असून प्रत्येक दिवशी ते त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रकरणांवर सुनावणी घेऊन वेगवेगळया जमातीच्या जात प्रमाणपत्रासंदर्भात आपले आदेश पारित करीत असतात. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती पाहता, त्यामध्ये अपिलार्थीने सर्व अर्जदारांची नावे, संपूर्ण पत्ते, जात वैधता-अवैधता क्रमांक, दिनांक, न्यायालयीन निर्णयाच्या प्रती इ.मुद्यावर माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची विशिष्ट कार्यपध्दती लक्षात घेता, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असल्याची आयोगाची खात्री झाली असल्याने व अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२, ५ व ६ अंशतः -'----प्रकरणे शिल्लक असल्याचे कारणासह माहिती द्यावी.' या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय असणार नाही. कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी पूर्णतः विसंगत आहे. तथापि उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. परंतु या माहितीची व्याप्ती इतक्या मोठया प्रमाणात आहे की, ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एकाच वेळी देता येणे शक्य नाही. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून टप्प्याटप्प्याने हे आदेश निर्गमित होताच एकशेऐंशी दिवसांच्या आत प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस त्यांच्या अपील प्रकरणासंदर्भात असे सूचित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी सूचविल्याप्रमाणे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजितवेळी हजर राहून त्यांना अपेक्षित असलेली माहिती टप्प्याटप्प्याने त्यांच्या कार्यालयातून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे शास्ती लावण्याची मागणी केली आहे व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्या कामाचे स्वरुप हे अर्धन्यायिक स्वरुपाचे असल्याने व अधिनियमामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची कोणतीही तरतूद नसल्याने अपिलार्थीची जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची विनंती आयोगास मान्य करता येणार नाही. तसेच या प्रकरणी अपिलार्थीपासून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असदहेतूने माहिती दडवून ठेवल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, त्यांच्यावरही कोणत्याही कारवाईचे आयोगाचे आदेश नाहीत.

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने आदेश निर्गमित होताच एकशेऐंशी दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिश: उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०७-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रकाश विठ्ठलराव कुडदे,तहसील कार्यालय,वडवणी,ता.वडवणी,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (संशोधन),अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७३६
निर्णय दिनांक ०७-०७-२००९

१. श्री. महंमद सलीम पिता अब्दुल करीम मोमीन, : अपिलार्थी
रा.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सह जिल्हा निबंधक व
मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१ (निम्न श्रेणी),
उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
लातूर विभाग,लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००८ रोजी फेर नोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि.०५.०२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०१.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या पदोन्नतीसंबंधी एकूण सात मुद्यांद्वारे काही मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.३१.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती स्पष्टपणे समजून येत नसल्याचे कळविले व अपिलार्थीस सुस्पष्टपणे माहिती मागण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने

अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०५.०२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्यही प्रकारची सुनावणी घेतली नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दि. ०५.०२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी महानिरिक्षक, लातूर यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास अगत्याचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०५.०२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०५.०२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०७-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महंमद सलीम पिता अब्दुल करीम मोमीन,कनिष्ठ लिपीक,सह जिल्हा निबंधक,वर्ग-१ (नि.श्रे.) बीड यांचे कार्यालय,बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१ (निम्न श्रेणी),उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८०५

निर्णय दिनांक ०८-०७-२००९

१ श्री. राजेंद्र एस. बनकर, : अपिलार्थी
वैशाली नगर, एन-८, सिडको, अनिकेत हॉस्पिटल समोर, घर
नं. ८/२१/७३१, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
वन विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
वन विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक वनसंरक्षक, कार्यालय वनसंरक्षक औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : वनसंरक्षक, कार्यालय उप वनसरंक्षक, औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद शहरातील सॉ मील संदर्भात सन २००० ते २००८ या कालावधी-तील काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सॉ मील शहरात असणे बंधनकारक आहे किंवा कसे याबाबतची माहिती, सन २००० ते २००८ या कालावधीत किती सॉ मीलला परवाने देण्यात आले त्यांची नांवे व पत्ते, जन माहिती अधिकारी सॉ मिलवर कोणत्या प्रकारची कारवाई करु शकतात व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत कोणकोणती कामे केली जातात व त्यांच्या कार्यालयातील कोणकोणते अधिकारी व कर्मचारी कोणकोणती कामे बघतात - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील ज्या शाखेशी संबंधित होती त्या शाखेकडे त्यांनी अपिलार्थीचा अर्ज दिनांक ०८-०५-२००८ रोजी पाठविला. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी घेऊन निर्णय दिला नसल्याचे आयोगास अवगत केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न मिळाल्याने व आवश्यक ती माहिती पूर्ण स्वरुपात प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. त्यांना अद्यापपावेतो जन माहिती

अधिकारी यांनी सन २००० ते २००८ या कालावधीत  किती सॉ मीलला परवाने दिले, त्यांची नावे व पत्ते ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे.  ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.  त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने व अपूर्ण माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक चारशी संबंधित माहिती दिनांक १५-०७-२००८ रोजी पुरविली व उर्वरित दोन मुद्दयांची माहिती त्यांना दिनांक २२-०७-२००८ रोजी पुरविली आहे व आता त्यांच्या कार्यालयातर्फे ज्या सॉ मीलला परवाने दिले त्यांची नावे व पत्ते याची माहिती आज बरोबर आणली असून ते ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.  अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे प्रत्यक्षतः उपलब्ध नव्हती. ती माहिती त्यांच्या आरा शाखेतील दोन व आस्थापना शाखेतील दोन सहायकाकडून घेऊन नंतर ती अपिलार्थीस  पुरवावी लागणार होती. संबधितांकडून ही माहिती त्यांना उशिराने प्राप्त झाल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना विलंब लागला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी, ती अपिलार्थीने  जरी प्रश्नार्थक स्वरुपात विचारली असली तरी  सुसंगत आहे.  या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर तो अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार संबंधिताकडे दिनांक ०३-०५-२००८ रोजी अगर तत्पूर्वी पाठवावयास हवा होता. तथापि या टप्प्यावर आवश्यक त्या कार्यवाहीसाठी स्वतः जन माहिती अधिकारी यांनी पाच दिवसांचा विलंब लावला आहे.  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत सोपे व व्याप्ती मर्यादित असल्याचे दिसून येते.  अपिलार्थीने मागणी केलेल्या चार मुद्दयांवरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ वगळता उर्वरित तीनही मुद्दयावरील माहिती, ही माहिती अधिकार अधिनियमातील

कलम ४ (१) (ख) मधील उप कलम (दोन) व (तेरा) तरतुदीनुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने स्वंयप्रेरणेने घोषित करावयाची अशी आहे. कलम ४ (१) (ख) मधील ही माहिती त्यांच्याकडे १५ ऑक्टोबर २००५ रोजी अगर तत्पूर्वी उपलब्ध असणे गरजेचे होते. तथापि अशा प्रकारे स्वंयप्रेरणेने घोषित करावयाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम अस्तित्वात आल्यापासून अडीच वर्षे इतका कालावधी व्यपगत झाल्यानंतरही उपलब्ध नसावी ही बाब संबंधित विभागाच्या कामकाजामधील पारदर्शकतेऐवजी अपारदर्शकता जास्त स्पष्ट करते, असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात कोणतेही समर्थन असू शकत नाही, अशी आयोगाची खात्री झाली आहे.

या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ४ ची माहिती दिनांक १५-०७-२००८ रोजी, मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती दिनांक २२-०७-२००८ रोजी व मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी उपलब्ध करुन दिली आहे हे पाहता अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेल्या, त्यांना विलंबाने व अपुरी माहिती मिळाल्याच्या मुद्दयांमध्ये तथ्यांश असल्याचे सिध्द होत आहे.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी १५ ऑक्टोबर २००५ पासून सुरु झाली आहे. या अधिनियमातील तरतुदीनुसार स्वंयप्रेरणेने घोषित करावयाची माहिती हा एक अत्यंत महत्वाचा भाग आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केला त्यावेळी तयार असणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत आहे. यासंदर्भात आयोगाने आपले अभिप्राय वरील परिच्छेदात व्यक्त केले आहेत. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविण्या-साठी त्यांच्या कार्यालयातील आरा शाखेतील व आस्थापना शाखेतील प्रत्येकी दोन अशा चार कर्मचा-यांवर अवलंबून राहावे लागणार होते. या चार कर्मचा-यांनी जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती न दिल्याने अंतीमत: अपिलार्थी हे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त करु शकले नाहीत.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित सहायक व कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती देय माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आरा व आस्थापना शाखेतील प्रत्येकी दोन कर्मचारी जबाबदार असल्याचा निष्कर्ष आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व वरील युक्तिवादावरुन आयोग काढत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांच्या संबंधित सहायकांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन न दिल्याबद्दल त्यांच्यावर एकत्रितपणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी लावलेल्या विलंबाचे कोणतेही समर्थन त्यांच्याकडे नसल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील आरा व आस्थापना शाखेतील प्रत्येकी दोन सहायकांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र एस. बनकर, वैशाली नगर, एन-८, सिडको, अनिकेत हॉस्पिटल समोर, घर नं. ८/२१/७३१, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, कार्यालय वनसंरक्षक औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ वनसंरक्षक, कार्यालय उप वनसरंक्षक, औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८०६

निर्णय दिनांक ०८-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भानुदास काका ढवळे,<br>रा. दरेगांव, तालुका जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नगर भूमापन अधिकारी, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नाही व त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेले प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये प्रथमतः जालना तालुक्यातील सर्व्हे नंबर ११९ मधील पोटहिश्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिर्ला ीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिी सकृतदर्शनी अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याचे आएळून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे त्यांना देणे भाग आहे. अपिलार्थीस प्रत्यक्षात त्यांनी आयोगाकडे विदतीय अपील अर्ज केल्यानंतर माहिती प्रापत झाली किंवा कसे हे सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने आयोगाकडील व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रामध्ये त्यांनी त्यांच्या दिनांक २३-०५-२००८ रोजीच्या लिहिलेल्या पत्र आयोगास उपलब्ध करुन देण्यात आले असून या पत्रावरुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचे प्रथम अपील अर्जावर दिनांक ३०-०४-२००८ रोजी सुनावणी झाल्याचे व सुनावणीमध्ये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केल्याचे दिसून येत आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या संबंधीत कार्यालयाने अपिलार्थीस आश्वासन देऊनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती दिली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे व अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यासंदर्भात कोणतीही कागदपत्रे आयोगास उपलब्ध करुन न दिल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे

मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. (पूर्वनियोजित ) अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस या कालावधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यायात स्वतः उपसिथत राहून त्यांचे दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्य आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भानुदास काका ढवळे, रा. दरेगांव, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८०७

निर्णय दिनांक ०८-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शंकरलाल परमानंद चौडिये,<br>रा. सदर बाजार, दाना बाजार, जालना,<br>तालुका जिल्हा जालना | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>जालना | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जालना | : प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : श्री. शशिकांत राधाकिसन पटवारी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २६-१०-२००७ रोजी अर्ज करुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः सादर करुनही तो दिनांक ०१-११-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०८-११-२००७ रोजीच्या पत्रामध्ये दाखविले आहे. या संदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले

असून जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणामध्ये कोणत्याही न्यायिक पध्दतीचा वापर केला नाही व तर्कसंगत असा निर्णय पारित केला. या निर्णयाने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांचे विचाराधीन अपील मंजूर करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती देण्याचे व मुदतीच्या आत त्यांना माहिती दिली नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंड आकारुन तो अपिलार्थीस देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. शशिकांत राधाकिसन पटवारी यांच्या नावावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या केरोसीन विक्री परवान्यासंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती अपेक्षिली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी ०८-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आवश्यक ती फीस चलनाव्दारे भरणा करुन हस्तगत करण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्यासाठी परत विनंती केली. अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्याने अपिलार्थीचा दिनांक २८-११-२००७ रोजीचा व दिनांक ०१-११-२००७ रोजीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०१-२००८ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना तीस दिवसाच्या आत कळवून, अपिलार्थीने सदर शुल्क भरल्यानंतर सात दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित

केले.  जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी ते स्वतः अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे.  ती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी त्या माहितीचे स्वरुप हे सार्वजनिक असल्याने ती माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाची संमती घेणे आवश्यक नाही.  अपिलार्थीचा दिनांक २६-१०-२००७ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज हा जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात दिनांक २६-१०-२००७ रोजी प्राप्त  झाला होता.  परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक ०८-११-२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांच्या अर्जाचा दिनांक ०१-११-२००७ असा दाखविला तो कशाच्या आधारे दाखविला हे आयोगास कळून येण्यास मार्ग नाही.  अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या प्रतिसादाचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास दिलेला हा प्रतिसाद   अवैध असल्याचे आयोगास आढळून येत आहे.  कारण या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा संपूर्ण तपशील, जो त्यांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस कळविणे अनिवार्य आहे, तो पुरविला नाही.  या पत्रामध्ये त्यांनी, अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी लागणा-या पृष्ठांची अंदाजे संख्या व माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर व हे माहितीपोटीचे शुल्क कोठे भरावयाचे, याचा   उल्लेख केलेला नाही.  परिणामी हे पत्र अवैध ठरत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती विनामूल्य पुरविणे भाग आहे.  अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय

अधिकारी यांनी दिनांक २३-०१-२००८ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता यामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदी लक्षात घेतल्या नसल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) ची दखल घेतली नसल्याने जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय आयोग अधिक्रमित करीत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची व त्या शास्तीची रक्कम अपिलार्थीस देण्याची, विनंती केली आहे. या मुद्दयासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंदर्भातील पुढील सर्व कायदेशीर घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व अर्जदारावर असते. माहितीसाठीचा अर्ज करुन व्यक्तिशः माहिती मागितल्यानंतर अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क किती व यासंदर्भातील इतर तपशील जाणून घेण्याची जबाबदारी अर्जदाराची आहे व याप्रमाणे अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व निःसंशयपणे पार पाडल्याचा पुरावा आयोगास सादर केलेला नाही अथवा यासंदर्भात त्यांचा युक्तिवाद आयोगास पत्राव्दारे सादर केलेला नाही. हे पाहता अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची मागणी आयोग फेटाळून लावत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार लावण्यात आलेली शास्ती ही शासकीय कोषागारात जमा करावयाची असते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या विनंतीप्रमाणे शास्तीची रक्कम अपिलार्थीस देण्याची या अधिनियमामध्ये कोणतीही तरतूद नसल्याने अपिलार्थीची ही विनंती देखील आयोग मान्य करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शंकरलाल परमानंद चौडिये, रा. सदर बाजार, दाना बाजार, जालना, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८०८

निर्णय दिनांक ०८-०७-२००९

१ श्री. श्रीरंगराव जनार्धनराव जगताप, : अपिलार्थी
रा. तलवाडा, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : १. मे. गणेश केरोसीन डिलर
२. श्री. बप्पासाहेब रेणुराव मोटे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ७-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व या प्रकरणी त्यांनी तहसीलदाराकडे प्रथम अपील केल्यानंतरही या अपिलावर कोणताही निर्णय न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष मे. गणेश केरोसीन डिलर गेवराई व श्री. बप्पासाहेब रेणुराव मोटे यांच्यासंदर्भात दिनांक २०-०१-२००० ते ०५-१२-२००७ पर्यंत किती किरकोळ रॉकेल परवानाधारक आहेत, परवानाधारकास प्रत्येक महिन्यास किती रॉकेलचा पुरवठा केला जातो त्याची प्रत व रॉकेल परवानाधारकाने रॉकेल वाटप कशा प्रकारे केले त्याच्या प्रती अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती शीघ्र पोस्टाव्दारे मागितली होती. तसेच अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन या संदर्भातील आवश्यक तो वैध पुरावा त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जासोबत जोडला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जाची कोणतीही दखल न घेतल्याने व परिणामी आवश्यक माहितीपासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, गेवराई तालुक्यात रॉकेलचा प्रचंड प्रमाणात काळाबाजार चालू असून प्रत्यक्षतः लाभार्थ्यांना रॉकेल वाटप केले जात नाही त्यामुळे हे सिध्द करण्यासाठी त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आज बरोबर आणली असून त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील २००४ सालापासूनची माहिती उपलब्ध आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अव्वल कारकून या पदावर दिनांक ०५-०६-२००९ रोजी रुजू झाले आहेत. राज्य माहिती आयोगाच्या आजच्या सुनावणीची नोटीस त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जाचा शोध घेतला त्यावेळी ही संचिका जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून गहाळ झाल्याचे त्यांना आढळून आले. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाच्या संबंधात माहिती मागितली आहे त्या त्रयस्थ पक्षाच्या संचिकेवरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडून गोळा करुन आज रोजी बरोबर आणली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाशी संबंधीत संचिका त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक २४-०१-२००८ रोजीच्या शासकीय इमारतीमधील स्थलांतरामध्ये गहाळ झाली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, ते या पदावर दिनांक ०८-०६-२००९ रोजी नायब तहसीलदार (महसूल) म्हणून रुजू झाले असून तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर का सुनावणी घेतली नाही याची कारणे आता सांगता येणार नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून ते निश्चितपणे वंचित राहिल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त न होऊन ते, वंचित राहिल्यासाठीच्या समर्थनार्थ जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी वरील परिच्छेदाप्रमाणे केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही. अपिलार्थी आज, त्यांनी माहितीसाठीचा प्रथम अर्ज व प्रथम अपील तहसीलदार गेवराई यांच्या कार्यालयात केल्यानंतर त्या मूळ अर्जासंदर्भात त्यांना तहसीलदार गेवराई यांच्याकडून कोणतेही पत्र प्राप्त झाले नाही, असे आयोगासमोर सांगत आहेत. संबंधित नायब तहसीलदार (पुरवठा) गेवराई व तहसीलदार गेवराई हे आयोगासमोर सुनावणीसाठी त्यांचे प्रतिनिधीमार्फत उपस्थित आहेत. या प्रतिनिधींना विचाराधीन

प्रकरणात पुरेशी माहिती नाही, हे पाहता, विशेषतः अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न घेता प्रकरण प्रलंबीत ठेऊन तत्कालीन तहसीलदार गेवराई (श्रीमती सुमन मोरे) यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद सचिव (महसूल) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना या प्रकरणी सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देता उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्याकरीता त्यांनी लावलेल्या विलंबाचे कोणतेही समर्थन त्यांच्याकडे नसल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित महसूल विभागाच्या कर्माचा-यांना व अपिलार्थीला तत्कालीन नायब तहसीलदार (पुरवठा) यांचे नांव सांगता आले नाही. त्यामुळे आयोगाचे हे आदेश जिल्हाधिकारी, बीड यांनी तत्कालीन नायब तहसीलदार (पुरवठा) यांना पुरवावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांना अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

४. जिल्हाधिकारी, बीड यांनी अनु. क्र. ३ वरील आदेशाची तामिली संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), गेवराई यांना मुदतीत होईल असे पहावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. श्रीरंगराव जनार्धनराव जगताप, रा. तलवाडा, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८०९

निर्णय दिनांक ०८-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संदीपान आप्पाराव थोरात,<br>व्दारा, मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर,<br>तालुका धारुर, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर,<br>तालुका धारुर, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर,<br>तालुका धारुर, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे वर्तन केले नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त झालेला नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे आयोगास अशीही विनंती केली आहे की, त्यांना जन

माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी व जन माहिती अधिका-याने त्यांना मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी २५० रुपये इतकी शास्ती लावण्यात यावी आणि त्यांनी जाणीवपूर्वक कर्तव्यात कसूर केल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ०१-०१-२००५ ते ३१-१२-२००७ या कालावधीशी संबंधीत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तहसील कार्यालयातील तलाठी व मंडळ अधिकारी यांची नांवे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील तलाठी सज्याची व सज्यांच्या अंतर्गत येणा-या गावांची नांवे, तलाठी व मंडळ अधिका-यांच्या संबंधीत सज्यावरील नेमणूक दिनांक व गाव नमुना १ ते २१ च्या तपासणीबाबत इतर अनुषंगिक माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रासंदर्भात तसेच या कालावधीमधील तलाठी व मंडळ अधिकारी यांची नांवे ही माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले व्दितीय अपील हे आयोगाकडे सादर केल्याचे दिसून येते.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधीत आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्राव्दारे दिलेल्या माहितीमध्ये संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी यांचा नेमणूक दिनांक दिलेला नाही. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक चार ते आठ च्या संदर्भात कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असून ती अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविणे अनिवार्य आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पूर्ण माहिती न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस जिल्हाधिकारी, बीड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी बीड यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संदीपान आप्पाराव थोरात, व्दारा, मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८१०

निर्णय दिनांक ०८-०७-२००९

१ श्री. दत्तात्रय भीमराव देशमुख, : अपिलार्थी
समता कॉलनी, माजलगांव, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्ण माहिती दिली नसून दिलेली माहिती अपूर्ण, दिशाभूल करणारी आहे त्यामुळे त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे माजलगाव नगर परिषद हद्दीतील सर्व्हे नंबर ३७५/३ च्या संदर्भात जानेवारी २००० ते दि. ०३-०१-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - माजलगांव नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नंबर ३७५/०३ हा नॉन ॲग्रीकल्चर लँड आहे काय ? अकृषिक कधी झाला. ? कोणी केला. ? अकृषिक असल्यास त्याची एक प्रत द्यावी, हा सर्वे नंबर शेतजमीन आहे काय ? शेतजमीन असल्यास तशा प्रकारचे प्रमाणपत्र द्यावे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-११-२००७ रोजी दिलेल्या अर्जाची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन माजलगाव नगरपरिषद हद्दीतील सर्वे नंबर ३७५/३ या जमिनीस खाजगी वापराची परवानगी दिली नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिका-याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमत: दिनांक ०४-०४-२००८ रोजी सुनावणी ठेवली तथापि ही सुनावणी यानंतर झाली किंवा कसे हे आयोगास जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत उपलब्ध नसल्याने कळण्यास मार्ग नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०२-२००८ रोजी पुरविली आहे व अपिलार्थीने ज्या जमिनीच्या संदर्भात जन माहिती

अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे ती जमीन अकृषिक नाही असे आढळून येत आहे. मात्र त्यांनी या पत्राबरोबर अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या दिनांक ०६-११-२००७ रोजीच्या अर्जाची प्रत पुरविली नाही. अपिलार्थीच्या अर्जाची प्रत अपिलार्थीस न देण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांचा कोणताही असद्‌हेतू असणे अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये संभवत नाही व अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये म्हटल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दुष्ट हेतूने, जाणुनबुजून माहिती नाकारली या त्यांच्या अभिप्रायाच्या समर्थनार्थ त्यांनी आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केलेला नाही अथवा त्यांच्या या विधानास पुष्टी देण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (२) प्रमाणे करावयाच्या कारवाईसंदर्भात आयोग कोणतेही आदेश देत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय भीमराव देशमुख, समता कॉलनी, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८११

निर्णय दिनांक ०८-०७-२००९

१ श्री. सय्यद अब्दुल्लाह सय्यद छोटेमिया, : अपिलार्थी
इतवारा बाजार, बकरा मार्केट,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी असमाधानकारक, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांनी सदरचे अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती दहा मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी १७-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली व अपिलार्थीस आवश्यक वाटल्यास त्यांच्या

कार्यालयातील अभिलेख्याची तपासणी करण्यासाठी वेगळ्याने अर्ज करण्याचे सूचित केले. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस दिनांक ०७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे निर्णय कळविला. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती असमाधानकारक व दिशाभूल करणारी कशी आहे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. यासंदर्भात अपिलार्थीने देखील त्यांचा कोणताही वेगळा युक्तिवाद आयोगास सादर केलेला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०१-२००८ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना, जर त्यांच्या खात्यातील कर्मचारी हे आपल्या कर्तव्यात कसूर करत असतील तर त्यांच्याविरुध्द खात्यातर्फे कोणती कारवाई केली जाते, कर्मचा-यांवर अशा प्रकारच्या किती कारवाया केल्या गेल्या, अशा प्रकारच्या कारवायांची संख्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीच्या या मुद्दयावर अशा प्रकारची वेगळी माहिती त्यांच्याकडे ठेवली जात नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली ही माहिती चुकीची आहे. सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित कर्मचा-याच्या विरुध्द

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ या कायद्यानुसार कसूरदार कर्मचा-याच्या विरुध्द कारवाई करण्याची पध्दत शासनाच्या प्रत्येक कार्यालयात प्रचलीत आहे. हे पाहता या अधिनियमाचे नांव त्यांनी अपिलार्थीस कळवावयास हवे होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती केलेली नाही. अपिलार्थीने त्यांच्या विभागामार्फत केल्या गेलेल्या अशा प्रकारच्या विभागीय चौकशीची संख्या किती, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली होती. तथापि अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या मूळ अर्जामध्ये त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीशी संबंधित कालावधी नमूद केला नसल्याने विभागीय चौकशीची संख्या ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र ज्या नियमान्वये त्यांच्याकडील कसूरदार कर्मचा-याविरुध्द कारवाई केली जाते त्या नियमांची शीर्षके त्यांनी अपिलार्थीस कळविणे भाग होते. सबब ज्या नियमान्वये त्यांच्याकडील कसूरदार कर्मचा-याविरुध्द कारवाई केली जाते त्या नियमांची व इतर अनुषंगिक नियमाची शीर्षके ही माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त अपिलार्थीची कोणत्या माहितीने दिशाभूल झाली हे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही, हे पाहता, अपिलार्थीचे अपील अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस

दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद अब्दुल्लाह सय्यद छोटेमिया, इतवारा बाजार, बकरा मार्केट, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८१२

निर्णय दिनांक ०८-०७-२००९

१ श्री. लक्ष्मण माधवराव चिंचोलकर, : अपिलार्थी
रा. पळसा तालुका हदगांव, जिल्हा नांदेड
सध्या नाईकनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपजिल्हाधिकारी, किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, हदगांव,जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर उपविभागीय अधिकारी, किनवट यांनी निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या संदर्भात " सर्वे नंबर ८३ (सी) ला गट नंबर २४७ चुकीचा देऊन एक एकर क्षेत्र कमी केलेबाबत व सर्वे नंबर ८३ (ए) ला गट नंबर २५० देऊन एक एकर क्षेत्र वाढविलेसंबंधी " असे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे पळसा तालुका हदगांव येथील शेत सर्व्हे नंबर ८३ सी ला चुकीचा गट नंबर देऊन फरक पडलेल्या क्षेत्रासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" गट नंबर चुकीचे दिल्यामुळे मालकी बदलल्यामुळे अर्जदाराचे शेताचे एक एकर क्षेत्रफळ कमी झाले व किसन महादू यांचे जमीनीचे एक एकर क्षेत्रफळ वाढले असून किसन महादू यांनी शेत सर्वे नंबर ८३ (ब) मधील खरेदी जमीनीस गट नंबर दिला नाही, मालकी नाहीशी केली ती जमीन अर्जदाराचे कब्जात आहे त्याबाबत चौकशी व शेताची पाहणी होवून माननीय विभागीय आयुक्त आणि उपसंचालक भूमी अभिलेख औरंगाबाद हयांना कळवून आदेश घेवून दुरुस्ती अंमल होणेची विनंती आहे. " अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी, किनवट यांच्याकडे दिनांक ११-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. या प्रकरणी तहसीलदार, हदगांव यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली गेली असल्याने त्यांनी अपिलार्थीस, त्यांना उद्देशून लिहिलेला दिनांक ११-०५-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज तहसीलदार हदगांव यांना त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक ३१-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे हस्तांतरीत केला व अपिलार्थीस नियमाप्रमाणे माहिती देण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत उपविभागीय अधिकारी, किनवट यांनी अपिलार्थीस दिली आहे. त्यानंतर अपिलार्थीने परत त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधीत पत्रव्यवहार तहसीलदार हदगाव यांच्याशी केल्याचे दिसून येते. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे आयोगास आढळून येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी हजर नाहीत.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही माहिती नसून मौजे पळसा येथील शेत सर्व्हे नंबर ८३- ए आणि सी मध्ये फरक पडलेल्या क्षेत्राच्या दुरुस्ती करण्याबाबत केलेला विनंती अर्ज असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने तहसीलदार हदगांव यांना जी विनंती केली आहे त्या विनंती-वरुन निर्णय घेणे ही प्रशासकीय बाब असल्याने व ती पूर्णतः महसूल विभागाच्या अखत्यारित येत असल्याने तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी ती सुसंगत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लक्ष्मण माधवराव चिंचोलकर, रा. पळसा तालुका हदगांव, जिल्हा नांदेड सध्या नाईकनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगाव , जिल्हा नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ८१३/२००८ व ८१४/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८१३ व ८१४

निर्णय दिनांक ०८-०७-२००९

१ श्री. मधुकर श्रीरंगराव दंडेवाड, : अपिलार्थी
विठाई निवास, श्री. स्वामी समर्थ मंदिराजवळ,
सिंचन नगर, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसंचालक (संशोधन), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र
तपासणी समिती, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष अपील क्र. ८१३/०८ : कु. प्रिती मधुकर दंडेवाड

**निर्णय**

**अपील क्रमांक ८१३/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने व जादा शुल्क मागणी केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रासंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील माहिती व अपिलीय अधिकारी यांची नावे, पदनामे व पत्रव्यवहाराचा पत्ता, कु. प्रिती दंडेवाड यांच्या जात प्रमाणपत्र वैधतेबाबत केलेली कार्यवाही, वडिलाचे जात वैधता प्रमाणपत्र जोडूनही मुलीस जात वैधता प्रमाणपत्र न देण्याची कारणे, जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय औरंगाबाद येथे स्थापन झाल्यापासून मन्नेरवारलू या जमातीच्या जात प्रमाणपत्राची एकूण १९ उप मुद्दयासंदर्भातील माहिती, औरंगाबाद येथे समिती स्थापन झाल्यापासून अर्जाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील समितीने दिलेल्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत सर्व उमेदवाराबाबत पोलीस अहवाल, वडिलांचा प्रवेश निर्गम उतारा व सेवापुस्तकाचा उतारा छायांकीत प्रती साक्षांकीत करुन - या मुद्दयाचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दिली व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रतीच्या संदर्भात अपिलार्थीस एकूण २८५३० /- रुपये इतक्या रकमेचा भरणा चलनाव्दारे शासकीय कोषागारात करण्याचे सूचित केले. तथापि ही रक्कम जास्त वाटल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सी. डी. च्या स्वरुपात या माहितीची मागणी केली होती. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सी. डी. च्या स्वरुपात उपलब्ध नसल्याने त्यांना ती माहिती अपिलार्थीस सी. डी. च्या स्वरुपात देणे शक्य झाले नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा हा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २१-०४-

२००८ रोजी प्राप्त झाला. परंतु या अर्जावर सुनावणी न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले आहे. अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क विहित मुदतीत कळवूनही या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ व्दारे मागितलेली माहिती ही १५८५ उमेदवाराच्या संदर्भात असून ही माहिती त्यांच्याकडे सी. डी. च्या स्वरुपात उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०६-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठे व व्याप्ती ही प्रचंड प्रमाणात असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या दिनांक ०६-०३-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २९-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असले माहितीपोटीचे शुल्क तपशीलासह त्यांना विहित मुदतीत कळविले आहे. त्यामुळे अपिलार्थीस जर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी असेल तर जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांनी शुल्क भरणा करणे आवश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ च्या संदर्भात विचारणा केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता त्यांनी मुद्दा क्रमांक ४ व्दारे स्वतः एक प्रपत्र विहित केले असून या प्रपत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे.

या प्रपत्रात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही. अपिलार्थीस ही माहिती या विशिष्ट प्रपत्रात देण्याकरिता ती माहिती जन माहिती अधिकारी यांना आता नव्याने तयार करावी लागेल व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशा प्रकारे माहिती तयार करुन ती अपिलार्थीस पुरविणे अभिप्रेत नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय औरंगाबाद येथे स्थापन झाल्यापासून दिनांक ०६-०३-२००८ पर्यंत एकूण सहा वर्षाशी संबंधित माहिती मागितली आहे. या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने जात वैधता प्रमाणपत्राची अंदाजे ७००० इतकी प्रकरणे निकाली काढली आहेत. या प्रत्येक प्रकरणाशी संबंधित उमेदवाराचे पोलीस खात्याचे रेकॉर्ड, समितीची प्रोसिडींग प्रत, अर्जदाराच्या वडिलाचा प्रवेश निर्गम उतारा, व त्यांच्या सेवापुस्तकाचा उतारा, अशा प्रकारच्या माहितीची व्याप्ती प्रचंड प्रमाणात आहे आणि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून संगणकात जतन करुन ठेवलेली नाही. त्यामुळे त्यांची सी. डी. करुन ती सी. डी. अपिलार्थीस पुरविणे देखील जन माहिती अधिकारी यांना शक्य नाही. या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी सी. डी. स्वरुपात पुरविणे हे त्यांना व्यावहारिकदृष्ट्या देखील शक्य नाही आणि जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अपील क्रमांक ८१४/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०७-२००८ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पाहण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील अभिलेख्याची तपासणी करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जो शासन निर्णय संदर्भित केला आहे तो सामाजिक न्याय विभागाशी संबंधित होता. हा निर्णय आदिवासी विकास विभागाला लागू होत

नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित त्यांनी दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेली माहिती बरोबर असून अपिलार्थीने मागितलेल्या प्रपत्रामध्ये त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही व तसे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व २ व्दारे मागणी केलेल्या माहितीतील ......................... लागू आहे काय ? ......................... संगणकीकरण झाले का ? ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे, त्यांचे स्पष्टीकरण व त्यांचे मत मागणे अनुज्ञेय नाही. मात्र मुद्दा क्रमांक १ व २ मधील उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. तथापि मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. मुद्दा क्रमांक १ च्या उर्वरित माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, मूळात अपिलार्थीने संदर्भित केलेला शासन निर्णय त्यांच्या विभागास लागू होत नसल्याने त्या निर्णयाच्या आधारे किती प्रकरणे त्यांच्या समितीने रद्द ठरविली, ही माहिती, आपोआपच निरंक अशी होत आहे. तथापि याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या पत्रामध्ये कळविले नसल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ची ही माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीने विहित प्रपत्रामध्ये एकूण आठ कलमी प्रपत्रामध्ये मागितली आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती अशा प्रपत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. परंतु

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे त्या अभिलेख्याच्या माहितीशी संबंधित पृष्ठांची संख्या लक्षात घेता ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री मोठ्या प्रमाणात वळवावी लागणार आहे, याची आयोगास खात्री पटली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांची समिती स्थापन झाल्यापासून ते दिनांक ०३-०६-२००८ या कालावधीमध्ये त्यांनी मन्नेरवारलू या जमातीची किती प्रकरणे अवैध ठरविली आहेत या माहितीपैकी संबंधित उमेदवारांची नावे, प्रकरण अवैध ठरविल्याचा आदेश क्रमांक व दिनांक ही माहिती त्यांच्याकडे एकत्रितपणे उपलब्ध असल्याचे आयोगास अवगत केले. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील काही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देऊ केली आहे आणि उर्वरित माहितीच्या संबंधाने अपिलार्थीस आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित उर्वरित माहिती ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे त्या अभिलेख्याची तपासणी करण्याचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळ्याने स्वतंत्र अर्ज करावा व या अभिलेख्याची तपासणी करावी म्हणजे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना प्राप्त होणे सुलभ होईल. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ अंशतः व मुद्दा क्रमांक ३ मधील अवैध प्रकरणाच्या उमेदवाराची नावे व आदेश क्रमांक / दिनांक ही माहिती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक १ व ३ मधील अंशतः माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, मुद्दा क्रमांक १ व ३ मधील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अंशतः देय माहिती, त्यांना, हे आदेश निर्ममित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मधुकर श्रीरंगराव दंडेवाड, विठाई निवास, श्री. स्वामी समर्थ मंदिराजवळ, सिंचन नगर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती, कश्मिरा भवन, जिल्हा रोजगार कार्यालयाजवळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ उपसंचालक (संशोधन), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, कश्मिरा भवन, जिल्हा रोजगार कार्यालया-जवळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८१५

निर्णय दिनांक ०८-०७-२००९

१ श्री. लक्ष्मण देवराव जाधव, : अपिलार्थी
मु. वाई पो. पोटा (बु) तालुका हिमायतनगर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी वि. स. अधिकारी,
विभाग लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
अधिकारी, लातूर

त्रयस्थ पक्ष : श्रीमती राजमती बापुराव माने

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष राजमती माने यांच्या कुणबी या जातीचे प्रमाणपत्र क्रमांक एएए/१८८४ दिनांक ०४-०६-२००७, एन २३०८/०७ या क्रमांकाने मिळालेल्या प्रमाणपत्रासंदर्भात दक्षता पथकाच्या अहवालाची प्रत मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे सर्वजण गैरहजर आहेत.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेला प्रथम अपील अर्ज यांचे अवलोकन करता या प्रतींवर संबधिताच्या कार्यालयात सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ या अर्जावर संबंधित लिपीकाची सही व शिक्का आढळून येत नाही. या शिवाय अपिलार्थीने संबंधितांकडे अर्ज व अपील अर्ज केल्यासंदर्भात कोणताही पुरावा आयोगाकडे त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत सादर केलेला नाही. यावरुन मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे माहितीसाठीचा अर्ज व प्रथम अपील अर्ज देखील सादर केला होता किंवा कसे याबद्दल आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे. वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच या दोनही अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेल्या त्रयस्थ पक्षाच्या वैयक्तीक माहितीने ते कोणते जनहित साध्य करणार आहेत याचा

उल्लेख केला नाही. या बाबींचा विचार करता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लक्ष्मण देवराव जाधव, मु. वाई पो. पोटा (बु) तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी वि. स. अधिकारी विभाग लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७३७

निर्णय दिनांक ०८-०७-२००९

१ श्री. गोपाळराव वसंतराव कुलकर्णी, : अपिलार्थी
व्दारा, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला भोगांव (देवी),
तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, सरस्वती विद्यालय (मा.वि.), किल्ले
धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, ज्ञानप्रसारक शिक्षण संस्था, धारुर,
तालुका धारुर, जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : श्री. महेंद्र दुबे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार रितसर अर्ज करुनही कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी जाणीवपूर्वक रजिस्ट्री सोडवून घेतली नाही. त्यांनी उद्दामपणे माहिती नाकारल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास

अशी विनंती केली आहे की, संबंधित शिक्षण संस्थेकडून आयोगाने माहिती मागवून घ्यावी व ती अपिलार्थीस पुरवावी व तसेच माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) चा अवमान केल्यामुळे संबंधितांना प्रत्येकी २५००० रुपये दंड करावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे  जून १९९४ ते डिसेंबर १९९४ या कालावधीमधील त्यांच्या सह्यांचे हजेरी रजिस्टर झेरॉक्स व संबंधित कालावधीतील केल्याचे प्रमाणपत्र आणि त्रयस्थ पक्ष श्री. महेंद्र दुबे यांच्या पगार विवरणाच्या प्रतींची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, ज्ञानप्रसारक शिक्षण संस्था, धारुर यांच्याकडे दिनांक २६-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले.  त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज स्वीकृत केला नाही व परिणामी अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले.  यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे सर्वजण गैरहजर आहेत.

या प्रकरणाची अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता व तसेच आता शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/ केंमाअ/ २००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये  शिक्षण संस्थेच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिका-याची नेमणूक केली

असल्याने अपिलार्थीच्या दिनांक २६-०९-२००७ रोजी प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे योग्य राहील असे आयोगास वाटते.

सबब, अपिलार्थी यांनी आता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे त्यांच्या अधिनियमातील कलम १९ (१) प्रमाणेच्या प्रथम अपील अर्जाची प्रत प्रथमतः सादर करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीचा हा अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज दाखल करण्यासाठी लागलेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन या अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा. असे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बीड यांना आदेशित करण्यात येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झ ाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे दाखल होण्यासाठी लागलेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन या अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत

सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोपाळराव वसंतराव कुलकर्णी, व्दारा, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला भोगांव (देवी), तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरस्वती विद्यालय (मा.वि.), किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६७५
निर्णय दिनांक ०९-०७-२००९

१. श्री. एकनाथ बापूराव डख, : अपिलार्थी
मु.पो.गुगळी धामणगाव,ता.सेलू, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत, गुगळी धामणगाव,
ता.सेलू, जि.परभणी
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, सेलू, जि.परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील करेपर्यंत त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जातील कोणतीही माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील सुनावणीच्या संदर्भात कोणताही निर्णय न घेता अपिलार्थीस त्यांनी निकाल मिळून जाईल, असे सांगितले व जन माहिती अधिकारी यांच्या अनुपस्थितीत अपिलाचा निकाल दिला गेला. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे शास्ती लावून जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे, अशी त्यांनी आयोगास पुढे विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे सन २००२ ते २००७ या कालावधीतील प्राप्त निधीसंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.०२.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि. २२.०२.२००८ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीन दिवसात माहिती देण्याचे सूचित केले. तथापि अपेक्षित माहिती विनामूल्य प्राप्त होण्यासाठी व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई होण्यासाठी अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आहेत.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर आहेत. अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दि.१०.०५.२००९ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना उशिरा का होईना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली व या माहितीबद्दल त्यांची कोणतीही तक्रार नाही. अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर व विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित

ग्रामसेवकावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एकनाथ बापूराव डख,मु.पो.गुगळी धामणगाव,ता.सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, गुगळी धामणगाव, ता.सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६९५
निर्णय दिनांक ०९-०७-२००९

१. श्री. आश्रोबा कडाजी शेळके, : अपिलार्थी
रा.भिलज,पो.भोगाव (देवि), ता.जिंतूर, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, जिंतूर, जि.परभणी
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय कार्यालय, सेलू, जि.परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांची "मौ. डोंगरतळा स.नं.४३ मधील ३ एकर शेत जमीन ७/१२ ची नोंद होणेस विनंती" असे अभिप्राय लिहिले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. डोंगरतळे, वनजमीन स.नं.४३ गट नं.८१ मधील अतिक्रमित जमिनीविषयी दि. १९.११.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केलेल्या अर्जाबाबत काय कार्यवाही केली, याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत, दि. ११.०१.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या दि. १९.११.२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात काय कार्यवाही केली, याचा तपशील कळविला. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि.२८.०३.२००८ रोजी सुनावणी ठेवल्याचे त्यांच्या दि. १३.०३.२००८ रोजीच्या पत्रावरुन दिसून येत आहे. तथापि त्यानंतर कोणतीही सुनावणी घेतली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती जन अपिलीय अधिकारी यांना कळविली. यानंतर अपिलार्थीने थेट राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली त्यांच्या दि. १९.११.२००७ रोजीच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करणे त्यांना शक्य नाही, कारण अपिलार्थीने त्यांच्याकडे वनक्षेत्रातील जमिनीवर त्यांच्या मालकीहक्काच्या नोंदीची मागणी केली होती. शासनाच्या प्रचलित आदेशानुसार अपिलार्थीची विनंती त्यांना मान्य करता येणे शक्य नसल्याने अपिलार्थीच्या दि. १९.११.२००७ रोजीच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली गेली नाही व तसे त्यांनी अपिलार्थीस दि. ११.०१.२००८ रोजी कळविले आहे. अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि. ११.०१.२००८ रोजीच्या पत्राची प्रत त्यांनी आयोगास दाखविली. या पत्रावरुन अपिलार्थीने सदर पत्र मिळाल्यासंबंधी त्यांची पोचसहीदेखील जन माहिती अधिकारी यांना दिली आहे. जन माहिती

अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भित केलेल्या प्रकरणासंदर्भातील त्यांची मर्यादा, त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.११.०१.२००८ रोजी दिलेले उत्तर त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे. आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत आणि त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांच्या वरील विनंतीशिवाय इतर कोणतेही अभिप्राय नोंदविलेले नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आश्रोबा कडाजी शेळके,मु.भिलज, पो.भोगाव,ता.जिंतूर, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिंतूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६९८
निर्णय दिनांक ०९-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अशोक लक्ष्मण इंगळे,<br>रा.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, गंगाखेड,<br>जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिलहा परिषद, परभणी | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याने व याबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी पत्रव्यवहार न केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जासोबतच्या त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांनी त्यामध्ये नमूद केले आहे व प्रथम अर्जासोबत परभणी नगर परिषदेचे दि. ०७.०७.२००८ रोजीचे यासंदर्भातील प्रमाणपत्र सादर केले आहे. या प्रमाणपत्रावरुन अपिलार्थीची नगरपरिषद, परभणी

यांच्याकडील सन २००५-२००६ या कालावधीमधील सर्वेक्षण अंतीम यादीत अ.क्र.१३७५, बी.पी.एल. क्र.१/१२७/९८ अशी नोंद असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि. ११.१०.२००५ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेतील तपशीलानुसार रु.२०/- इतक्या किमतीचा कोर्ट-फी-स्टॅम्प त्यांच्या द्वितीय अपील अर्जावर लावलेला अथवा जोडलेला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दारिद्रयरेषेखाली असलेल्या व्यक्तींना माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार माहितीसाठीचा अर्ज करताना त्यांच्या प्रथम अर्जावर कोर्ट-फी-स्टॅम्प लावण्याची आवश्यकता नाही, मात्र त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांना अधिनियमातील कलम १९(१) व १९(३) च्या तरतुदीनुसार अनुक्रमे प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकरणाकडे सादर करावयाच्या अपील अर्जास कोर्ट-फी-स्टॅम्प लावणे अनिवार्य आहे, हे राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.११.१०.२००५ रोजीच्या अधिसूचनेतील खालील तपशीलावरुन स्पष्ट होते.

“ 5. Appeal.

(1) Any person who,does not receive a decision within the tine specified in sub-section (1) or clause (a) of sub-section (3) of section 7,or is aggrieved by an order of the State Public Information Officer may, within thirty days from the date of receipt of the order of the State Public Information Officer, prefer an appeal to the concerned appellate authority on plain paper in the format given in Annexure “B”, which shall be accompanied by an appeal fee of ruppes twenty by way of cash against proper receipt or by demand draft or banker’s cheque

payable to the public authority or by affixing a court fee stamp of rupees twenty, with a copy of such order appealed against.

(२) Any person aggrieved by an order of the appellate authority under sub-section (1) of section 19 may, within ninety days from the date of receipt of the order of the appellate authority, prefer a second appeal to the State Information Commission on plain paper in the format given in Annexure "C", which shall be accompanied by an appeal fee of rupees twenty by way of cash against proper receipt or by demand draft or banker's cheque payable to the State Information Commission or by affixing a court fee stamp of rupees twenty, with a copy of such order appealed against."

वरील तरतुदीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी केलेले द्वितीय अपील वैध असल्याचे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील आयोग फेटाळून लावत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक लक्ष्मण इंगळे,रा.अशोकनगर,परभणी, ता.जि.परभणी-४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, गंगाखेड,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८१६
निर्णय दिनांक ०९-०७-२००९

१. श्री. शेकनाथ रामराव चव्हाण, : अपिलार्थी
मु.पो.चिकलठाण,ता.कन्नड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि. १५.०३.२००८ रोजी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे समाजकल्याण विभागामार्फत विविध योजना सुरु झाल्यापासून ते अपिलार्थीने

अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत, त्यांच्या विभागामार्फत टिनपत्रे, ऑईल इंजिन आदी ,१०० टक्के, ९० टक्के अनुदानावर किंवा इतर पध्दतीने ज्या लाभार्थ्यांची निवड केली, त्यांची यादी - अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२०.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०३.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि. १९.०३.२००८ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत त्यांचे दि. ०४.०७.२००९ रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले एक पत्र सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढावे, अशी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाल्याने आता अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०३.२००८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १४.०२.२००८ रोजी त्यांना कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही, असे पत्र दिल्याचे दिसून येते. या पत्राची प्रत जन

माहिती अधिकारी आयोगास उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १९.०३.२००८ रोजीच्या, या प्रकरणाशी संबंधित दिलेल्या आदेशामध्ये, या पत्राची नोंद घेतली असल्याने, हे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही, हे म्हणणे म्हणजे अपिलार्थीस प्रथमतः माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असाच होतो.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील अधीक्षक यांच्याकडे असते. त्यांनी विहित मुदतीत माहिती प्राप्त न करुन दिल्यामुळे ते अपिलार्थीस मुदतीत माहिती देऊ शकले नाहीत. हे पाहता, जिल्हा परिषदेमधील समाजकल्याण विभागातील तत्कालीन अधीक्षक हे अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्यासाठी जबाबदार असल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीमध्ये माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक व कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. ही तरतूद पाहता व तसेच अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या सहायकाने लावलेला विलंब पाहता, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणाशी संबंधित सहायकावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या सहायकावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेकनाथ रामराव चव्हाण,मु.पो.चिकलठाण,ता.कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८१७
निर्णय दिनांक ०९-०७-२००९

१. श्री. फुलसिंग हिरालाल राजपुत, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
कार्यालय, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
क्र.१, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : विभागीय समाजकल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
क्र.१, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क भरुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापही योग्य माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिसापेक्ष निर्णय देऊन आदेशाची सत्यप्रत देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १५.०१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे राजपूत भामटा वा परदेशी भामटा या जातीतील उमेदवारांना समितीकडून मिळणाऱ्या प्रमाणपत्रासंबंधाने एकूण ३ मुद्याद्वारे व ३ उपमुद्याद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एप्रिल, २००४ ते ऑक्टोबर, २००७ या कालावधीशी संबंधित असून अपिलार्थीने ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३५/- इतके स्वीकारुन त्यांना माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.३०.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०१.२००८ रोजी या संदर्भातील आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याच्या कारणाने त्यांचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. १५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीकडून रु.३५/- इतके शुल्क आकारुन त्यांना दि. ०२.१२.२००७ रोजी माहिती पुरविली. अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी त्यांना आवश्यक ती संपूर्ण माहिती मिळाल्याचे मान्य केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना योग्य माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिसापेक्ष निर्णय घेऊन आदेशाची सत्यप्रती देण्यास टाळाटाळ केल्याचे त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०२.१२.२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. ही माहिती योग्य कशी नाही, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज उपस्थित नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तीसापेक्ष निर्णय दिल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अभिप्रायाच्या संदर्भात युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी  आयोगासमोर आज उपस्थित नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०१.२००८ रोजीच्या अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता, त्यांनी हा निर्णय एखादी व्यक्ती डोळयासमोर ठेवून दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. मात्र अपिलार्थीने ज्या कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते, त्या कारणाकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेताना जन अपिलीय अधिकारी यांचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३०.११.२००७ रोजी प्रथम अपील केले, हे अपील करण्याचे कारण म्हणून अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करुनही त्यांना मुदतीत माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीच्या दि. १५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जास दिलेला प्रतिसादच अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत दिलेला नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती

देण्यासाठी शुल्क आकारण्याचे कोणतेही कारण असल्याचे या प्रकरणी संभवत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.३५/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.३५/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. फुलसिंग हिरालाल राजपुत,रा.सी/५८/६,संघर्षनगर,११ वी योजना,सिडको,मुकूंद-वाडीजवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८१८
निर्णय दिनांक ०९-०७-२००९

१. श्री. बालासाहेब भिमराव केकाण, : अपिलार्थी
मु.केकाणवाडी,पो.आडस,
ता.केज, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
केज, जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, केज,जि.बीड.

त्रयस्थ पक्ष : श्री.एम.जी.केकाण,
दुकानमालक, स्वस्तधान्य दुकान
क्र.१,केकाणवाडी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करावी व अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. केकाणवाडी, ता. केज येथील स्वस्त धान्य दुकान क्र.१ च्या संदर्भात एकूण ८ मुद्याद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील ८ मुद्यांपैकी

मुद्दा क्र. १ - 'स्वस्त धान्य दुकानास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत दिले जाणारे धान्य,रॉकेल व इतर साहित्य वाटपाबाबतच्या रजिस्टरची प्रत' या व्यतिरिक्त उर्वरित मुद्दा क्र. १ अंशतः व मुद्दा क्र.२ ते ८ या मुद्यांद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तहसील कार्यालयाशी संबंधित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१६.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज करण्याच्या दिनांकामधील कालावधीमध्ये अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या दि. ११.०२.२००८ रोजीचे खालीलप्रमाणे निवेदन दिले होते.

"वरील विषयी मी अर्जदार बालासाहेब भिमराव केकाण रा. केकाणवाडी ता.केज जि. बीड येथील असून मी दि. ०८.१.२००८ रोजी आपले कार्यालयाची तसेच केकाणवाडी येथील स्वस्त धान्य दुकानदार श्री. एम.जी.केकाण यांची दुकानची मुद्दा क्र.१ ते ८ बाबतची माहिती मागणी केलेली होती.

मला आपले कार्यालयाकडून व केकाणवाडीचे वरील स्वस्त धान्य दुकानदाराकडून दि. ०८.०१.२००८ च्या अर्जात नमूद केलेली सर्व माहिती पहावयास मिळाली आहे. सबब उपरोक्त माहितीबाबत माझी काहीही तक्रार राहिलेली नाही."

अपिलार्थीने वरील प्रमाणे निवेदन दिल्यानंतर अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे गृहीत धरुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी आवश्यक ती माहिती दाखविली असून त्यांनी मागणी केलेल्या माहितीबाबत त्यांची कोणतीही तक्रार नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेल्या ८ मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ अंशतः -रेशनदुकानाचे मालवाटप रजिस्टरची दि. ०१.०५.२००७ ते दि. ०८.०१.२००८ या कालावधीतील रजिस्टरची प्रत - वगळता मुद्दा क्र. १ मधील उर्वरित माहिती व मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ ते मुद्दा क्र.८ या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी सरळ संबंधित होती. त्यामुळे ही माहिती स्वस्त धान्य दुकानदाराच्या ताब्यात असणे कोणत्याही प्रकारे संभवत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास ती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास पुरविणे मूलतः अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीस संबंधित दुकानदारांनी पुरविलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्यामार्फतच पुरवावयास हवी होती. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दाखविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता यामध्ये दुकानदाराच्या स्टॉक रजिस्टरच्या प्रती दिसून येतात. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांचा या माहितीमध्ये समावेश नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ शी संबंधित माहितीचा तर या माहितीमध्ये लवलेशही नाही. अशाप्रकारे या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती दाखविल्याचे दिसून येत आहे. मूळात अपिलार्थीने टपालाद्वारे माहिती मागितली असता, ही माहिती अपिलार्थीस नुसती दाखविण्याचे कोणतेही कारण अस्तित्त्वात असावे, असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाहणीसाठी माहिती उपलब्ध करुन दिली, हा जन माहिती अधिकारी यांचा

युक्तिवाद जरी वादाच्या प्रयोजनार्थ स्वीकृत केला तरी अपिलार्थीस दाखविलेल्या कथित माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडील माहितीचा समावेश नसल्याचे दिसून येते. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव नि:संशयपणे स्पष्ट केल्याची आयोगाची खात्री पटली आहे. सबब जिल्हाधिकारी, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वर स्पष्ट केलेली उर्वरित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१.	श्री. बालासाहेब भिमराव केकाण,मु.केकाणवाडी, पो.आडस,ता.केज, जि.बीड

२.	जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, केज,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८१९
निर्णय दिनांक ०९-०७-२००९

१. श्री. सदाशिव रामभाऊ तिडके, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वैद्यकीय अधीक्षक,
ग्रामीण रुग्णालय, अहेरी,
ता.अहेरी, जि.गडचिरोली.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक,
गडचिरोली.

त्रयस्थ पक्ष : श्री. व्ही.आर. तिडके

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.१७.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय,अहेरी ता.अहेरी जि.गडचिरोली यांनी चुकीची,अपूरी व दिशाभूल करणारी माहिती दिली, जिल्हा शल्यचिकित्सक यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही व कोणतेही आदेश पारित केले नाहीत. अशाप्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे उल्लंघन केले असल्याने ते दंडास पात्र ठरले आहेत. या कारणास्तव त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या

अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, - "त्रयस्थ पक्ष श्री. व्ही.आर.तिडके तत्कालीन वैद्यकीय अधिकारी, यांच्या ४थ्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती करुन त्यांना सेवाविषयक लाभ करुन देण्यात आले आहेत काय ? व जर दिले नसतील तर का देण्यात आलेले नाहीत, श्री. व्ही.आर.तिडके यांची सेवापुस्तिका अद्ययावत व परिपूर्ण करुन छाननी व पडताळणी करुन घेण्यात आली काय ? नसेल तर का करुन घेण्यात आली नाही, श्री. तिडके यांची मूळ सेवापुस्तिकेची साक्षांकित प्रत" - अशाप्रकारची माहिती मागितली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील माहितीसदृश्य माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२५.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. मात्र अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात त्यांनी दि. २८.०३.२००८ रोजी अपिलार्थीस एक पत्र पाठवून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात त्यांचा खुलासा अपिलार्थीस या पत्राद्वारे पाठविला. हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. मात्र तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीस सहायक जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. सहायक जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. ०९.०१.२००८ रोजीचा अर्ज त्यांना प्रत्यक्षात दि. १७.०१.२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना दि.२५.०१.२००८ रोजी पुरविली. या प्रकरणाची पार्श्वभूमी विशद करताना त्यांनी आयोगास असे अवगत केले की, श्री. व्ही.आर.तिडके हे वैद्यकीय अधिकारी, अहेरी येथे वैद्यकीय अधिकारी या पदावर दि. ०४.०९.१९८८ ते दि.१०.०६.१९९३ या कालावधीत कार्यरत होते. ते आता नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्याने सेवानिवृत्तीवेतन व तदनुषंगीक लाभ घेण्याकरिता त्यांना त्यांची सेवापुस्तिका अद्ययावत करुन घ्यावयाची आहे. त्यामुळे ते अशाप्रकारची माहिती वारंवार त्यांच्याकडे मागवित आहेत.

वरील घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ०९.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित त्यांना आवश्यक असलेल्या मूळ माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या पाच मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्र.२ व ३ शी संबंधित माहिती मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबाबतची कारण व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबाबतची कारणे विचारणे व त्यांच्या एखाद्या निर्णयाबाबत अथवा कृतीबाबत त्यांचे स्पष्टीकरण विचारणे हे मूळात अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.१, ४ व ५ च्या संदर्भातील माहिती जन माहिती

अधिकारी यांनी त्यांच्या दि.२५.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पुरविली आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती संदर्भात जे मुद्दे उपस्थित केले आहेत, ते मुद्दे देखील असेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबाबतची कारणे विचारणारे असे आहेत. त्या मुद्यांपैकी फक्त श्री. तिडके यांच्या मूळ सेवापुस्तिकाची साक्षांकित प्रत, या मुद्यावरीलच माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तथापि या प्रकरणी तिडके यांची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून जालना येथे दि. १०.०६.१९९३ रोजी ज्यावेळी बदली झाली त्यावेळी दि. २८.०८.१९९३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीची मूळ सेवापुस्तिका जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.जालना यांच्याकडे पाठविली गेली. सार्वजनिक प्राधिकरणामध्ये प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांची बदली ज्या वेळी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होत असते, त्याचवेळी संबंधित कार्यालय प्रमुख बदली झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्याची सेवापुस्तिका त्यांची ज्या ठिकाणी बदली झाली, त्या ठिकाणी पाठवित असतात. यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेची प्रत, जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे संभवत नाही.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे वरील परिच्छेदामध्ये केलेले विश्लेषण पाहता, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती मिळाली असल्याने त्यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सदाशिव रामभाऊ तिडके,महात्मा फुले मार्ग, हनुमान मंदिर रोड,शाहुनगर,बीड - ४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक,ग्रामीण रुग्णालय, अहेरी, ता.अहेरी, जि.गडचिरोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,गडचिरोली यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८२०
निर्णय दिनांक  ०९-०७-२००९

१. श्री. प्रविण व्यंकटराव मोरे,
उमरगा, जि.उस्मानाबाद.  :  अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, बांधकाम विभाग,
उस्मानाबाद.  :  प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०३.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील पंतप्रधान ग्राम सडक योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या

कामासंदर्भात आणि या कामावर देखरेख करणाऱ्या शाखा अभियंत्यांशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.३१.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती उपविभागाशी संबंधित असल्याने संबंधित उपविभागाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर ती अपिलार्थीस देण्यात येईल, असे कळविले. तथापि अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२१.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.०३.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०३.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही उपस्थित आहेत. अपिलार्थीने त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दि. १८.०३.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे दिल्याचे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीपैकी बव्हंशी माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणाऱ्या स्वरुपात मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीचे अवलोकन करता, यामध्ये पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे काम करण्यासाठी शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंत्यांचे काम करण्याचे निकष, पंतप्रधान ग्राम सडक योजना व जिल्हा परिषदेची कामे करणाऱ्या अभियंत्यांची नावे आणि त्यांच्याकडे पंतप्रधान ग्राम सडक योजना सोडून असलेल्या कामाची यादी, ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना देय असलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर मुद्यांद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२८.१२.२००७ रोजी केला होता व या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यास नोंदणीकृत टपालाद्वारे माहितीची मागणी केली होती. तथापि आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे माहिती पाठविल्याचे आयोगास अवगत केले व यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला. परंतु ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली असता व अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी तयार असताना देखील जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची तसदी घेतली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, आयोगास असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त श्री. घंटे, शाखा अभियंता यांच्या संदर्भातीलच माहिती पुरविली आहे. तथापि या प्रकरणी कार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी असल्याने त्यांच्या कार्यालयातील असे सर्व कनिष्ठ अभियंते, ज्यांच्याकडे पंतप्रधान ग्राम सडक योजना व नियमित जिल्हा परिषदेची कामे असा कार्यभार आहे, अशा सर्व कनिष्ठ अभियंत्यांची नावे व त्या सर्वांकडे असलेल्या कामांची यादी, ही माहिती अपिलार्थीस

पुरविणे जन माहिती अधिकारी यांना भाग होते. तथापि त्यांनी फक्त श्री. घंटे शाखा अभियंता यांच्या संदर्भातीलच माहिती पुरविली आहे. ही जन माहिती अधिकारी यांची कृती चुकीची आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व वरील परिच्छेदात नमूद केलेली देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रविण व्यंकटराव मोरे,रामनगर, शिवपूरी रोड,उमरगा,ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८२१
निर्णय दिनांक ०९-०७-२००९

१. श्री. अशोक मारोती बच्चेवार, : अपिलार्थी
मुखेड, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मुखेड, जि.नांदेड.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (नगर विकास),
सुभेदारी गेस्ट हॉऊसजवळ,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद
त्रयस्थ पक्षः श्री. बाबू गोविंद कवटिकवार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळीच माहिती दिलेली नाही व दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे, त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित श्री. बाबू गोविंद कवटिकवार घर नं. २२६, वॉर्ड नं.५

यांच्या बांधकामासंदर्भात काही माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्रत्यक्षात ही माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.३१.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्या दि.२५.०२.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे निकाली काढले व जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत माहिती देण्याबाबत दक्षता घेण्याचे सूचित केले. तथापि या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची व खोटी माहिती देऊन अपिलार्थीची दिशाभूल करण्यात आली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी त्रयस्थ पक्षाच्या बांधकामासंदर्भात वेगळया अर्जाद्वारे माहिती मागितली असता, त्यांना दि. ३०.०१.२००८ रोजी कवटिकवार यांना बांधकाम परवानगी दिली नसल्याचे कळविले व दि.०६.०५.२००८ रोजी बांधकाम परवाना दिल्याचे कळविले. अशाप्रकारे एकाच बांधकामासंदर्भात दोन वेळा परस्परविरोधी माहिती पुरवून, जन माहिती अधिकारी यांनी त्यांची दिशाभूल केली आहे. तसेच आज रोजी सुनावणीस हजर न होण्यासाठी त्रयस्थ पक्षातर्फे दबाव टाकल्याने त्यांनी पोलीस

निरीक्षक, मुखेड यांच्याकडे अर्ज देखील सादर केला आहे. त्यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सत्य माहिती हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या वेळी माहितीची मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याकरिता त्यांना नगर परिषदेच्या संबंधित विभागाच्या लिपीकावर व अधिकाऱ्यावर अवलंबून राहावे लागले. संबंधित लिपीकाने ज्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती सादर केली, त्याप्रमाणे त्यांनी ती अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३०.०१.२००८ रोजी, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत, प्रथम प्रतिसाद दिला आहे. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात अपिलार्थीस असे कळविले आहे की, श्री. बाबू गोविंद कवटिकवार यांना घर नं. २२६ वॉर्ड क्र. ५ ची बांधकाम परवानगी दिलेली नाही. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०६.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे श्री. कवटिकवार यांना घ.नं.१५९/१ वॉर्ड क्र.५ येथील बांधकामाची परवानगी त्यांच्या कार्यालयाचे पत्रक क्र.३५३/९२,दि.२८.०८.१९९२ अन्वये दिली असल्याचे नमूद केले आहे. याचाच अर्थ अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज नीटपणे न तपासून, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती पुरविली असा होत आहे. जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराने मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी जबाबदार ठरत आहेत. त्यांच्या उपरोक्त कृतीद्वारे अपिलार्थीस प्रथमतः चुकीची माहिती कळवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित

सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्याधिकारी, नगर परिषद, मुखेड यांना करण्यात येत आहे.

अपिलार्थीस सत्य माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण सत्य माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण सत्य माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद, मुखेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या सहायकांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक मारोती बच्चेवार,तगलाईन गल्ली, मुखेड,ता.मुखेड, जि. नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८२२
निर्णय दिनांक ०९-०७-२००९

१. श्री. गौतम खंडू कांबळे, : अपिलार्थी
मु.पो.इस्लापूर,ता.किनवट, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
वन परिक्षेत्र कार्यालय,
किनवट, ता.किनवट,जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (जं.का.स.),
किनवट,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी पूर्वी दिलेल्या दि. २०.०९.२००७ रोजीच्या अर्जाच्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.११.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये शुल्काची रक्कम कळविली. तथापि यासंदर्भात अपिलार्थीने दि. २३.१०.२००७ रोजीच्या अर्जासोबत त्यांचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र जोडून दिल्यानंतरही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. ०३.१२.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर झालेल्या सुनावणीस दि. १३.१२.२००७ रोजी ११.०० वा. हजर राहून २ महिन्याचा कालावधी होऊन सुध्दा अपिलार्थीस माहिती मिळाली नाही, त्यामुळे ते द्वितीय अपील सादर करीत आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.११.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३७,८३८/- त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे बँकेत भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता दि. ०३.११.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दि. १३.१२.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात ठेवली होती. तथापि ही सुनावणी झाली किंवा कसे, अथवा या सुनावणीमध्ये कोणता निर्णय झाला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. या प्रकरणी असे दिसून येते की, सुरुवातीला जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे न भरल्यामुळे, माहिती दिली नाही, त्यामुळे अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिलामध्ये गेले. याही अपील अर्जावर नक्की कोणता निर्णय झाला की सुनावणी झाली नाही, हे अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत सादर न केल्याने, कळण्यास मार्ग नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत, हे पाहता, आवश्यक ती कागदपत्रे व पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

कृ.मा.प....३

प्रत,

१. श्री. गौतम खंडू कांबळे,जैन टि.व्ही.न्युज रिपोर्टर, मु.पो.इस्लापूर, ता.किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय,किनवट, ता.किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जं.का.स.),किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८२३
निर्णय दिनांक ०९-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. काशिनाथ नारायण शिंदे,<br>मु.पो.इस्लापूर,ता.किनवट, जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.),<br>किनवट, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (जं.का.सं.),<br>किनवट, जि.नांदेड. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क मुदतीत भरुनही, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाच्या दि. ०१.०१.२००६ ते दि. ३१.१२.२००७ या कालावधीतील श्री. सो.मा.पोतुलवार, वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट यांनी नोंदी केलेल्या व कार्यालयात

वापरलेल्या कॅशबुकच्या छायाप्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १९४२/- इतके चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ हैद्राबादकडे भरण्याचे त्यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने दि. १८.०२.२००८ रोजी शुल्काचा भरणा चलनाद्वारे करुन चलनाची एक प्रत जन माहिती अधिकारी यांना सादर केली. आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०३.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि. १२.०३.२००८ रोजी पारित केले. या निर्णयामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले -

"अपीलकर्ते श्री. काशीनाथ नारायण शिंदे रा.मु.पो.इस्लापूर ता. किनवट यांना कळविण्यात येते की, वरिष्ठांकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर आपण वनक्षेत्रपाल (प्रा.) किनवट यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी." जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुन व आवश्यक त्या शुल्काचा भरणा अपिलार्थीने करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. २८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी

यांनी त्यांच्याकडील दि. २९.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक तो प्रतिसाद दिलेला आहे. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१९४२/- स्टेट बँक ऑफ हैद्रराबाद मध्ये भरण्याच्या सूचना त्यांनी अपिलार्थीस दिल्या आहेत. या पत्रामध्ये रु.१९४२/- शुल्काचा संपूर्ण तपशील अपिलार्थीस देऊन अधिनियमातील कलम ७(३) (क) ची पूर्तता देखील केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबाद मध्ये दि. १८.०२.२००८ रोजी चलनाद्वारे केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. तथापि या चलनाची प्रत अपिलार्थीने विचाराधीन अपील अर्जासोबत जोडलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीने खरोखरीच या शुल्काचा भरणा योग्य त्या प्राधिकरणाकडे केला आहे किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे अनुमान काढण्यात येत आहे की, अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा तर तातडीने करुन घेतला होता. परंतु अपिलार्थीस माहिती देण्याकरिता लागणारे आवश्यक ते अनुदान त्यांच्याकडे अपिलार्थीस माहिती देतेवेळी उपलब्ध नव्हते. त्यामुळे या अनुदानाची मागणी त्यांनी उपवनसंरक्षक, नांदेड यांच्याकडे केली असावी व त्यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांना पुरेसे अनुदान उपलब्ध न झाल्याने जन माहिती अधिकारी हे अंतिमतः अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नसावेत ही शक्यता, वन विभागाच्या कार्यपध्दतीवरुन, नाकारता येत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जापासून ते आजच्या सुनावणीच्या वेळेपर्यंत अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली त्यांच्या या अपिलाशी संबंधित माहिती प्राप्त झाली किंवा कसे, हे देखील आयोगास संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र या प्रकरणी एक बाब प्रामुख्याने आयोगाच्या नजरेस आली आहे, ती म्हणजे अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केल्याचा दिनांक व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेल्या पत्राचा दिनांक आणि अपिलार्थीने प्रत्यक्षात अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या रकमेचा भरणा केल्याचा दिनांक यातील

फरक लक्षात घेता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १९.०३.२००८ पर्यंत सशुल्क माहिती प्राप्त होणे अनिवार्य आहे. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दि. ०२.०४.२००८ पर्यंत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे दिसून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने त्यांनी प्रथमत: अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१९४२/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केल्यास अद्यापही राज्य शासनाच्या वन विभागातील अधिकाऱ्यांची माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या प्रती असलेली अनास्था व नकारात्मक दृष्टीकोन स्पष्ट होत आहे, असे मानल्यास ते फारसे वावगे होणार नाही. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली असता व पोस्टाचा खर्च जन माहिती अधिकारी यांना देण्याची तयारी दर्शविली असताना, याही उपर अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाद्वारे माहिती पाठविण्याचे तर सोडूनच द्या, परंतु त्यांनी याउलट अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या आदेशाने त्यांच्या कार्यालयाचे प्रशासन हे पारदर्शक तर नाहीच,परंतु ते कसे जनताभिमुख देखील नाही, याचे सम्यक दर्शन या प्रकरणामध्ये आयोगास झाले आहे. सबब सचिव (वने) यांना या संदर्भात, माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(८)(क)(चार) च्या तरतुदीनुसार असे सूचविण्यात येत आहे की, एकदा जन माहिती अधिकारी यांना अर्जदारांकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अर्जदारास त्यांच्या विभागातील

संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून कशी माहिती प्राप्त होऊ शकेल याची व्यवस्था त्यांनी आवश्यक त्या आदेशाद्वारे सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (पूर्वी दिली नसल्यास ) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. याच कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१९४२/- त्यांना परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. काशिनाथ नारायण शिंदे,मु.पो.इस्लापूर,ता.किनवट, जि.नांदेड-४३१८०३

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.),किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जं.का.सं.),किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (वने), मंत्रालय, मुंबई-३२ यांना वरील निर्णयातील नोंदीप्रमाणे कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८२४
निर्णय दिनांक ०९-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. गंगाधर श्रीराम पवार,<br>मु.पो.निवघा,ता.मुदखेड, जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय,मुदखेड,<br>जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड. | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, त्यांनी तहसीलदार, मुदखेड यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही. या अर्जामध्ये पुढे त्यांनी या प्रकरणी माहिती अधिकाऱ्याने दुष्ट हेतूने माहिती दिली नाही आणि अपिलीय अधिकाऱ्याने अपिलाची सुनावणी घेतली नसल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची व दंडात्मक कारवाई करण्याची तसेच अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे निवघा गावास पुरविण्यात येणाऱ्या रॉकेल व रॉकेल परवानाधारकांशी संबंधित काही माहिती एकुण १० मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३१.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होण्यापासून वंचित राहिले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी प्रभारी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी आज सुनावणीच्या वेळी बरोबर आणली असून आता ते अपिलार्थीस ती विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने ज्यावेळी माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला होता त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद न देण्याची कारणे त्यांना आता सांगता येणार नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुदखेड तालुक्यातील निवघा गावामध्ये पुरविले जाणारे रॉकेल वाटपासंदर्भात व रॉकेल परवानाधारकांच्या संदर्भात मागणी केलेली माहिती ही, पूर्णपणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे.

त्यामुळे अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क आवश्यक त्या तपशीलासह संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर तीस दिवसांच्या आत कळविणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातच उपलब्ध असावयास हवी. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस जी माहिती विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत त्या माहितीचे अवलोकन केले असता, या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील बऱ्याच मुद्यांचा समावेश नसल्याचे दिसून येते. तसेच त्यांनी ही माहिती संबंधित दुकानदाराकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस पुरविण्याची तयारी दर्शविली आहे. वास्तविक पाहता, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातच उपलब्ध असणे क्रमप्राप्त आहे. तथापि आपल्या कार्यालयातून माहिती अपिलार्थीस देण्याची तसदी देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी घेतली नाही व अपिलार्थीस आजपर्यंत म्हणजेच अंदाजे दीड वर्षाचा कालावधी व्यपगत होऊन गेल्यानंतरही आवश्यक त्या माहितीपासून वंचित ठेवल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित व स्वरुप अत्यंत सोपे असे होते. कोणत्याही अर्जदाराने काहीही माहिती मागितली, तरी ती द्यावयाचीच नाही, असा जणू महसूल विभागातील पुरवठा शाखेकडील जन माहिती अधिकारी यांनी संकल्प केला असल्याचे आयोगास या ठिकाणी प्रतीत होत आहे. या ठिकाणी एका बाबीची नोंद करुन ठेवणे आयोग त्यांचे कर्तव्य समजते, ती बाब अशी आहे की, मूळ विषयामध्ये कोणत्याही अर्जदाराने कितीही सोपी व सरळ माहिती मागितली तरी ती अर्जदारास देण्यापेक्षा ती कशी देता येणार नाही, याचाच कल महसूल विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांमध्ये दिसून येत आहे. उदाहरणार्थ. विचाराधीन अपील अर्जामधील मूळ अर्जाद्वारे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केरोसिन परवानाधारकांच्या पत्त्याची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस देण्यासाठी तयार करुन ठेवलेल्या माहितीमध्ये नेमका या पत्त्यांचा कुठेही उल्लेख नाही. वास्तविक पाहता सदर रॉकेल पुरवठा धारकांचा पत्ता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असायलाच हवा, परंतु त्यांनी या मुद्यासंदर्भात अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही. गावासाठी दरमहा कोटा किती आहे, याचीही माहिती घेण्यासाठी त्यांना संबंधित रॉकेल परवानाधारकाचे सहाय्य घ्यावे लागत आहे. दुकानदाराने गावात रॉकेल नेऊन वाटप करावयाचे की मुदखेड येथून द्यावयाचे याचाही या माहितीमध्ये समावेश नाही. रॉकेल कोणत्या दराने लाभधारकास देणे अपेक्षित आहे, यासंबंधीच्या माहितीचा समावेश देखिल अपिलार्थीस देऊ केलेल्या या माहितीमध्ये नाही. दुकानदाराने रास्त भावाचा फलक लावला आहे किंवा कसे याची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, भाव फलक लावला नसल्यास कोणती कारवाई करण्यात आली,या मुद्यासंदर्भातील माहितीचा या माहितीमध्ये समावेश नाही. यासारख्या इतर बऱ्याच मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असलेल्या कथित माहितीमध्ये उपलब्ध नाही. वास्तविक पाहता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी, "स्वयंप्रेरणेने घोषित करुन ठेवावयाची" अशाप्रकारची ही माहिती आहे. तथापि स्वयंप्रेरणेने तर सोडाच परंतु माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज केल्यानंतर देखील ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नाही आणि ही माहिती, संबंधित रॉकेल पुरवठाधारकाकडून घेण्याचा प्रयत्न केला, ही बाब संबंधित सार्वजनिक प्राधिकरणास निश्चित अशोभनीय आहे आणि अशाप्रकारच्या जन माहिती अधिकारी यांच्या अशा कृतीद्वारे राज्य शासनाच्या कारभारातील पारदर्शकता स्पष्ट होण्याऐवजी तो किती अपारदर्शक आहे, याचेच दर्शन जनसामान्यांना होत आहे. आयोगाच्या मते, राज्य माहिती आयोगाची स्थापना ज्या उद्देशाने झाली आहे, तो, सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यपध्दतीतील पारदर्शकता आणि राज्य शासनाच्या यंत्रणेचे जनतेला जाब देण्याचे उत्तरदायित्त्व, सफल होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांची अशी कृती ही निश्चितपणे बाधक राहील. सबब सचिव, महसूल व सचिव, अन्न व नागरी पुरवठा यांना, त्यांनी

महसूल विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अर्जदारांनी मागणी केलेली माहिती स्वतःहून त्यांना देण्याकरिता उद्युक्त करावे, असे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अत्यंत मर्यादित स्वरुपाची माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उपलब्ध न करुन देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या विलंबाकरिता त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व मुद्देनिहाय पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमि कृ.मा.प.६... । आत विनामूल्य व मुद्देनिहाय पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळण्यापासून वंचित

ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गंगाधर श्रीराम पवार,मु.पो.निवघा,ता.मुदखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (अन्न व नागरी पुरवठा विभाग), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (महसूल) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ८२५/०८, ८२६/०८ व ८२७/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८२५, ८२६ व ८२७

निर्णय दिनांक १०-०७-२००९

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, अपिलार्थी
शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

अपील क्रमांक ८२५/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, मानवत,
तालुका मानवत, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी

अपील क्रमांक ८२६/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, सोनपेठ,
तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी | | प्रतिवादी |
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | मंडळ कृषि अधिकारी, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी |

अपील क्रमांक ८२७/२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू,<br>तालुका सेलू, जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी | | प्रतिवादी |
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | मंडळ कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी नोंदविलेली अपीले क्रमांक ८२५/२००८ व ८२६/२००८ व दिनांक २४-०४-२००८ रोजी नोंदविलेले अपील क्रमांक ८२७/२००८ ही तीन व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जाच्या संबंधात मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये अपिलार्थीने एकाच माहितीची तालुका कृषि अधिकारी, मानवत, सोनपेठ व सेलू यांच्या कार्यालयाकडे मागणी केली असल्याने व तीनही प्रकरणाशी संबंधीत प्रथम अपिले उपविभागीय कृषि अधिकारी, कार्यालय

परभणी यांच्याकडे एकाच दिवशी केली असल्याने या तीनही अपिलांची एकत्रित सुनावणी आज रोजी घेण्यात येत आहे.

आयोगाकडे दाखल केलेल्या या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत व या अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये तीनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत एप्रिल २००५ ते जून २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाने रोजगार हमी योजने अंतर्गत केलेल्या शेततळ्याची व ढाळीची, नाला दुरुस्तीच्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अशा प्रकारच्या कामांची संख्या, शेतक-याचे नांव, गांव, गट नंबर व कामाच्या मोजमाप पुस्तकाच्या प्रती, काम जेसीबी मशिनने केले की मजुराच्या हस्ते केले, मजुराच्या हस्ते केले असल्यास मजूरी किती, पैकी धान्य किती, नगदी किती, काम मशिनने केले असेल तर मशिनने काम करण्याबाबत शासनाच्या आदेशाची प्रत व मशिनचा भाडे दर आणि रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत शासन निर्णयाची सत्यप्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास तालुका कृषि अधिकारी, मानवत यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. तालुका कृषि अधिकारी, सोनपेठ यांच्याकडे अपिलार्थीचा दिनांक २३-१०-२००७ रोजीचा मूळ अर्जच प्राप्त झाला नाही व तालुका कृषि अधिकारी, सेलू यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधितांकडून प्राप्त होताच ती अपिलार्थीस देण्याचे आश्वासीत केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुढे असेही कळविले की, संबंधितांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्यात

येईल आणि ही रक्कम भरल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्यात येईल. यानंतर अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी परत अपिलार्थीस दिनांक २१-११-२००७ रोजी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १७८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा तपशील व तसेच हे शुल्क निश्चितपणे अपिलार्थीने कोणाकडे व कशा पध्दतीने भरावयाचे याचा तपशील त्यांनी अपिलार्थीस दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादांनी समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-१२-२००७ रोजी तीन स्वतंत्र प्रथम अपील अर्ज सादर केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी यांनी दिनांक १७-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीची तीनही अपिले संबंधित तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे वर्ग केली. यासंदर्भात अपिलार्थीच्या संबंधित प्रथम अपील अर्जावर तालुका कृषि अधिकारी, मानवत, सोनपेठ यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही. मात्र तालुका कृषि अधिकारी, सेलू यांनी अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भात वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १७८ इतके त्यांच्या कार्यालयात नियमानुसार भरण्याचे सूचित करुन नियमानुसार माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले.

वरील तीनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १०-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, या तीनही अपील प्रकरणांशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांचे प्रतिनिधी श्री. तुकाराम भानुदासराव तौर हे अपिलार्थीच्या वतीने आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित आहेत. त्यांनी अपिलार्थीचा लेखी युक्तिवाद आयोगासमोर सादर केला असून या लेखी युक्तिवादामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू व सोनपेठ यांनी त्यांना

कोणतीही माहिती दिली नसल्याचे नमूद करुन त्यांना माहिती मिळण्याबाबत योग्य तो न्याय द्यावा अशी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, मानवत यांनी आज रोजी आयोगास त्यांच्या कार्यालयामध्ये आवश्यक त्या कर्मचा-यांच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीस वेळेत माहिती देता आली नसल्याचे अवगत केले व त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०७-२००९ रोजी माहिती दिली असल्याची अपिलार्थीची या माहितीची पोच पावती सादर केली. यावरुन अपिलार्थीस तालुका कृषि अधिकारी, मानवत यांच्याकडून दिनांक ०३-०७-२००९ रोजी काही माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. मंडळ कृषि अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, सोनपेठ यांनी अपिलार्थीचा दिनांक २३-१०-२००७ रोजीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास अवगत केले व अपिलार्थीने हीच माहिती त्यांच्याकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी मागितली असता अपिलार्थीस त्यांनी ही माहिती दिनांक ०५-११-२००७ रोजी पुरविली असल्याचे व या माहितीतील प्रतीसाठी अपिलार्थीस १७५८ रुपये भरण्याचे सूचित केले असल्याचे आयोगास अवगत केले. अपिलार्थीने दिनांक २३-१०-२००७ रोजी त्यांच्याकडे याच माहितीसाठी परत अर्ज केला आहे हे त्यांना आयोगाच्या सुनावणीच्या नोटिशीबरोबर आलेल्या पत्रावरुन समजले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यास अपिलार्थीस ते ही माहिती देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, सेलू यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी विहित मुदतीत प्रतिसाद देऊन आवश्यक ते शुल्क रुपये १७८ भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्याने अपिलार्थीस त्यांना ही माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मंडळ कृषि अधिकारी, मानवत यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिली आहे. अपिलार्थीस निश्तिचपणे त्यांनी कोणती माहिती पुरविली याची, त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कथित पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता,

अपिलार्थीस त्यांनी अपूर्ण माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी, मानवत यांनी दिलेल्या माहितीमध्ये शेतक-यांची नावे, मजुरांची मजूरी आणि कामाच्या मोजमाप पुस्तिकाची प्रत अशा महत्वाच्या माहितीचा अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये समावेश नाही. एवढे असूनही अपिलार्थीने त्यांना संपूर्ण माहिती दिल्याचे दिनांक ०३-०७-२००९ रोजी लिहून दिले आहे. यावरुन या प्रकरणी अपिलार्थीचे वर्तन देखील आयोगास संशयास्पद वाटत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी, मानवत यांनी अपिलार्थीस उर्वरित मुद्दयावरील माहिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या टप्प्यावर सचिव (कृषि) यांचे लक्ष एका महत्वाच्या मुद्दयाकडे वेधणे आयोगास गरजेचे वाटते. कृषि विभागाच्या संदर्भातील अपिलांची सुनावणी घेत असतांना विशेषतः ज्या शेतक-यांच्या शेतात कृषि विभागाअंतर्गत रोजगार हमी योजनेची कामे केली जातात त्या शेतक-यांची नावे उपलब्ध करुन न देणे आणि अर्जदारास मस्टरच्या प्रती देण्याचे शक्यतोवर टाळणे आणि अर्जदाराने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्या अपिलाची सुनावणी कधीही न घेता फक्त पत्राव्दारे संबंधित जन माहिती अधिकारी यांना काही सूचना देणे अशा प्रकारची प्रवृत्ती कृषी विभागामध्ये वाढीस लागल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीच्या निकोप वाढीच्या दृष्टीने विशेषतः शासनाच्या कारभारातील पारदर्शकता स्पष्ट करण्यासाठी आता या टप्प्यावर सचिव (कृषि) यांनी वैयक्तीक लक्ष घालून आवश्यक त्या सूचना त्यांच्या विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांना एका परिपत्रकाव्दारे पारित केल्या तर या परिस्थितीमध्ये सुधारणा होण्यास मदत होईल, असे आयोगास वाटते. सचिव (कृषि) यांना या सूचना माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार) प्रमाणे देण्यात येत आहेत.

वरील वस्तुस्थितीचे अवलोकन करता अपील क्रमांक ८२५/२००८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरवून या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या

कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संबंधित मंडळ कृषि अधिकारी, मानवत यांच्यावर सचिव (कृषि) यांना प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपील क्रमांक ८२६/२००८ च्या संदर्भात अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याने व यासंदर्भात कोणताही लेखी पुरावा अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडला नसल्याने त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक ८२६/२००८ हे फेटाळून लावण्यात येत आहे. अपील क्रमांक ८२७/२००८ च्या संदर्भात जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २१-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १७८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले असले तरी या पत्रामध्ये या शुल्काचा तपशील उदा. संभावित माहितीच्या पृष्ठांची संख्या, माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर, सदर शुल्क अपिलार्थीने कशा पध्दतीने भरावयाचे याचा तपशील न पुरविल्याने त्यांचे दिनांक २१-११-२००७ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. सबब त्यांना या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, मंडळ कृषि अधिकारी, सेलू यांना अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील क्रमांक ८२५/२००८ अंशतः मान्य, अपील क्रमांक ८२७/२००८ मान्य व अपील क्रमांक ८२६/२००८ फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील क्रमांक ८२५/२००८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ८२६/२००८ फेटाळण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक ८२७/२००८ मान्य करण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी मानवत यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

५. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी सेलू यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

६. सचिव कृषि यांना, जन माहिती अधिकारी तथा संबंधीत मंडळ कृषी अधिकारी, मानवत यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८२८

निर्णय दिनांक १०-०७-२००९

१ श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानीवार, : अपिलार्थी
वॉर्ड क्रमांक ३, वेलमापूरा, हनुमान मंदिराजवळ, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जि. नांदेड
मंडळ कृषि अधिकारी, बोधडी, तालुका किनवट, जि. नांदेड
मंडळ कृषि अधिकारी, मांडवी, तालुका किनवट, जि. नांदेड
मंडळ कृषि अधिकारी, इस्लापूर, तालुका किनवट, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी तालुका कृषि अधिकारी, किनवट यांच्याकडून सन २००६-२००७ व २००७-२००८ या कालावधीतील राष्ट्रीय

ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत केलेल्या कामांची यादी आणि प्रत्येक कामाची कागदपत्रे त्यांना तालुका कृषि अधिकारी, किनवट व मंडळ कृषि अधिकारी, किनवट, बोधडी, मांडवी व इस्लापूर यांनी न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ११-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधित कामांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम २००५ अंतर्गत किनवट तालुक्यातील सन २००६-२००७ वर्षात, जून २००७ पूर्वी, परिशिष्ट-२ अंतर्गत केलेल्या कामांची यादी आणि या कामाची प्रशासकीय व तांत्रिक मंजूरीची प्रत, सदर कामाच्या प्लॅनची प्रत, ग्रामसभेच्या मंजुरीच्या ठरावाची प्रत, जॉब कार्डधारकाची यादी , कामाची मंजूरी व आदेशाची प्रमाणित प्रत, पे ऑर्डर आणि मस्टर रोलची प्रमाणित प्रत, बँकेत/ पोस्ट ऑफिसमध्ये उघडलेल्या पेमेंटशिटची प्रमाणित प्रत, जिल्हा समन्वयाकडून कलम १७ प्रमाणे केलेल्या मुल्यांकनाची प्रमाणित प्रत, या कामाच्या कलम १७ प्रमाणे सामाजिक लेखापरिक्षणाचे पुढील तारीख व ठिकाण आणि ग्रामपातळीवर स्थापन केलेल्या दक्षता समितीची यादी - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने याच अर्जामध्ये जून २००८ पूर्वी केलेल्या कामाच्या संदर्भात देखील याच मुद्दयावर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे मंडळ कृषि अधिकारी, मांडवी, किनवट व इस्लापूर यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस देऊन त्याप्रमाणे संबंधितांकडून माहिती प्राप्त होताच अपिलार्थीस माहिती देण्याचे आश्वासीत केले. यानंतर परत अपिलार्थीस दिनांक २०-११-२००७ रोजी वेगळ्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन किनवट,

बोधडी, इस्लापूर, मांडवी या मंडळ कृषि अधिका-यांकडून माहिती प्राप्त होताच माहिती देण्याचे आश्वासीत केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी प्रथमतः दिनांक २१-०१-२००८ रोजी तालुका कृषि अधिका-यास वेगळ्या पत्राव्दारे या मागणीचा पाठपुरावा केला. परंतु अपिलार्थीस या पत्रासंबंधाने संबंधितांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहिती-पासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त प्रशासकीय मान्यतेच्या प्रतीच्या संदर्भात माहिती प्राप्त झाली आहे. परंतु उर्वरित कोणत्याही मुद्दयावर त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी फक्त प्रशासकीय खर्चाची प्रत अपिलार्थीस पुरविल्याचे कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देणे अनिवार्य आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रामुख्याने मंडळ कृषि अधिकारी

यांच्याकडे उपलब्ध असते. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्यासाठी त्यांनी वेळोवेळी संबंधित मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे देखील जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे, हे पाहता या प्रकरणाशी संबंधीत सर्व मंडळ कृषि अधिका-यांकडून, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, एकत्रित करुन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

यासंदर्भात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता ती अत्यंत मर्यादित असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुदतीत देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण असावी असे सकृतदर्शनी आयोगास वाटत नाही आणि जरी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाचे मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर केवळ याच कामासाठी वळवावे लागणार असल्याचे त्यांना वाटत होते तर त्यांनी अधिनियमातील कलम ७ (९) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस तसे कळविले असते तरीही अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (८) च्या तरतुदीप्रमाणे प्रतिसाद दिला असे आयोगास म्हणता आले असते. अपिलार्थीच्या दिनांक ११-१०-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद दिनांक २०-११-२००७ रोजी म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत संपून गेल्यानंतर दिला आहे. हा प्रतिसाद अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती पुरविण्याच्या दृष्टीने पुरेसा सकारात्मक आहे असे आयोगास वाटत नाही. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त प्रशासकीय मान्यतेच्या प्रती देऊन उर्वरित माहिती संदर्भात त्यांना संबंधितांकडून माहिती प्राप्त होताच ती पुरविण्यात येईल असे आश्वासीत केले आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने हा प्रतिसाद वैध आहे असे म्हणता येणार नाही. या संपूर्ण घटनाक्रमाच्या घडामोडीकडे पाहिले असता आयोगास असे आढळून येते

की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी मांडवी, इस्लापूर, बोधडी व किनवट यांनी टाळाटाळ केली आहे व अपिलार्थीपासून ही माहिती दृष्ट हेतूने दडविली आहे. मंडळ कृषि अधिकारी त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीने ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस पात्र ठरत आहेत. आज रोजी सुनावणीसाठी संबंधित मंडळ कृषि अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, मांडवी, इस्लापूर, किनवट व बोधडी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पूरवून, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, मांडवी, इस्लापूर, बोधडी व किनवट यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, मांडवी, इस्लापूर, किनवट व बोधडी यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानीवार, वॉर्ड क्रमांक ३, वेलमापूरा, हनुमान मंदिरजवळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, बोधडी, तालुका किनवट जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, मांडवी, तालुका किनवट जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, इस्लापूर, तालुका किनवट जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ८२९/०८, ८३०/०८ व ८३१/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८२९, ८३० व ८३१

निर्णय दिनांक १०-०७-२००९

१ श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानिवार, अपिलार्थी
मु. पो. वेलामपूरा वार्ड क्रमांक ३, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : अपील क्रमांक ८२९/०८ : १. श्री. पी. आर. पत्की
२. श्री. सुभाष गणपतराव चाडावार

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १०-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांचे दिनांक ०९-०७-२००९ रोजीचे पत्र सादर केले असून या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थीस

आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने त्यांची आज रोजीच्या अपिलांसंदर्भात कोणतीही तक्रार नाही. त्यांच्या या पत्रासोबत त्यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०८-०७-२००९ रोजीचे पत्र सादर केले असून या पत्राच्या पहिल्या परिच्छेदात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी नमूद केल्याप्रमाणे त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविल्याचे नमूद केले आहे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे अभिप्राय देखील त्यांनी दिले आहेत. या पत्रावरुन अपिलार्थीस तीनही प्रकरणांची संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने व यासंदर्भात अपिलार्थीची कोणतीही तक्रार राहिली नसल्याने अपिलार्थीची तीनही विचाराधीन अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ८२९/२००८, दिनांक १२-०३-२००८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ८३०/२००८, दिनांक १२-०३-२००८ खारीज करण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक ८३१/२००८, दिनांक १२-०३-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानिवार, मु. पो. वेलामपूरा वार्ड क्रमांक ३, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ८३२/०८, ८३३/०८ व ८३४/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८३२, ८३३ व ८३४

निर्णय दिनांक १०-०७-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक ८३२/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उमरी,
तालुका उमरी, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक ८३३/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर,
जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक ८३४/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हिमायतनगर,
तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, हिमायतनगर, तालुका
हिमायतनगर, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००८ रोजी नोंदविलेले एक व दिनांक २५-०४-२००८ रोजी नोंदविलेली दोन व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने एकच माहिती कृषि विभागाशी संबंधित तालुका कृषि अधिकारी, उमरी, माहूर व हिमायतनगर यांच्या कार्यालयाकडे मागितली आहे. यावर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे एकाच दिवशी दिनांक २०-११-२००७ रोजी प्रथम अपिले केली. तथापि या तीनही अपिलांवर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेतल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १०-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक ८३२/२००८ व ८३३/२००८ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

उपरोक्त तीनही अपील प्रकरणांची सुनावणी आज रोजी आयोगातर्फे घेतली गेली त्यावेळी तालुका कृषि अधिकारी, उमरी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना अपिलार्थी यांचा दिनांक ०८-१०-२००७ रोजीचा माहितीसाठीचा कथित मूळ अर्ज मूळात प्राप्त झाला नाही. अपिलार्थीस जी माहिती हवी आहे ती त्यांना अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-११-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलाव्दारे ज्ञात झाली. अपिलार्थीस ज्या माहितीची आवश्यकता आहे ती माहिती त्यांनी त्यांचा अर्ज दिनांक २८-११-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर दिनांक २५-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे व ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपिलार्थीस दिनांक ०४-०२-२००८ रोजी प्राप्त झाल्याचा पुरावा त्यांनी आयोगास दाखविला. यावरुन अपिलार्थीस अपील क्रमांक ८३२ च्या संदर्भातील माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अपील क्रमांक ८३३ च्या संदर्भात तालुका कृषि अधिकारी, माहूर यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ०१-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली होती. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २०-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक १९-१२-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी हे त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीकरिता गैरहजर राहिल्याने त्यांनी दिनांक १९-१२-२००७ रोजी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी सुनावणीसाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीच्या अपील क्रमांक ८३४ च्या संदर्भात आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी अथवा जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी व प्रथम अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. या परिस्थितीत तालुका कृषि अधिकारी, हिमायतनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत नोंदणीकृत डाकेव्दारे विनामूल्य पुरवावी.

या तीनही प्रकरणी अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक यांची नांवे व पदे ही माहिती विचारली होती. तसेच मुख्यालयी राहत नसलेल्या कर्मचा-यांची नांवे व पत्ते विचारले होते. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयामध्ये मुख्यालयी राहत नाही असे कोणतेही अधिकारी नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या या मुद्दयावरील माहिती निरंक आहे.

वरील जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता अपिलार्थीस तालुका कृषि अधिकारी, उमरी, यांच्याकडून विलंबाने, व माहूर यांच्याकडून विहित मुदतीत माहिती पुरविली गेल्याचे दिसून येते. तालुका कृषि अधिकारी, उमरी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी २९ दिवसांचा विलंब लावल्याने त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही करावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. तालुका कृषि अधिकारी, हिमायतनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत नोंदणीकृत डाकेव्दारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील क्रमांक ८३२ हे अंशत: मान्य करण्यात येत असून अपील क्रमांक ८३३ हे फेटाळण्यात येत आहे व अपील क्रमांक ८३४ हे मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ८३२/२००८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ८३३/२००८ फेटाळण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक ८३४/२००८ मान्य करण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी, माहूर यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ८३५/२००८ व ८३६/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८३५ व ८३६

निर्णय दिनांक १०-०७-२००९

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी
पिंपळगाव रेणुकाई, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

**अपील क्रमांक ८३५/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले

असता या अपिलावर आदेश होऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या रोजगार हमी योजना संदर्भातील पतमर्यादेबाबत व योजना राबविणारे शाखा अभियंता व म. कारकून यांची नांवे, मजुरांचे हजेरीपत्रके, पगारपत्रक व धान्य वाटप याची दि. ०१-०४-०७ ते दि. ०३-०५-०७ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी १४-०२-२००८ रोजी आपला निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २५-०२-२००८ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांच्या म्हणण्याशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित विभागास अपिलार्थीस देण्याचे सूचित केले होते तथापि त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ प्रमाणे देणे अनिवार्य आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे असे म्हणणे आहे की, संबंधित विभागाने अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन दिली नाही. तथापि या प्रकरणी जर अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधित उप अभियंत्यांकडे उपलब्ध होती तर अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही का केली नाही याची कारणे आयोगास त्यांच्या उपस्थितीशिवाय कळण्यास मार्ग नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक व कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी संबंधित उप अभियंता हे जबाबदार असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही, एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांनी माहिती न पुरविल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय आवश्यक माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा असे त्यांना सूचित

करण्यात येत आहे. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेला विलंब त्यांना मान्य आहे असा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ८३५/२००८ मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित उप अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी , अंबड, भोकरदन, परतूर व जालना यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**<u>अपील क्रमांक ८३६/२००८</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक १३-०२-२००८ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले होते. तथापि जन

अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. जी. एम. शेख शाखा अभियंता यांच्या कार्यकाळात झालेल्या कामासंदर्भात सन २००४ ते सन २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०२-२००८ रोजीच्या आदेशाव्दारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २५-०२-२००८ पूर्वी विनामूल्य माहिती पुरविण्याचे सूचित केले. तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांना त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी माहिती पुरविली असून या पृष्ठ्यर्थ अपिलार्थीने कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

विभाग, जालना यांच्याकडे दिनांक ०७-०३-२००८ रोजी लेखी जबाब दिला आहे. त्यांनी अपिलार्थीच्या या जबाबाची प्रत आयोगास सादर केली असून या जबाबामध्ये अपिलार्थीने त्यांना भोकरदन उपविभागाकडून माहिती प्राप्त झाली असे नमूद केले आहे. अपिलार्थीची पोचसही असलेली जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेली प्रत अपिलार्थीस दाखविली असता या पोचपावतीवरील सही अपिलार्थीची नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नसल्याच्या त्यांच्या मुद्दयाचा पुनरुच्चार केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत अशी माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी पुरविली असून अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात आयोगाकडे सादर केलेल्या पोच पावतीवरील सही त्यांची नाही. या दोनहीवर तोडगा काढण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत पुनश्च एकदा विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच, दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत, पुनश्च ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, पिंपळगाव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपिले क्रमांक ९०४/०८ व ९०५/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९०४ व ९०५
निर्णय दिनांक १३-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १.) | श्री. नवनाथराव राधाकिशन खजिनदार,<br>मु.पो.लोणार-भायगाव,ता.अंबड, जि.जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १.) | <u>१.अपील क्र.९०४/०८:</u><br>जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, जालना जि. जालना . | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी :
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग, जालना, जि. जालना.

<u>२.अपील क्र.९०४/०८:</u>
जन माहिती अधिकारी,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, अंबड जि. जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी :
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग, अंबड जि. जालना.

२.) जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.११.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत. या प्रकरणी अपिलार्थीने एकच माहिती दोन जन माहिती अधिकारी यांना विचारली असल्याने व यासंदर्भातील दोनही

प्रकरणाशी संबंधित दोनही द्वितीय अपील एकाच दिवशी सादर केली असल्याने अपील क्र. ९०४/०८ व ९०५/०८ ची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

स्ह्मnड्ढः अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने व त्यांचा माहितीसाठीचा अर्ज स्वीकार करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी नकार दिल्याने, विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना यांच्याकडे व दि.०३.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर) अंबड उपविभाग, जि.जालना यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील दि.०१ जानेवारी ते एप्रिल, २००८ अखेरपर्यंतच्या कालावधीतील त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या रोहयोच्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. जालना उपविभागाच्या संदर्भात अपिलार्थीने बावणे पांगरी क्र.दोन, डोंगरगाव क्र.५, कंडारी (खु.),देवपिंपळगाव क्र.४, सागरवाडी पा.त.क्र.५ या ठिकाणी  केल्या गेलेल्या रोहयोच्या कामावरील मजूरांची संख्या, त्याचे हजेरीपत्रक आणि मजूरांचा झालेला पगार- अशी माहिती मागितली होती व अंबड उपविभागाकडे याच मुद्यांवरील माहिती - लोणार,भायगाव क्र.४, बदापूर, पा.त.क्र.१,बदापूर अंतरवाल २, आबा चिकनगाव २, खेडगाव ४, २ मध्ये झालेल्या कामावरील मजूरांची संख्या, झालेला एकूण पगार, एकूण झालेल्या कामांची संख्या व अंदाजपत्रकाच्या प्रती, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने या दोन्ही प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास दोनही जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे  जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर), जालना यांच्याकडे अनुक्रमे दि. २७.०८.२००८

व ०३.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या दोनही अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता, उपविभागीय अधिकारी, ल.पा. (स्थानिक स्तर), उपविभाग जालना व उपविभागीय अधिकारी, ल.पा.(स्थानिक स्तर) उपविभाग अंबड यांनी अनुक्रमे दि.०६.०९.२००८ व दि.१७.१०.२००८ रोजी दोन वेगवेगळी पत्रे लिहून अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या दोन प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १३.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. ल.पा.(स्था.स्त.)जालना उपविभागातर्फे प्रभारी उपविभागीय अधिकारी, श्रीनिवास बालाजी काळे हे आयोगासमोर हजर आहेत. त्यांना या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती नसून माहिती सादर करण्यास्तव ते आयोगास एक महिन्याची मुदत मागत आहेत. त्यांची विनंती आयोगाने अमान्य केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस किती दिवसात देऊ शकतील अशी आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी आयोगास एक महिन्याच्या आत ते माहिती देऊ शकतील, असे अवगत केले. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीची अनुपस्थिती, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त दोनही प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास सकारात्मक प्रतिसाद दिला नाही, एवढेच नव्हे तर कार्यकारी अभियंता यांच्या दि. ०६.०९.२००८ व १७.१०.२००८ रोजीच्या पत्रानाही उपविभागीय अधिकारी (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना व उपविभागीय अधिकारी (स्थानिक स्तर) उपविभाग,अंबड यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस कोणत्या समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक

असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती मिळवून देण्यासंबंधी कोणताही प्रतिसाद न देऊन, आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. अशी आयोगाची या प्रकरणी खात्री झाली आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग जालना, जि. जालना व उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग,अंबड,जि.जालना यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची उपरोक्त दोनही अपिले मान्य करण्यात येत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.९०४/०८ व ९०५/०८ मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्त.), उपविभाग, जालना,जि.जालना व उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्त.) उपविभाग,अंबड, जि.जालना यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे व्यक्तीशः व विनामुल्य उपलब्ध करुन दयावी.
३. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग जालना जि. जालना व उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग जालना जि. जालना यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १३-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नवनाथराव राधाकिशन खजिनदार,मु.पो.लोणार-भायगाव,ता.अंबड, जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग जालना जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, जालना यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव ( जलसंपदा ) मंत्रालय मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपिले क्रमांक ९०६/०८ व ९०७/०८

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९०६ व ९०७
निर्णय दिनांक १३-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १.) श्री. शेख अफसर शेख बाबु,<br>रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १.) जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका,<br>फैजूल उलुम प्राथमिक शाळा,<br>फारुखनगर,नांदेड | : | प्रतिवादी |
| २.) जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०५.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्र.९०६/०८:**

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेत शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांची नावे, अपिलार्थीचा नाव व पत्ता मागितला होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने

अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३०.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०२.२००८ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०६.०२.२००८ रोजी माहिती देण्याचे सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती दिली, तथापि या माहितीमध्ये त्यांच्या शाळेतील इयत्ता १ व २ ची माहिती ते अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. यामुळे व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या दोन प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १३.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापही त्यांच्या शाळेतील इयत्ता १ ब मधील विद्यार्थ्यांची यादी प्राप्त झाली नाही, असे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आयोगास असा लेखी स्वरुपात अवगत केले की, अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची शिल्लक माहिती त्यांच्याकडे तयार आहेत व ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेला त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये 'सोबत प्रत्येक वर्गाची नावे व शिक्षकांची नावे संपूर्ण पत्त्यासह 'देण्यात येत आहे, असे नमूद केले आहे. तथापि, त्यांच्या या विनादिनांकाच्या पत्राबरोबर अशाप्रकारची कोणत्याही याद्या जोडल्या नाहीत.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील इयत्ता १-ब या तुकडीतील विद्यार्थ्यांची व शिक्षकांच्या नावाची यादी, अपिलार्थीने अर्ज करुन अंदाजे दीड वर्ष इतका कालावधी लोटून गेल्यानंतरही अद्यापपर्यंत का देण्यात आली नाही, याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस आयोगाकडे आज रोजी करता आले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या संपूर्ण घटनाक्रमामध्ये एक संशयास्पद बाब स्पष्ट होत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील एका वर्गाच्या तुकडीचीच माहिती संबंधित शाळेकडे उपलब्ध नसावी याचे आयोगास आश्चर्य तर वाटतच आहे, परंतु ही संपूर्ण बाब संशयास्पद असल्याचे आयोगाचे मत आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस कथित १ ब या तुकडीमधील विद्यार्थ्यांची व त्यांच्या शिक्षकांची नावे व पत्ते् २ दिवसांच्या आत देण्याचे आयोगास कबूल केले, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच विनामूल्य व व्यक्तीशः पुरवावी. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती (इयत्ता १-ब) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दोन दिवसांच्या आत देतील याची त्यांनी व्यवस्था करावी. अन्यथा या शाळैच्या संपूर्ण कार्यभाराची चौकशी करण्याच्या दृष्टीने जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा यथायोग्य सक्षम प्राधिकरण यांच्याकडे माध्यमिक शाळा संहितेनुसार संबंधित शाळेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि.२३.११.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित व स्वरुप अत्यंत सोपे होते, असे आढळून येत आहे. ही माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.१२.२००७ रोजी अगर तत्पूर्वी अपिलार्थीस देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी एकूण ४६ दिवसांचा विलंब लावला आहे व इतक्या विलंबाने देखील त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिली असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे.

आज रोजी आयोगासमोर संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित नाहीत. उपरोक्त प्रकरणातील त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. या मुद्यावर त्यांचे

म्हणणे जाणून घेण्याच्या दृष्टीने त्यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस ४६ दिवसांच्या विलंबाना अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे ४६ दिवसांसाठी एकूण रु.११,५००/-इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

५) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

६) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.२ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

७) जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय ४६ दिवस इतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.११,५००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अपील क्र.९०६/०८:**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २३.१०.२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांच्या शाळेशी संबंधित माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे विचारली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे - "प्रत्येक शिक्षकास प्रत्येक महिन्याला किंवा वर्षाला शालेय साहित्यासाठी किती रक्कम (अनुदान) येते, ती रक्कम कोणत्या बँक खात्यामध्ये जमा होते व ती रक्कम साहित्य खरेदी करण्यासाठी खर्च करण्यात येते का? सन २००५ ते २००७ पर्यंत त्या अनुदानाने (रक्कम) कोणकोणत्या साहित्य खरेदी करण्यात आले, त्याचे पावत्यांची छायांकित प्रती देणे व जे साहित्य खरेदी केले ते कोठे केले आहे, श्रीमती सबीहा सुलताना सय्यद मुस्ताक ही सहशिक्षिका शाळेत का येत नाही ? कारणासह संपूर्ण माहिती देणे " अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. २३.१०.२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या तीनही मुद्यांवरील माहिती दिली, परंतु ही माहिती खोटी व दिशाभूल करणारी वाटल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २८.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय यांनी दि. २९.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर निर्णय घेताना जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध रेकॉर्डवरुन माहिती दिली असल्याचे गृहीत धरुन घेतलेला आहे. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, "अपिलार्थीने कशाच्या आधारे ती माहिती खोटी व दिशाभुल करणारी आहे त्याचा काही पुरावा सादर केला नाही." जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खोटी आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी आयोगाकडे याच जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली दोन पत्र आयोगास दाखविले. यापैकी एका पत्रामध्ये संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीस मुख्याध्यापकाकडून अनुदानातील कोणतीही रक्कम घेतली नसल्याचे म्हटले आहे व दुसऱ्या पत्राद्वारे अपिलार्थीस मुख्याध्यापक यांच्याकडून रक्कम

मिळाल्याचे पत्र आयोगास दाखविले आहे. या दोनही परस्पर विरोधी विधानावरून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिल्याचे वाटत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून, या लेखी युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, "दि.०५.०७.२००७ रोजी बँकेतील खात्यातून त्यांनी रु.१८,०००/- साहित्य खरेदीसाठी उचलले होते. तथापि त्या काळात मुसळधार पाऊस झाल्याने पडलेल्या शाळेच्या इमारतीची पुनर्बांधणी करण्याकरिता आवश्यक ती रक्कम त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने शिक्षकांकडून उसने घेऊन शाळेचे बांधकाम केले  व संस्थेच्या खात्यामध्ये जेव्हा रक्कम येईल ती सर्व रक्कम शिक्षकांना साहित्य खरेदीसाठी देण्यात येईल व आज संस्था रु.१८,०००/- परत करण्यास तयार आहे. त्यामुळे शिक्षण संस्थेने (संस्थेतील शिक्षकांनी) प्राप्त अनुदानातील कोणतेही शैक्षणिक साहित्य खरेदी केले नसल्याने, त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली या विषयाची मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती उपलब्ध नाही."

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणात असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १९.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे शिक्षकांनी शालेय साहित्य खरेदी केलेल्या पावत्या संस्थेकडे सादर केल्या नसल्यामुळे अपिलार्थीस पावत्याच्या छायाप्रती देण्यास असमर्थतता दर्शविली होती. तथापि आज रोजी आयोगास सादर करण्यात आलेल्या स्पष्टीकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१९.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली माहिती ही प्रत्यक्षातील वस्तुस्थितीपेक्षा विसंगत असल्याचे आयोगास आढळले आहे. यावरुन अपिलार्थीचा, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिली हा आक्षेप सिध्द होत आहे. सर्व शिक्षकांना देण्यात येणाऱ्या या अनुदानाचा थेट संबंध केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियानाशी संबंधित असल्याचे दिसून येत आहे. सर्व शिक्षा अभियानाशी संबंधित असल्याचे दिसून येत आहे. सर्व शिक्षा अभियान योजनेच्या अंमलबजावणीमध्ये प्रत्यक्ष लाभार्थ्यांना कसा लाभ मिळू शकत

नाही, याचे हे प्रकरण म्हणजे मुर्तीमंत उदाहरण ठरावे.सबब सचिव (शालेय शिक्षण)यांना या प्रकरणाची त्यांच्या स्तरावरुन चौकशी करण्यात यावी, असे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. विशेषतः केंद्र शासनाकडून एका विशिष्ट उद्दिष्टाकरिता प्राप्त होणाऱ्या अनुदानाचा विनियोग कसा गैरप्रकारे होत आहे. हे जाणून घेण्यासाठी त्यांनी या प्रकरणाची मंत्रालय स्तरावरुन चौकशी करावी, ही चौकशी त्यांनी शिक्षण विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे कृपया सोपवू नये व या प्रकरणाशी संबंधित दोषी आढळले तर त्या संबंधितांवर कायदेशीर तरतुदीप्रमाणे यथायोग्य कारवाई करावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीच्या मुद्दा क्र.१ मधील "----रक्कम साहित्या खरेदी करण्यासाठी करण्यात येते का?" या भागावर व तसेच मुद्दा क्र.३ मधील "सहशिक्षक शाळेत का येत नाही", या भागावरील माहिती मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. कारण ती अधिनियमातील विहित तरतुदीशी विसंगत आहे.उपलब्ध मुद्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली आहे. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादाची प्रत देखील आज सुनावणीच्या वेळी समक्ष देण्यात आली. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना कोणताही आदेश नाही.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती देऊन अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरले आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी त्या आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांना बचावाची संधी देण्याच्यादृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्य दि.१९.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार

असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख अफसर शेख बाबु,रा.हमालपूरा मस्जीदजवळ,नांदेड-४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, उलुम प्राथमिक शाळा,फारुखनगर,नांदेड-यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपिले क्रमांक ९०८/०८ व ९१०/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९०८ व ९१०
निर्णय दिनांक १३-०७-२००९

१.) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१.) जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
अपरंपार स्वामी आदिवासी आश्रमशाळा,
मौजे डोंगरगाव, पोस्ट मुदखेड,
ता.मुदखेड,जि.नांदेड

२.) जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
छत्रपती राजे शिक्षण बहुउद्देशिय प्रतिष्ठान संचालित
तामसा मार्फत अपरंपार स्वामी आदिवासी
आश्रमशाळा,
मौजे डोंगरगाव, पोस्ट मुदखेड,
ता.मुदखेड,जि.नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : संचालक, एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २४.११.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी

जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, छत्रपती राजे शिक्षण बहुउद्देशिय प्रतिष्ठान संचालित तामसा यांच्याकडे प्रथम अपील केले असता, संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी न घेता, प्रकरण प्रलंबित ठेवली गेल्याने त्यांनी विचाराधीन दोनही अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या दोनही प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२४.११.२००७ रोजी माहितीसाठीचे दोन स्वतंत्र मूळ अर्ज सादर केले होते. त्यापैकी अपील क्र. ९०८ च्या संदर्भातील मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या शाळेत असलेल्या एकूण विद्यार्थ्यांची वर्गनिहाय संख्या, त्यांच्या हजेरी मस्टरच्या सत्यप्रती तसेच विद्यार्थ्यांना शासनाकडून त्यांना मिळालेल्या अनुदानाविषयीची माहिती मागितली होती व अपील क्र. ९१० च्या संदर्भातील मूळ अर्जाद्वारे त्यांनी शाळेमध्ये कायम स्वरुपी कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या दोनही अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमाद्वारे कलम १९(१)च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, सचिव, छत्रपती राजे शिक्षण बहुउद्देशिय प्रतिष्ठान संचालित तामसा यांच्याकडे दि. १६.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी देखील अपिलार्थीच्या या अपील अर्जामध्ये कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १३.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व संबंधित संस्थेचे सचिव उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १६.०१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावर प्रथमतः निर्णय होणे आयोगास गरजेचे वाटते. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून

संचालक, एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभाग, नांदेड यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्याने, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या दि.१६.०१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्ज संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथमतः सादर करावा. अपिलार्थीचा दि.१६.०१.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज संबंधित जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांनी नेमलेल्या इतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी, तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले आदेश याच कालावधीमध्ये पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची उपरोक्त दोनही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.९०८/०८ व ९१०/०८ निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभाग, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या दि.१६.०१.२००८ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अपरंपार स्वामी आदिवासी आश्रमशाळा,मौजे डोंगरगाव, पोस्ट मुदखेड, ता.मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ९११/०८ , ९१२/०८,९१३/०८,९१४/०८,९१५/०८ व ९१६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९११,९१२,९१३,९१४,९१५ व ९१६
निर्णय दिनांक १३-०७-२००९

१. श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,किनवट,जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा,
तहसीलदार, किनवट, जि. नांदेड

त्रयस्थ पक्षः अपील क्र.९११/०८-श्री. के.जी.तुडमे व श्री. सुधीर बिडवई,
अपील क्र.९१२/०८-श्री.गफारखॉन सादेकखॉन,
अपील क्र.९१३/०८-श्री. डी.पी.घोडजकर,
अपील क्र.९१४/०८-श्री.किशनसिंघ गगनसिंघ,
अपील क्र.९१५/०८-श्री.जोगेंद्रसिंघ गंगानसिंघ नालेवाले,
अपील क्र.९१६/०८-श्री.रितेश दिपक पुरी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०५.२००८ रोजी नोंदविलेली एकूण सहा स्वतंत्र द्वितीय अपिले, क्र.९११/०८, ९१२/०८,९१३/०८,९१४/०८,९१५/०८ व ९१६/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १३.०७.२००९ रोजी घेण्यात आली. सुनावणीस जन माहिती अधिकारी अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री.सुधीर बिडवई,श्री.गफारखॉन सादेकखॉन, श्री. डी.पी.घोडजकर व श्री. रितेश दिपक पुरी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत रु.१००/- इतक्या किमतीच्या कोर्ट-फी-स्टॅम्पपेपरवर दि. ११.०७.२००९ रोजी लिहिलेले त्यांचे शपथपत्र सादर करण्यात आले असून, या शपथपत्रावर अपिलार्थीने त्यांची आयोगाकडील आज विचाराधीन असलेली सहाही अपिले, क्र.९११/०८, ९१२/०८,९१३/०८,९१४/०८,९१५/०८ व ९१६/०८ ही ते, त्यांना आवश्यक ती माहिती त्रयस्थ पक्षाकडून प्राप्त झाल्याने मागे घेत असल्याचे म्हटले आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेली त्यांची विचाराधीन सहाही अपिले, आता मागे घेतली असल्याने अपिलार्थीची आयोगाकडे विचाराधीन असलेली सहाही अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ९११/०८, ९१२/०८,९१३/०८,९१४/०८,९१५/०८ व ९१६/०८,दि. १२.०५.२००८ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम,रा.रामरहीमनगर,घर नं.९-४-१०६१,पोस्ट ईतवारा,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८३७

निर्णय दिनांक १४-०७-२००९

१ श्री. काजळकर शंकर साहेबराव, : अपिलार्थी

मु. पो. सिरसवाडी, तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा गृहपाल, डॉ. बाबासाहेब

आंबेडकर मुलांचे शासकीय वस्तीगृह, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी बोगस व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६ ते २००८ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००७ ते २००८ या वर्षातील निवड याद्या, प्रवेशित याद्या व मासिक निर्वाह भत्ता याद्या, आणि सन २००६ ते २००८ या वर्षातील कर्मचा-यांचे हजेरीपट - मुद्दयांचा समावेश होता. या अर्जामध्ये अपिलार्थीने असेही म्हटले आहे की, या सर्वांच्या

ओरिजनल प्रती पाहून नंतर छायांकीत प्रती त्यांना मिळाव्यात. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीचे शुल्क रुपये २०० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने तसे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०५-२००८ रोजी सुनावणी घेतली व सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचा अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या निर्णयामध्ये उल्लेख आहे. तथापि प्राप्त झालेली माहिती ही दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाप्रमाणे प्रत्यक्षात त्यांना माहिती दाखवून नंतर त्यामधून त्यांना माहितीच्या छायांकीत प्रती दिल्या गेल्या होत्या. त्याप्रमाणे त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०५-२००८ रोजी आवश्यक ती माहिती त्यांच्याकडून आवश्यक ते शुल्क घेऊन पुरविली आहे.

तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असा खुलासा केला की, अपिलार्थीस माहितीपोटी आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्याकरिता दिनांक १८-०३-२००८ रोजी कळविले. तदनंतर अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे चलनाव्दारे दिनांक ०७-०४-२००८ रोजी भरले व यानंर अपिलार्थीस प्रत्यक्षात दिनांक २०-०५-२००८ रोजी माहिती देण्यात

आली. त्यांच्या या विधानापृष्टयर्थ त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याची पोच प्रत आयोगास सादर केली. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०५-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले असले तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला हा प्रतिसाद अवैध आहे कारण या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस, त्यांना आवश्यक माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील तसेच हे शुल्क कोठे व कसे भरावयाचे याचा कोणताही उल्लेख जो त्यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे कळविणे आवश्यक आहे तो कळविला नसल्याने त्यांचा दिनांक १८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस दिलेला प्रतिसाद अवैध ठरत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००८ रोजी दिलेला प्रतिसाद अवैध ठरत असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये २०० हे त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे शुल्क हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही बोगस व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद केले आहे. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती बोगस व दिशाभूल करणारी कशी आहे, हे आयोगाकडील सुनावणीस ते गैरहजर राहिल्याने, आयोगास कळण्यास मार्ग नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून

येते. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये नमूद केलेला दिशाभूल करणारी माहिती दिली हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २०० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. काजळकर शंकर साहेबराव, मु. पो. सिरसवाडी, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा गृहपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वस्तीगृह, तहसील कार्यालयासमोर, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८३८

निर्णय दिनांक १४-०७-२००९

१ श्री. दादाराव भाऊराव तुपकर, : अपिलार्थी
संचालक, महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
रेणुका हॉस्पिटल, शिवाजी पुतळा रोड, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक औरंगाबाद
वनविभाग यांचे कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक,
औरंगाबाद वनविभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही तसेच त्यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयात दिनांक ३१-०८-२००४ पासून दिनांक १२-०१-२००५ पर्यंत वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना या पदावर काम करीत असलेल्या अधिका-याचे नांव, कार्यकाळ व सध्या ते कोठे व कोणत्या पदावर कार्यरत आहेत त्या कार्यालयाचा पत्ता, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहावे लागल्याने व त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना दिनांक २५-०७-२००८ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. त्यांना आवश्यक ती माहिती पाच महिने इतक्या विलंबाने प्राप्त झाली असल्याने संबंधितावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्तीची कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक १४-०१-२००८ रोजीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात जावक शाखेतून त्यांना प्रथमतः दिनांक २८-०१-२००८ रोजी प्राप्त झाला. यानंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेकडून त्यांना घ्यावी लागणार होती. त्यामुळे त्यांनी दिनांक २८-०१-२००८ रोजी

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविण्यासंदर्भात आस्थापना शाखेस कळविले. नंतर अपिलार्थीच्या माहितीसाठी त्यांनी आस्थापना शाखेस दिनांक २१-०२-२००८, ०८-०५-२००८ व २७-०६-२००८ रोजी त्यांनी पत्राव्दारे पाठपुरावा केला व तदनंतर आस्थापना शाखेकडून त्यांना दिनांक २५-०७-२००८ रोजी माहिती प्राप्त झाली. त्यांनी ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे मर्यादीत स्वरुप व छोटी व्याप्ती पाहता, ही माहिती कार्यालयीन अभिलेखे तपासून व ती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांना जास्तीत जास्त एक ते दोन दिवस इतका कालावधी लागला असता असे लक्षात येते. तथापि अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाची उप वनसंरक्षक औरंगाबाद यांच्या कार्यालयात प्रथमतः वेगवेगळया सर्व टप्प्यावर उपेक्षा केली गेली आहे. मूळात आवक शाखेतून अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे जाण्यासाठी १४ दिवसांचा विलंब लागला आहे. तदनंतर आस्थापना शाखेने दिनांक २८-०१-२००८ ते २५-०७-२००८ या कालावधीत अपिलार्थीस एवढी साधी माहिती देण्याचे देखील सौजन्य दाखविले नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५, हा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली, त्यावेळी अस्तित्वात येऊन तीन वर्षाहून जास्त कालावधी लोटला होता तरीही अपिलार्थीस तीस दिवसात माहिती पुरविण्याचे भान उप वनसंरक्षक ते संबंधित जावक लिपीक यांच्यापैकी कोणालाही राहिले नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अर्जाची अशा रितीने केलेल्या उपेक्षेची आयोगाने गांभीर्याने नोंद घेतली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक व कर्मचारी यांना देखील जन माहिती

अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. ही तरतूद पाहता या प्रकरणी उप वनसंरक्षक यांच्या कार्यालयातील तत्कालीन जावक लिपीक यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज पाच दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते. तथापि त्यांनी तशी कृती केलेली नाही. त्यामुळे आवक जावक लिपिकासह जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील त्यांना माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले आस्थापना शाखेतील सर्व संबंधित कर्मचारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब जन माहिती अधिकारी व त्यांच्या आस्थापना व पत्रव्यवहार शाखेतील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पाच महिने इतक्या विलंबाने पुरविल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे सर्व संबंधितांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी

अशा प्रसंगाची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने उप वनसंरक्षक, औरंगाबाद वनविभाग, औरंगाबाद यांना असे स्पष्ट करण्यात येते की, त्यांच्या कार्यालयातील माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी वेळीच सतर्कतेने कार्यवाही केली असती तर अशा प्रकारची कृती करण्याची आयोगास आवश्यकता वाटली नसती. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न करुन त्यांच्या अपील अर्जाची उपेक्षा केल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. उप वनसंरक्षक यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची मुख्य वनसंरक्षक यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना येथे सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित आस्थापना शाखेतील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दादाराव भाऊराव तुपकर, संचालक, महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, रेणुका हॉस्पिटल, शिवाजी पुतळा रोड, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक औरंगाबाद वनविभाग यांचे कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, औरंगाबाद वनविभाग औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८३९

निर्णय दिनांक १४-०७-२००९

१ श्री. शिवाजी भाऊराव बनकर, : अपिलार्थी
रा. बुटखेडा, पोस्ट अकोला (देव), तालुका जाफ्राबाद,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद,
तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपील अर्जावरील सुनावणीच्या संदर्भात अद्याप आदेश प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांच्या या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जाफ्राबाद तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या इंदिरा आवास, स्वर्गीय राजीव गांधी घरकुल योजने अंतर्गत प्रतिक्षा यादीच्या प्रपत्रकानुसार जन माहिती अधिकारी यांच्या सहीने जिल्हा ग्रामीण यंत्रणेला सादर केलेल्या प्रपत्रकाच्या छायांकीत प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सत्यप्रतीच्या स्वरुपात व नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली असल्याचे या अर्जामध्ये दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील प्रतिक्षा यादी प्रत्येक ग्रामपंचायतीने जाहीर केली असल्याचे अपिलार्थीस कळविले व तसेच ही माहिती मूळ ग्रामपंचायतीशी संबंधीत असल्याने ती ग्रामपंचायतीकडून उपलब्ध करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले व अपिलार्थीस दिलेल्या या पत्राच्या प्रती सर्व ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामपंचायत यांना पाठवून त्यांना प्रतिक्षा याद्या उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-१२-२००८ रोजी सुनावणी घेतली व आपला निर्णय दिनांक २५-०२-२००९ रोजी पारित केला. या मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही त्यांनी मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे सत्यप्रत म्हणून प्रमाणित केलेली नाही. तसेच राजीव गांधी घरकुल योजनेसंदर्भात प्रपत्र "अ" आणि "ब" अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आता विनामूल्य साक्षांकीत करुन द्यावी व त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दंड करावा.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संबंधित ग्रामपंचायतीकडे असल्याने संबंधीत ग्रामपंचायतीशी संपर्क साधण्याचे त्यांना सूचित केले होते. तथापि नंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-१२-२००८ रोजी घेतलेल्या सुनावणीमध्ये आदेशित केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिनांक १३-१२-२००८ रोजी पुरविली. अपिलार्थीने अपेक्षित केल्याप्रमाणे ही माहिती प्रमाणित करुन देण्याची त्यांची तयारी आहे. तसेच राजीव गांधी घरकुल योजना राबविताना प्रपत्र "अ" व "ब" अशा प्रकारची दोन प्रपत्रे वापरण्याची पध्दत नाही. ही पध्दत फक्त इंदिरा आवास योजनेकरिता वापरण्यात येत असते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे.

मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे त्यांनी जिल्हा ग्रामीण यंत्रणेला पाठविलेल्या माहितीच्या प्रती मागितल्या होत्या. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांशी संपर्क साधण्याचे सूचित करण्याची त्यांची कृती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी अशी कृती केली नाही. अपिलार्थीस जन

माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती त्यांनी साक्षांकीत करुन मागितली आहे व ती त्या स्वरुपात देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर आज कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १३-१२-२००८ रोजी दिलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य साक्षांकीत करुन उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी सिध्द केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-१२-२००८ रोजी दिलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य साक्षांकीत करुन उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवाजी भाऊराव बनकर, रा. बुटखेडा, पोस्ट अकोला (देव), तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८४०

निर्णय दिनांक १४-०७-२००९

१ श्री. मंत्री गोपाळभाऊ बस्तीरामजी, : अपिलार्थी
गोदू गल्ली, मानवत, तालुका मानवत,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मानवत,
तालुका मानवत, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू,
जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. सोमनाथ रंगनाथ ढालकरी
श्री. स. सत्तार स. यासिन

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी आदेशित करुनही माहिती अधिका-याने माहिती न दिल्याने विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित व त्रयस्थ पक्ष श्री. सोमनाथ रंगनाथ ढालकरी व श्री. स. सत्तार स. यासिन यांच्या संदर्भात एकूण नऊ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षांचे तात्पुरते केरोसीन वाटप दिनांक २१-०२-२००८ रोजी बंद केले त्याची दिनांकासह नक्कल, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा दिनांक १२-०३-२००८ चा आदेश वरिष्ठ अधिका-यांना कळविण्यात आला काय, त्याची दिनांकासह नक्कल, रॉकेल वाटपासंदर्भात वाटप स्थळ व वाटपाची पध्दत याविषयावर आणि लायसन्सधारकांना स्वतः रॉकेल विक्री करण्याची अनुमती आहे किंवा कसे वगैरे स्वरुपाची माहिती विचारली आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक ९ व्दारे त्रयस्थ पक्षांच्या रॉकेल विक्री व स्टॉक रजिस्टर दिनांक २७-१२-२००१ ते १२-०७-२००६ या कालावधीतील स्टॉक व विक्री रजिस्टरच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०७-२००८ रोजी आपले आदेश पारित करुन या आदेशाव्दारे अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची सूचना देऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही स्वरुपात प्रतिसाद दिलेला नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही. त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर दिनांक २७-०९-२००८ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद का दिला नाही याची कारणे ते आयोगास सांगू शकत नाहीत. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात आयोगास असे अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०८-२००८ रोजी त्रयस्थ पक्ष श्री. सोमनाथ रंगनाथ ढालकरी यांच्याकडील रॉकेलच्या स्टॉक रजिस्टर प्रती उपलब्ध करुन दिल्या होत्या. तथपि अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण नऊ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. या माहितीतील बरीचशी माहिती (मुद्दा क्र. १ अंशतः ---- वरीष्ठाला कळविण्यात आला आहे काय ? मुद्दा क्र. २ मधील ---- अधिकारी साहेबाला देण्यात आला आहे काय ? मुद्दा क्र. ४ -- वाटपाचे स्थळ वरीष्ठ अधिकाऱ्यांना कळविले आहे काय ? मुद्दा क्र. ७ मधील मागितलेल्या माहितीवरुन अपिलार्थीस कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही व मुद्दा क्र. ८ मधील -- नियमित तपासणी व भेट दिली आहे काय ?) ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. मात्र या अर्जाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या प्रश्नावर उत्तरे अपेक्षिली आहे त्या प्रश्नांची उत्तरे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन आदेशामध्ये उपलब्ध आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस

किरकोळ वाटपधारकांना, अनुज्ञप्ती धारक यांना या संदर्भातील रॉकेल वाटपाचे स्थळ निश्चित करण्याकरिता शासनाकडून आलेल्या रॉकेलचे प्रत्यक्षात कसे वाटप करावयाचे यासंदर्भात वरिष्ठांकडून आलेल्या मार्गदर्शक सूचना व वाटप निश्चित करण्याकरिता असलेली मार्गदर्शक तत्वे यांची माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या विनामूल्य पुरवावी म्हणजे अपिलार्थीस बहुतांश माहिती प्राप्त होईल. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाकडील दिनांक २७-१२-२००१ ते १२-०७-२००६ या कालावधीतील संबंधित स्टॉक व विक्री रजिस्टरची माहिती मागितली होती. यासंदर्भात आज सुनावणीच्या वेळी श्री. सोमनाथ रंगनाथ ढालकरी व स. सत्तार स. यासिन हे दोघेही उपस्थित आहेत. त्यांनी आता ही माहिती बरीच जुनी असल्यामुळे त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असावी. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०८-२००८ रोजी ही माहिती दिली असल्याचे आयोगास अवगत देखील केले आहे ती माहिती आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य द्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या संपूर्ण घटनाक्रमाचा अभ्यास केला असता काही बाबी ठळकपणे निदर्शनास येत आहेत. त्यातील प्रमुख बाब म्हणजे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर संपूर्ण घटनाक्रमा-मध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यामध्ये त्यांनी कोणतेही स्वारस्य दाखविले नाही अथवा सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीच्या अर्जावर त्यांनी प्रथम कारवाई केली ती जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ११-०७-२००८ रोजीच्या निर्णयानंतर. या निर्णयानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दोन्ही त्रयस्थ पक्षांना फक्त दिनांक १८-०७-२००८ रोजी पत्र लिहून अपिलार्थीने मागणी केलेली व त्यांच्याशी संबंधित असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबद्दल कळविले व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. जन

माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन असे आढळून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती दिली परंतु आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्याकडून अशा प्रकारची कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याचे आयोगास अवगत केले. हे पाहता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या पत्रावरही आयोग साशंक आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे या प्रकरणाशी संबंधित वर्तन पाहता त्यांनी असा प्रकारच्या वर्तनाव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव नि:संशयपणे स्पष्ट केला आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. बी. एस. मोरे सध्या निलंबीत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मंत्री गोपाळभाऊ बस्तीरामजी, गोदू गल्ली, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८४१

निर्णय दिनांक १४-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संदिप गुलाबराव देशमुख,<br>पिंपळगांव (रेणुकाई), तालुका भोकरदन,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्राम विकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळगांव (रेणुकाई),<br>तालुका भोकरदन, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,<br>तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपील सुनावणीचे पत्र त्यांना उशिरा प्राप्त झाले व त्यांच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे पिंपळगांव रेणुकाई ग्रामपंचायत नमुना नंबर ५ व १५ यांच्या झेरॉक्स प्रती, ग्रामपंचायतीस संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत प्राप्त झालेला एकूण निधी व मजूर मस्टरच्या झेरॉक्स प्रती, याची सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. अपिलार्थीने माहितीची मागणी केलेला अर्ज विहित नमुन्यात नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस अवगत केले आणि या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहे किंवा कसे हे नमूद केल्यानंतर अपिलार्थीस यासंदर्भातील माहिती पुरविण्यात येईल असे कळविले. त्यानुसार अपिलार्थीने दिनांक २३-०९-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना ते आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यास तयार आहे असे कळविले. तथापि यावेळी अपिलार्थीस त्यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही. मात्र यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०१-२००९ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस लेखी म्हणणे त्यांच्याकडे तीन दिवसाच्या आत सादर करण्याची सूचना दिली. यानंतरही अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचा युक्तिवाद केला व मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसाठी आवश्यक ते शुल्क भरण्याकरिता ते तयार असल्याचे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने माहिती मागतांना सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११-१०-२००५ रोजीच्या अधिसूचनेप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज केलेला नाही. या अर्जामध्ये अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे या मुद्दयाचा यात समावेश नाही. त्यामुळे जरी अपिलार्थीच्या दिनांक १९-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी हे संभ्रमात पडले असले तरी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिनांक २३-०९-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे ते सशुल्क माहिती घेण्यासाठी तयार असल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविल्याने व हे पत्र जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याची पोचही त्यांनी आयोगास दाखविली आहे. यावरुनही दिनांक २३-०९-२००८ रोजी त्यांनी माहितीसाठीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला होता असे म्हणता येईल. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उघड करण्यास अधिनियमातील कलम ८ व ९ च्या तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारे बाधा येत नाही. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरण्याची तयारी दर्शवूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संदिप गुलाबराव देशमुख, पिंपळगांव (रेणुकाई), तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळगांव (रेणुकाई), तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८४२

निर्णय दिनांक १४-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बालासाहेब रामराव शेंगुळे,<br>मु. पो. रावराजूर, तालुका पालम,<br>जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड,<br>तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलाथीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील दिनांक ०१-०१-१९८७ ते ३१ डिसेंबर १९८७ या कालावधीमधील रिटेल रॉकेल परवानाधारकांची यादी एका विहित प्रपत्रामध्ये मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या विहित प्रपत्रामध्ये परवानाधारकाचे नांव, लायसन्स क्रमांक, लायसन्स

दिल्याचा दिनांक व क्रमांक, लायसन्स देणा-या सक्षम अधिका-याचे नांव, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी हजर नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी आदेशित करुनही संबधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड यांनी अपिलार्थीस आयोगाकडे दिनांक २९-०४-२००८ रोजी त्यांच्या व्दितीय अपिलाची नोंदणी होईपर्यंत कोणतीही माहिती न पूरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभावाबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बालासाहेब रामराव शेंगुळे, मु. पो. रावराजूर, तालुका पालम, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८४३

निर्णय दिनांक १४-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कचरुलाल बस्तीमल जैन,<br>शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा,<br>बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक, बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक, बीड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड

जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी कायद्यातील तरतुदीप्रमाणे या प्रकरणी वर्तन केले नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही त्यांनी अपिलार्थीस अद्यापही माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करावी व अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १७-०७-२००४ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाही विषयी एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अर्ज देऊन तीन वर्षे झाले तरीही माहिती न देण्याचे कारण, अर्जासंदर्भात चौकशी होण्यासाठी होत असलेल्या विलंबाची कायदेशीर माहिती, अपिलार्थीचा लेखी जबाब तपासणी अधिका-याने का नोंदविला नाही व त्यांचा प्रथम अर्ज निकाली काढल्याची नोटीस का दिली नाही, अपिलार्थीच्या अर्जावर तपासणी करता चौकशीत काय निष्पन्न झाले त्याची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता.

तथापि अपिलार्थीचा हा अर्ज स्वीकारण्यास बीड शहर पोलीस स्टेशनच्या अधिका-यांनी नाकारल्याने अपिलार्थीने जिल्हा पोलीस अधीक्षकाकडे अर्ज केला व तदनंतर त्यांच्याकडेच अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दिनांक २५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. यानंतर अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी दिनांक १०-०४-२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याचे सूचित केले व अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीने यापूर्वीच अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०४-२००८ रोजी माहिती दिली व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. सदर अपील निकाली काढतांना, अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले असल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना अपेक्षित असलेली माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांनी बीड शहर पोलीस स्टेशन येथे दिनांक १७-०७-२००४ रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली याबाबतची माहिती मागितली आहे. तथापि अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी त्यांनी या अर्जामध्ये व्यवस्थितरित्या केलेली नाही. विचाराधीन अपिलाशी संबंधित असलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कृती व निर्णयाची कारणे अपेक्षिली आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असते त्या स्वरुपात अर्जदारास ती देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. हे पाहता अपिलार्थी यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १, ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना देय होत नाही तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ३ व्दारे " सदर अर्ज चौकीस विलंबा करीता कायदेशीर माहिती देणे " ही माहिती मागविली आहे. या माहितीव्दारे अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या या मुद्दयाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोघम होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागतांना ती विशिष्ट स्वरुपातच मागविली गेली पाहिजे. अशा प्रकारची मोघम स्वरुपाची माहिती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, हे पाहता, आता जन माहिती

अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील केवळ, मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती देय होत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या दिनांक १७-०७-२००४ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी ज्या वेगवेगळया प्राधिकरणाशी पत्रव्यवहार केला आहे या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे या ठिकाणी अभिप्रेत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर केलेल्या पत्रव्यवहाराच्या संदर्भात या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या नाहीत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०७-२००४ रोजीच्या तक्रार अर्जावर त्यांच्या कार्यालयाने, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे माहितीची मागणी करेपर्यंतच्या दिवसापर्यंत, संबंधित प्राधिकरणाशी त्यांनी केलेल्या सर्व पत्रव्यवहारांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अपिलार्थीच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे म्हणजेच अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर प्रथम प्रतिसाद देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित सहायक व कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित सहायक व कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कचरुलाल बस्तीमल जैन, शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८४४

निर्णय दिनांक १४-०७-२००९

१ श्री. कचरुलाल बस्तीमल जैन, : अपिलार्थी
शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा,
बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पोलीस अधीक्षक, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस अधीक्षक, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड
जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. तथापि ही माहिती वेळेत न दिल्याने अपिलार्थीने दिनांक ०७-०१-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०१-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २५-०१-२००८ रोजी माहिती

दिली. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी दिनांक २८-०१-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत उर्वरित माहिती देण्याची विनंती केली. तथापि या नंतरही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतदुीप्रमाणे कारवाई करावी अशी त्यांनी या अपील अर्जामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २३-०५-२००७, दिनांक २९-०५-२००७, दिनांक ३०-०५-२००७ व दिनांक ०१-०६-२००७ रोजी दिलेल्या अर्जावर काय कारवाई केली व त्यांच्या तक्रार अर्जावरील चौकशीत काय निष्पन्न झाले ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०३-०७-२००७ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये शुल्क रुपये दोन इतके जमा करुन हस्तगत करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २६-०९-२००७ रोजी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत केली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०१-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस उर्वरित माहिती दहा दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०१-२००८ रोजी माहिती दिली. तथापि ही माहिती पूर्ण नसल्याचे नमूद करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २५-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्या मूळ अर्जातील संबंधित तक्रारीच्या संदर्भात संपूर्ण माहिती दिलेली आहे.

या प्रकरणाशी संबंधीत घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये त्यांचे जे जे अर्ज संदर्भित केले आहेत त्या सर्व अर्जांच्या संदर्भातील कारवाई जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०१-२००८ रोजीच्या प्रथम पत्राव्दारे त्यांना ज्ञात करुन दिली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये असे म्हटले आहे की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २५-०१-२००८ रोजी पूर्ण माहिती दिली आहे. परंतु ती देखील अपूर्णच आहे हे म्हणणे संयुक्तीक नाही. कारण अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या माहिती अधिकारान्वये मागितलेली माहिती दिनांक २२-०५-२००७, २३-०५-२००७, २९-०५-२००७, ३०-०५-२००७, ०१-०६-२००७ व दिनांक २६-०६-२००७ या अर्जात उल्लेख केलेली, या अर्जांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण १२ पृष्ठाव्दारे दिली असून या माहितीमध्ये अपिलार्थीने या अर्जाव्दारे मागणी केलेल्या प्रत्येक अर्जातील माहिती त्यांनी दिली आहे. अपिलार्थीने दिनांक २६-०६-२००७ रोजी बीड शहर पोलीस स्टेशन यांच्याकडे माहितीकरिता अर्ज जोडपत्र अ दिला परंतु त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही याचे कारण असे आहे की, अर्जदारास पोलीस अधीक्षक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली असतांना त्यांनी पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडे त्याच मुद्दयाकरिता वेगळा अर्ज दिला व या अर्जावर दहा रुपये किंमतीचे स्टॅम्प लावले नाही. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने एकच माहिती जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक बीड शहर व या प्रकरणाशी संबंधित जन

माहिती अधिकारी म्हणून नेमले गेलेले उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे मागितली आहे व त्यांना दिनांक २५-०१-२००८ रोजी माहिती प्राप्त झाली आहे. आता अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती त्यांना अपूर्ण का वाटते या संदर्भात आयोगाकडे युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर अनुपस्थित आहेत हे पाहता व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०१-२००८ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कचरुलाल बस्तीमल जैन, शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८४५

निर्णय दिनांक १४-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दयावान नारायण मुंडे,<br>मु. पो. चोंडी, तालुका धारुर, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर,<br>तालुका धारुर, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २८-१२-२००७ रोजी दाखल केलेल्या अर्जावर मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक २२-०२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले व माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. या अपील अर्जात जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिका-यावर कारवाई करण्याची विनंती केली आहे. परंतु जिल्हा पुरवठा

अधिका-यांनी त्यांना माहिती दिली नाही व त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय न कळविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील पुरवठा विभागातून प्रत्येक दुकानदाराला कार्ड संख्येप्रमाणे बी. पी. एल. गहू आणि रॉकेल वितरणासंदर्भात एप्रिल २००७ ते डिसेंबर २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही मागणी एका विशिष्ट प्रपत्रा-मध्ये केली असून ही माहिती त्यांनी दुकाननिहाय मागितली आहे. या प्रपत्रामध्ये दुकानदाराकडील कार्डधारक संख्या, त्यांचा पत्ता, दुकानाचा क्रमांक या माहितीचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतल्याचे अथवा सुनावणी ठेवल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, या टप्प्यावर, जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी सुनावणी घेणे आयोगास इष्ट वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दयावान नारायण मुंडे, मु. पो. चोंडी, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८४६

निर्णय दिनांक  १४-०७-२००९

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, : अपिलार्थी
मु. होंडाळा पो. दापका (राजा) तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

त्रयस्थ पक्ष : १. सौ. रेणुकाबाई अशोक सुर्यवंशी
२. श्री. रामराव सखाराम लामतुरे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने

त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असून संबंधितांवर अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करावी अशी त्यांनी आयोगास या अर्जामध्ये अंतिमतः विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड जिल्ह्यामध्ये भूसंपादन झालेल्या जमिनीची सन १९९५ ते २००७ या कालावधीमधील माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांना जमिनी संपादित करता आणि मावेजा वाटप करताना वापरल्या जाणाऱ्या नियमाची साक्षांकीत झेरॉक्स, या कालावधीत ज्या व्यक्तींच्या जमिनी संपादित केल्या आहेत त्यांची नांवे आणि गावांची नांवे याची जन माहिती अधिकारी यांच्याकडील रजिस्टरवरील माहिती, त्यांना दिलेला मावेजा नियमबाह्य दिलात काय, श्री. रामराव सखाराम लामतुरे यांच्या खांद्यावर बंदूक ठेऊन आपण कृत्य करणे हे योग्य आहे काय ? आपण करत असलेला व्यवहार लपविणे कायद्याने गुन्हा असू शकत नाही काय ? - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्य-रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. तथापि या संदर्भातील प्रमाणपत्राच्या प्रती साक्षांकीत न केल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे शिधापत्रिकेची वैध प्रत मागितली. यानंतर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्यामध्ये बराच पत्रव्यवहार होत राहिला परंतु अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन विशेष भूसंपादन अधिकारी (लघुसिंचन कामे) नांदेड यांना अपिलार्थीस पूर्ण माहिती देण्याचे सूचित केले. व अपिलार्थीस दिनांक १७-०३-२००८ रोजी वेगळे पत्र देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन पाहण्याची व ती माहिती पाहून अपिलार्थीस पाहिजे ती माहिती घेण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांना दिली.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींना आयोगाच्या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे कोणत्याही प्रकारे देता आली नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९-१२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी फक्त भूसंपादन कायद्याची झेरॉक्स प्रत व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील सन १९९५ ते २००७ या कालावधीमधील शासनाने संपादित केलेल्या जमिनीच्या मालकाची नावे व गावाची यादी एवढीच माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. उर्वरित दोन मुद्दयावरील माहिती ही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी अशा स्वरुपाची असल्याने व परिणामी ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भात तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे आयोगास आश्वासीत केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा पो. दापका (राजा) तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८४७

निर्णय दिनांक १४-०७-२००९

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपिलार्थी

मु. पो. पाथरवाला (बु.) तालुका अंबड

जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहायक प्रशासक ,

लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,

लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग

नाथनगर (उत्तर) पैठण, जिल्हा औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. एस. बी. झगडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी सात दिवसाच्या माहिती देण्याचे सूचित करुन समक्ष व लेखी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास नकार दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर

केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ०१-०४-२००५ ते २०-०५-२००८ या कालावधीमधील श्री. एस. जी. झगडे, कार्यकारी अभियंता, नाथनगर (उत्तर) पैठण यांनी केलेल्या काम वाटपाच्या संदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. सुरेश जेथलिया विधान परिषद सदस्य यांनी विधान परिषदेमध्ये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेस अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी शासनास पाठविलेली माहिती, या कालावधीत ज्या मजूर सहकारी संस्थांना कामे वाटप केली या मजूर संस्थेचे नाव, कामाचे नांव, मजूर संस्थेचे बनावट शिक्के तयार करुन तालुक्यातील संस्थांना डावलून तालुक्याबाहेरील संस्थांना व सुशिक्षित बेकार अभियंत्यांना लाखो रुपयाची कामे दिल्याचे दाखवून शासनाची किती कोटी रुपयाची फसवणूक केली याची माहिती व जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १५-०१-२००८ रोजीच्या पत्रासोबत जोडलेल्या तक्रारी प्रती व प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ४ शी संबंधित माहिती त्यांना सशुल्क पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०७-२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस दिनांक ३०-०७-२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही उर्वरित

माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दिनांक २८-०५-२००८ रोजी व दिनांक ०५-०९-२००८ रोजी उर्वरित मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती दिली. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचसही त्यांनी आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थीने या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती अमूर्त स्वरुपातील आहे. या माहितीतील अपिलार्थीने त्रयस्थ पक्ष श्री. झगडे यांच्या वरील कथित भ्रष्टाचाराच्या संदर्भात काही मुद्दे उपस्थित केले असून शासनाची किती कोटी रुपयाची फसवणूक केली अशी माहिती मागविली आहे. या प्रकरणासंदर्भात आयोगास असे अवगत करुन देण्यात आले आहे की, श्री. झगडे यांच्या कालावधीत झालेल्या काम वाटपासंदर्भात व इतर माहितीसंदर्भात दक्षता विभागामार्फत चौकशी चालू असून अद्यापपावेतो श्री. झगडे यांनी शासनाची फसवणूक केल्याच्या निष्कर्षाप्रत ते आले नाहीत. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस प्रत्यक्षात देय होत नही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे श्री. झगडे यांच्या विरुध्द जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीवरील चौकशी अहवालाच्या प्रतीची मागणी केली आहे. यासंदर्भात देखील श्री.झगडे यांची चौकशी चालू असल्याने या चौकशीमध्ये अद्यापपावेतो अंतीम

निर्णय न झाल्याने ही माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ८ (१) (एच) च्या तुरतुदीनुसार देय होत नाही. एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०५-०९-२००८ रोजी म्हणजे त्यांनी आयोगाकडे केलेल्या दिनांक १२-०८-२००८ रोजीच्या व्दितीय अपिलानंतर पुरविली आहे, हे पाहता, या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दोन मुद्दयावरील माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर दिल्याचे दिसून येते. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या अर्जावर त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दिनांक १९-०६-२००८ रोजी अगर तत्पूर्वी माहिती देणे अपेक्षित असतांना त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिनांक ०५-०९-२००८ रोजी म्हणजे अपिलार्थीने आयोगाकडे व्दितिय अपील केल्यानंतर पुरविली आहे. अशा प्रकारे अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांना देय असलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, मु. पो. पाथरवाला (बु.), तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर (उत्तर) पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८४८

निर्णय दिनांक १४-०७-२००९

१ श्री. नामदेव तेजराव शेजूळ, : अपिलार्थी
मु. कोठा (दाभाडी) पो. चांघई एक्को, तालुका भोकरदन
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,
भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

त्रयस्थ पक्ष :
१. श्री. कारभारी अंबादास सरोदे,
२. श्री. ज्ञानेश्वर अंबादास सरोदे,
३. श्री. भिमराव सोनाजी सदाशिवे,
४. श्रीमती शशिकलाबाई यादवराव दाभाडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०३-२००८ रोजी ग्रामपंचायत कोठ (दाभाडी) येथील राखीव जागेवर निवडून आलेल्या ग्रामपंचायत सदस्यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. कारभारी सरोदे, श्री. ज्ञानेश्वर सरोदे, श्री. सदाशिवे व श्रीमती दाभाडे या चार त्रयस्थ पक्षाच्या जात पडताळणीची सत्यप्रत, ग्रामपंचायत निवडणूक २००५ व पोट निवडणूक २००७ च्या निवडणूक कार्यक्रमाची सत्यप्रत व श्री. कारभारी अंबादास सरोदे यांनी कोठा (दाभाडी ) ग्रामपंचायत सरपंच पदाचा पदभार स्वीकारल्याची तारीख - या मुद्दयांचा समावेश होता. या माहितीबरोबर अपिलार्थीने या अर्जामध्ये तीन महिन्यात जात पडताळणी झाली आहे का ? झाली असल्यास सत्यप्रती मिळाव्यात तसेच पडताळणी जर झाली नसेल तर त्यांना ग्रामपंचायत अधिनियमानुसार सदस्य पदावरुन कमी केले आहे का, अशी माहिती विचारली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी ०४-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये नमूद केलेल्या लेखी निवदनाप्रमाणे युक्तीवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०८-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०८-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे दिलेली महिती ही अपूर्ण आहे कारण या पत्रामध्ये श्री. कारभारी अंबादास सरोदे व श्रीमती शशिकलाबाई यादवराव दाभाडे यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीच्या प्रती अपिलार्थीस दिल्या नाहीत. तसेच या माहितीत अपिलार्थीने मागणी केलेल्या ग्रामपंचायत निवडणूक २००५ व पोट निवडणूक २००७ च्या निवडणूक कार्यक्रमाच्या प्रतीचा समावेश नवहता.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती म्हणून आयोगास जे पत्र सादर केले आहे ते पत्र व जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्षात अपिलार्थीस पाठविलेले पत्र यामध्ये काही फरक आयोगास स्पष्ट दिसून येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कथित माहितीमध्ये श्रीमती शशिकलाबाई यादवराव दाभाडे यांच्या नावाचा समावेश आहे. परंतु अपिलार्थीस लिहिलेल्या पत्रामध्ये त्यांच्या नावाचा समावेश नाही. अपिलार्थीच्या दिनांक २०-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०७-२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देणे अभिप्रेत असतांना त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०८-२००८ रोजी अपूर्ण माहिती पुरविली आहे. या कारणांमुळे अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये म्हटल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे देखिल येथे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या, अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण आणि दिशाभूल करणारी माहिती देण्याच्या कृतीव्दारे, त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा व नितांत सचोटीचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब जिल्हाधिकारी, जालना

यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेली माहिती "सार्वजनिक" स्वरुपाची असल्याने ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाची संमती असणे, या प्रकरणी, आवश्यक नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी जालना यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नामदेव तेजराव शेजूळ, मु. कोठा (दाभाडी) पो. चांघई एक्को, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०२३
निर्णय दिनांक १५-०७-२००९

१. श्री. अजित किसनलालजी कोठारी, : अपिलार्थी
रा.काद्राबाद,जि.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तहसील कार्यालय,जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,जालना
जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि.१९.०९.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे आपल्या मूळ अर्जाद्वारे माहिती मागितली असता, त्यांना माहिती मिळाली नाही, त्यामुळे त्यांनी दि.२३.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि त्या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थीस आवश्यक माहितीपासून वंचित राहावे लागले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नैसर्गिक आपत्तीविषयी जिल्हाधिकारी यांनी दि.२९.०९.२००६ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली किंवा कसे याबाबत माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दि.२९.०९.२००६ रोजीच्या पत्राची

प्रत व सामान्य प्रशासन, नगर विकास विभागाच्या राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक यांनी दिलेल्या दि. ०५.०९.२००६ रोजीच्या आदेशाची प्रत देखील जोडली होती. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने परत तहसीलदार, जालना यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२३.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने यांनी असा युक्तिवाद केला की, जालना तहसील कार्यालयामध्ये माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदी अंतर्गत केलेल्या कोणत्याही अर्जाची दखल घेतली जात नाही. ते सदर माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता, जन माहिती अधिकारी यांनी हाकलून लावले. तहसीलदार जालना यांच्या कार्यालयामध्ये महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अरेरावीची भाषा वापरली जाते. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य व लवकरात लवकर प्राप्त व्हावी.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये अनुक्रमे दि. १९.०९.२००८ व २३.१०.२००८ रोजी माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज नोंदविला होता. यासंदर्भात तहसील कार्यालयाच्या संबंधित लिपिकाची पोचसही अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या मूळ अर्जाच्या व अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रत आढळून येत आहे. यावरुन हे दोनही अर्ज तहसीलदार,

जालना यांना प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पाहता, ही माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांच्याकडून खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागणे अनुज्ञेय नाही. हे अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येवरुन दिसून येत आहे. अपिलार्थीस जर आता त्यांनी मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी काही कार्यवाही केली आहे किंवा नाही, हे जाणून घ्यावयाचे असेल तर त्यांनी या प्रकरणाशी संबंधित अभिलेख्यांची तपासणी करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावयाच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी, हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ज्या पत्राचा संदर्भ दिला आहे, त्या पत्रावर करण्यात आलेली कार्यवाही ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे, ते अभिलेखे त्यांना अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांपर्यंत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. एवढेच नव्हे तर त्यांच्या दि.२३.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. यासंदर्भात आयोगास या प्रकरणी निश्चित जन अपिलीय अधिकारी म्हणून कोणत्या अधिकाऱ्याची नेमणूक झाली आहे, हे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने या मुद्यासंदर्भात आयोगास असे अवगत केले की,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची पदनामे व नावे दर्शविणारे फलक जालना जिल्हयाच्या तहसील कार्यालयात लावले गेलेले नाहीत. आयोग हा मुद्दा गांभीर्याने घेत असून महसूल आयुक्त,औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, जालना तहसीलदार कार्यालयामध्ये अशाप्रकारचे सर्व अभ्यागतांच्या सहज दृष्टोपत्तीस येतील, असे फलक हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत लावले जातील, असे त्यांनी पहावे. या

प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन, एवढेच नव्हेतर आज रोजी आयोगाच्या जालना येथे सुनावणी असूनही महसूल विभागाच्या जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधीही आयोगासमोर उपस्थित नाहीत, याची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि.१९.०९.२००८ रोजीच्या प्रथम अर्जास तहसीलदार,जालना यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे दखल घेऊन त्यांच्या अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत माहिती देणे अथवा नाकारणे हे त्यांना अनिवार्य होते. परंतु यापैकी कोणतीही कार्यवाही त्यांनी केली नाही व परिणामी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घ काळ माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहावे लागले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.सबब संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. गणेश निराळी, सध्या तहसीलदार,आष्टी, जि.बीड येथे कार्यरत) यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेखे वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे तपासणीसाठी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत.

कृ.मा.प.५...

३) जन माहिती अधिकारी (श्री. गणेश निराळी,सध्या तहसीलदार,आष्टी,जि.बीड येथे कार्यरत) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

४) महसूल आयुक्त,औरंगाबाद यांनी, जालना तहसीलदार कार्यालयामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या नाव व पदनाम दर्शविणारे, सर्व अभ्यागतांच्या सहज दृष्टोपत्तीस येतील, असे फलक हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत लावले जातील, असे त्यांनी पहावे.

**जालना**
**दिनांक : १५-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजित किसनलालजी कोठारी,रा.काद्राबाद,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,जालना,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,जालना,जि.जालना यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी,जालना यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हाधिकारी,बीड यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. विभागीय आयुक्त,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०२४
निर्णय दिनांक १५-०७-२००९

१. श्री. राजेंद्र सुदामराव सरोदे, : अपिलार्थी
रा.पळशी,ता.परतूर, जि.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,परतूर,
जि.जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, परतूर, जि.जालना

त्रयस्थ पक्ष : १) श्रीमती मथुराबाई पाराजी व्यवहारे
२) श्री.सोपान बापूराव व्यवहारे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्याने व माहिती देण्यासाठी टाळाटाळ चालू असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स.नं.३९ मौजे पळशी ता.परतूरच्या जमीन व्यवहारासंबंधी एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जामध्ये मूळ खातेदार श्रीमती मथुराबाई व्यवहारे,रा.पळशी यांची जमीन गट नं.३९ एकूण क्षेत्र १० एकर यास ३८ ए व कलम ६

अन्वये श्री. सोपान बापुराव व्यवहारे यांनी सर्टीफिकेट कशाच्या आधारे घेतले व फेर कसा मंजूर झाला याच्या सत्यप्रती, मथुराबाई भ्र. पाराजी व्यवहारे या विधवा असल्यामुळे त्यांच्या जमिनीस सर्टीफिकेट देता येते का व विधवा बाईस कूळ लागते का,याबाबत शासन परिपत्रकाच्या सत्यप्रती, कूळ कायदा अंतर्गत प्रमाणपत्र मिळवून जमीन थेट विक्री करता येते का, जर अशी जमीन विकली असेल तर त्याबाबत शासन काय कार्यवाही करते, कूळ कायद्याचे प्रमाणपत्र ३८ ए पोट कलम ६ कसे मिळवतात त्याबाबतच्या कार्यपध्दतीची सविस्तर माहिती, मौजे पळशी येथील स.नं.३९ (भुमापन क्र.१०७) या जमिनीच्या (१९७५ ते २००८) पर्यंत झालेल्या खरेदी-विक्री व्यवहाराच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती व या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद देऊन दि.२८.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात शोधण्याचे काम चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले व दि.०७.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विनादिनांकाचे प्रथम अपील केले. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि.२३.०५.२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०६.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीबाबतची सद्यस्थिती अवगत केली. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस असे कळविले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या पाच मुद्यांपैकी मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती ही सहायक दुय्यम निबंधक श्रेणी -१ परतूर यांच्याशी संबंधित असून ही माहिती संबंधितांनी त्यांना दिल्यास ही माहिती दि.३०.०६.२००८ पर्यंत देऊ शकतील. तथापि त्यादिवशी अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे उपस्थित न राहिल्याने त्यांनी अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढले. अशाप्रकारे अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने,

व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी उपलब्ध असलेली माहिती त्यांनी दि.०७.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ च्या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या सर्टीफिकेटचा या माहितीमध्ये उल्लेख केला आहे. ते श्री.सोपान व्यवहारे यांना दि. २७.१०.१९७७ रोजी तहसीलदार,परतूर यांच्याकडून प्राप्त झाले आहे. तत्कालीन तहसीलदार,परतूर यांनी हे प्रमाणपत्र शेतजमिन प्रकरणात तहसीलदार, परतूर या तालुका स्तरावरील सक्षम प्राधिकारी या नात्याने दिले आहे. हे प्रमाणपत्र श्री. व्यवहारे यांना देत असताना तत्कालीन तहसीलदार यांनी कोणत्या कागदपत्रांचा आधार घेतला, त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांच्या नस्तीवर आता उपलब्ध नाहीत. तथापि त्यावेळची अशाप्रकारचे प्रमाणपत्र देण्याची प्रचलित पध्दत पाहता, असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही की, श्रीमती मथुराबाई व्यवहारे व श्री.सोपान व्यवहारे यांनी आपापसात जमिनीचा विक्री व्यवहार केला असावा आणि या विक्री व्यवहाराची प्रत तहसीलदार यांना सादर केल्यानंतर त्यांनी हे प्रमाणपत्र श्री. सोपान बापूराव व्यवहारे यांना दिले असावे. पूर्वीच्या काळात कूळ कायद्यामधील तरतुदीनुसार Out of Court अशाप्रकारचे व्यवहार होत असत, त्यामुळे दोन्ही बाजूंच्या संमतीने त्यांनी हे प्रमाणपत्र श्री. सोपान व्यवहारे यांना दिले असावे. अपिलार्थीस त्यांनी दि.०७.०२.२००८ रोजी दिलेल्या माहितीमध्ये त्यांना प्रमाणपत्राची सत्यप्रत संबंधित जमिनीच्या ७/१२ च्या व फेरच्या नोंदींच्या आधारे त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या ५ मुद्यांपैकी एकूण ४ मुद्यांचा त्यामध्ये समावेश आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती ही दुय्यम निबंधक,श्रेणी-१ यांच्याकडे असल्याने ते ही

माहिती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. यासंदर्भात त्यांनी निबंधक कार्यालयात संपर्क साधला असता, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा अपिलार्थीने केला तर ही कागदपत्रे ते देतील, असे त्यांनी त्यांच्याकडील दि.२१.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ द्वारे त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे.अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ च्या तरतुदींशी विसंगत असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाबरोबर जोडलेल्या त्यांच्या दारिद्रयरेषेच्या प्रमाणपत्राची पहाणी करता, अपिलार्थीने या प्रमाणपत्राची फक्त झेरॉक्स प्रत त्यांच्या प्रथम अर्जासोबत जोडली आहे. ही प्रत कोणीही साक्षांकित केलेली नाही, त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेले त्यांचे दारिद्रयरेषेचे प्रमाणपत्र हे खरोखरीच वैध आहे किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीच्या अर्जास मुद्दा क्र.२ व ३ मध्ये "शासन परिपत्रकासह" माहिती व "याबाबत शासन काय कार्यवाही करते" या दोन्ही मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. या मुद्यांसंदर्भात त्यांचे असे अभिप्राय आहे की, कूळ कायद्यामधील संबंधित कलमाच्या तरतुदींच्या आधारे त्यांनी ही कार्यवाही केली आहे. तेव्हा याबाबत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्या प्रश्नांसंदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या परिपत्रकांच्या व कायद्याच्या संबंधित कलमांच्या सत्यप्रती, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. मुद्दा क्र.४ व १ च्या बाबतीत देखील अशाचप्रकारची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या मूळ

अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील हा मुद्दा संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित नव्हता, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची एक प्रत दुय्यम निबंधक,परतूर यांच्या कार्यालयाकडे सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठविणे त्यांना भाग होते. तथापि अशाप्रकारची कृती त्यांनी केली नाही, त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व हे जन माहिती अधिकारी यांच्यावर येते. सबब या मुद्यासंदर्भात त्यांनी दुय्यम निबंधक, परतूर यांच्याकडून आवश्यक ती माहिती मागवन घेऊन ती अपिलार्थीस उर्वरित माहितीबरोबर विनामूल्य पुरवावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे पृथक्करण करता, जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील संपूर्ण उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे हेतूपुरस्सर टाळले असल्याचे अथवा कोणत्याही दुष्ट हेतूने माहिती दडविल्याचे सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याच्या शिफारशीबाबत आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १५-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र सुदामराव सरोदे,रा.पळशी, पो.लोणी,ता.परतूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,परतूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परतूर, जि.जालना यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०२५
निर्णय दिनांक १५-०७-२००९

१. श्री. मधुकर पांडुरंग खरात, : अपिलार्थी
जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वैद्यकीय अधीक्षक,
जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय,
जालना.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
वैद्यकीय अधीक्षक,
जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय,
जालना.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक अधीक्षक,
जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय,
जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी भष्टाचार झाल्यामुळे मागितलेली माहिती नष्ट करुन, अपूर्ण व चुकीची माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांची दिशाभूल केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १० एप्रिल, २००४ ते १० ऑगस्ट, २००८ या कालावधीत जननी सुरक्षा योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची नाव व पत्त्यासह यादी आणि या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अनुदानाचा लाभ देण्यासाठी असलेल्या अटी व नियम यांची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.११.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि ही माहिती विलंबाने प्राप्त झाल्याचे व ती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१६.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.१०.२००८ रोजी सुनावणी घेतली व सुनावणीच्या दिवशी अपिलार्थीस जूलै,२००८ ते ऑगस्ट, २००८ या कालावधीतील उर्वरित माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, दि. ११.०९.२००८ रोजी अपिलार्थीस दिलेली माहिती ही उपलब्ध कागदपत्रांवरुन तयार करुन दिली आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.१०.२००८ रोजी या योजनेच्या रजिस्टरच्या सर्व झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरविल्या. जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने जरी दि.१० एप्रिल, २००४ ते १०ऑगस्ट,२००८ या

कालावधीतील माहिती मागितली होती तरी प्रत्यक्षात ही योजना जुलै, २००७ पासून राबविण्यात आली, त्यामुळे यासंदर्भात जूलै,२००७ ते ऑगस्ट,२००८ पर्यंतची माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. आयोगाकडे सादर केलेल्या अपील अर्जामध्ये,त्यांनी या योजनेमध्ये भ्रष्टाचार झाल्यामुळे, माहिती नष्ट केली व अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती अपिलार्थीस पुरविली असे म्हटले आहे. तथापि त्यांच्या या अभिप्रायापृष्ठ्यर्थ त्यांनी आयोगाकडे आजपावेतो कोणताही सबळ पुरावा सादर केलेला नाही. तसेच आज देखील सुनावणीसाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती सर्वसाधारणपणे अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे व ही माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे पोचपावती देखील दिलेली आहे. सबब या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**जालना**
**दिनांक : १५-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर पांडुरंग खरात,रा.राहुल नगर, अंबड रोड,जुना जालना,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक,जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय गांधीभवन,जुना जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक,जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय,गांधी चमन, जुना जालना, जिल्हा कार्यालय,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०२६
निर्णय दिनांक १५-०७-२००९

१. श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, रा.जालना. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,जालना : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्यांच्या कार्यालयाने दि.२२.०८.२००७ रोजी महालेखापाल,नागपूर यांना पाठविलेल्या पत्रामध्ये श्री. सी.आर.मोरे यांनी ज्या चौदा कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका गहाळ केल्या आहेत त्या चौदा कर्मचाऱ्यांची नावे - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.०४.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २/- इतके स्टेट

बँक ऑफ हैद्राबादच्या शाखेमध्ये चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने हे शुल्क दि.१८.०७.२००८ रोजी स्टेट बँक ऑफ हैद्राबादमध्ये चलनाद्वारे भरले व अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१९.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०८.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्रथमतः दि.१०.०७.२००८ रोजी देऊ केली होती. तथापि अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले. अपिलार्थीस या प्रकरणी अशी अपेक्षा होती की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून नव्याने माहिती तयार करुन देण्यात यावी परंतु अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली अभिप्रेत असलेली माहिती, त्यांनी उपसंचालकांना लिहिलेल्या दि.१३.०७.२००५ रोजीच्या पत्रामध्ये उपलब्ध असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाच्या दि. १३.०७.२००५ रोजीच्या पत्राची प्रत दि.२१.०७.२००८ रोजी पोस्टाद्वारे पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२१.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविली असून, या माहितीमध्ये अपिलार्थीस अभिप्रेत असलेल्या १४ कर्मचाऱ्यांची नावे उपलब्ध आहेत. ही माहिती चुकीची कशी आहे, हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत किंवा या संदर्भात

त्यांनी कोणताही लेखी युक्तिवाद आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाबरोबर अथवा त्यानंतर सादर केलेला नाही. याही उपर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये वरील प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी नवीन माहिती तयार करुन देणे अपेक्षित होते, असे आयोगास अवगत केले गेले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी नवीन माहिती तयार करुन देणे हे सर्वसाधारणपणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे, त्या अभिलेख्याची प्रत त्यांनी अर्जदारास देण्यासंदर्भात कार्यवाही करणे, हे मुख्यत्त्वेकरुन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. या सर्व बाबी एकत्रित पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे,व्दारा-श्रीनाथ जनरल स्टोअर्स, चाणक्य कॉम्प्लेक्स,कचेरी रोड, जुना जालना

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०२७
निर्णय दिनांक १५-०७-२००९

१ श्री. रामप्रसाद माधवलाल पोरवाल, परतूर,जि.जालना : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,परतूर, जि.जालना : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगरपरिषद, परतूर,जि.जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : लिपीक, नगरपरिषद,परतूर, जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः गोलमोल व खोटी माहिती दिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनीही त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - नगर परिषद परतूरचे वकील श्री. गोपाळराव देशपांडे यांना सन १९९१ पासून २००८ पर्यंतच्या कालावधीमध्ये नगर परिषदेने नगरपरिषेदेच्या संबंधित कोर्टातील वादामध्ये

प्रदान करण्यात आलेल्या फीचा तारखेसह तपशील व प्रत्येक वर्षामध्ये श्री.देशपांडे वकील यांना प्रत्येक वादामध्ये वकील म्हणून किती रुपये प्रदान केले - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि. १२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस सात दिवसांच्या आत उर्वरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि तदनंतरही माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाशी सुसंगत युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे विचारलेली - 'श्री. देशपांडे वकील यांना प्रत्येक वादात किती रुपये प्रदान केले', ही माहिती कधी देण्यात येईल, असे आयोगाने विचारले असता, ही माहिती बरीचशी जुनी असल्यामुळे त्यांना तीस दिवस इतका कालावधी ही माहिती देण्यासाठी लागेल, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत काही माहिती पुरविली आहे. तथापि त्यातील अ.क्र.२८ समोर जन माहिती अधिकारी यांनी श्री. देशपांडे,वकील यांना रु.२५००/- इतकी फी

दिल्याचे नमूद केले आहे. तथापि हे पैसे श्री. देशपांडे यांना कोणत्या प्रयोजनाकरिता अदा केले, याचा कोणताही उल्लेख त्यांनी या माहितीमध्ये केला नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे श्री. देशपांडे वकील यांना प्रत्येक वादामध्ये किती रुपये प्रदान केले याची माहिती विचारली होती. अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली नाही, त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांनी श्री. देशपांडे वकील यांना सन १९९१ ते अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत किती वादांकरिता(केसेसकरिता) फी प्रदान केली त्या केसेसची यादी अपिलार्थीस देणे भाग आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन या माहितीची तपासणी करण्याची तयारी दर्शविली आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व तसेच अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित अभिलेखे याच कालावधीमध्ये तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत.

या प्रकरणी अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती दिली नसल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. सबब संचालक,नगर परिषद प्रशासन यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व तसेच अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित अभिलेखे याच कालावधीमध्ये तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत.

३) संचालक,नगर परिषद संचालनालय यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना**
**दिनांक : १५-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामप्रसाद माधवलाल पोरवाल,बालाजी मंदिर रोड, मोंढा,परतूर,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगरपरिषद, परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगरपरिषद, परतूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक,नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई -४०० ०३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर /१०२८
निर्णय दिनांकः १५-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सुखदेव नामदेव सावंत,<br>मु.निंबोळा, पो.सिपोरा (बा.),<br>ता. भोकरदन,जि.जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता,(ल.पा.वि. )<br>जिल्हा परिषद उपविभाग अंबड,जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, (ल.पा.वि.),<br>जिल्हा परिषद, जालना. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपअभियंता श्री. सानप यांच्या कार्यकाळातील रोहयोअंतर्गत पाझर तलाव व संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेले गावतलाव यांच्याशी संबंधित मस्टर्सच्या छायांकित प्रती व धडक विहीर योजनेतील कामांच्या मोजमापपुस्तिकेची प्रत व या

कामावर दि.१७.०३.२००८ पर्यंत झालेला खर्च इत्यादी मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती व या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०७.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले गेले नसल्याचे कळविले व त्याचबरोबर हे प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १५.०४.२००८ पर्यंत सादर करण्याचे त्यांना सूचित केले.सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०९.०४.२००८ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१६.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.०६.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस द्वितीय अपिलात जाण्यास त्यांच्या कार्यालयाची संमती देण्यात येत असल्याचा निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयातील सूचनेप्रमाणे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे सुनावणीसाठी हजर नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाबरोबर जरी अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत, असे नमूद केले आहे, तरी यापृष्ठयर्थ प्रमाणपत्र त्यांनी मूळ अर्जासोबत न जोडल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रमाणपत्राची त्यांच्या दि.०७.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केली. तथापि अपिलार्थीने त्यांच्या या सूचनेचे अनुपालन न केल्याने त्यांना अपिलार्थीस अपेक्षित माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.०३.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत, असे नमूद केले आहे. मात्र यासंदर्भात शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्र.आर.टी.आय. २००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११.१०.२००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणताही वैध पुरावा त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडला नाही. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ति असल्याचे नमूद करुन, माहितीची मागणी केली असताना, अपिलार्थीने ज्या अटींचे पालन करणे त्यांना अनिवार्य आहे, त्या अटींचे त्यांनी मूळात पालन केले नसल्याने, त्यांचा हा अर्ज मूळात अवैध ठरत आहे व परिणामी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देय होत नाही. ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुखदेव नामदेव सावंत,मु.निंबोळा, पो.सिपोरा (बा.), ता. भोकरदन,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,(ल.पा.वि )जिल्हा परिषद उपविभाग अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (ल.पा.वि.),जिल्हा परिषद, जालना. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर / १०२९
निर्णय दिनांक: १५-०७-२००९

१. श्री. शिंगाडे अन्सीराव बापूराव, अंबड,जि.जालना. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, जालना : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद.

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी तीस दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, ते माहिती घेण्यासाठी गेले असता, नकार दिला. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. ०७.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता,सा.बां.वि.क्र.१ जालना यांच्याकडे - जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यांच्याकडून दि.०१.०९.२००७ ते ३१.०३.२००८ या कालावधीमध्ये वाटप करण्यात

आलेल्या कामाच्या यादीनुसार त्यांच्या कार्यालयामार्फत केलेल्या सर्व दुरुस्ती कामाच्या बांधकामाच्या व मोजमापपुस्तिकेच्या छायाप्रती व कामावर करण्यात आलेला खर्च - ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस प्रत्यक्षात सरळ कोणताही प्रतिसाद न देता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयांतर्गत तालुकास्तरावरील ज्या उपअभियंत्यांच्या ताब्यात आहे, त्यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत दि. ०७.०४.२००८ रोजी पाठवून दिली व त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२२.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दि.०८.०७.२००८ रोजी पारित केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. तथापि त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी उपअभियंता, जालना (उत्तर) यांच्याकडून त्यांना दि.०९.०५.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली व जालना उपविभागीय अभियंता, क्र.३ यांच्याकडून दि.२२.०४.२००८ रोजी प्राप्त झाली. तथापि सर्व उपविभागाची माहिती एकत्रित करुन अपिलार्थीस पाठविण्याच्या

उद्देशाने सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यावेळी पाठविली नव्हती. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर अपिलार्थीस उपअभियंता, जाफ्राबाद, बदनापूर व भोकरदन यांनी अनुक्रमे दि.२२.०६.२००९, ३०.०६.२००९ व ३०.०७.२००८ रोजी माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली .

व ही माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीचे समाधान झाले व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे त्यांनी लेखी पत्राव्दारे कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या म्हणण्यापृष्ठयर्थ संबंधित उपविभागीय अभियंता यांना अपिलार्थीने दिलेल्या पोचपावतीची प्रत आयोगास सादर केली. यावरुन अपिलार्थीस आता जालना उपविभाग व जालना उपविभाग,उत्तर विभाग यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती प्राप्त होणे बाकी असल्याचे आढळले आहे. ही माहिती अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, जालना (उत्तर) उपविभागाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०९.०५.२००८ रोजी व जालना उपविभाग क्र.३ ने दि. २२.०४.२००८ रोजी अपिलार्थीस द्यावयाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केली होती. परंतु सर्व उपविभागाची एकत्रित माहिती देण्याच्या उद्देशाने, त्यांनी जालना (उत्तर) व जालना उपविभाग क्र.३ या कार्यालयाकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. मूळात अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः दिला, त्यावेळी त्यांनी या अर्जाची प्रत संबंधितांना, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठविणे व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे जरुरीचे होते. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी दिलेल्या दि.०७.०४.२००८ रोजीच्या अर्जाची

प्रत संबंधितांना पाठविली नाही व जी माहिती उपविभागीय अभियंता यांनी अपिलार्थीस परस्पर द्यावयाची त्या माहितीचे संकलन स्वतः करत राहिले. परिणामी अपिलार्थीस अपेक्षित संपूर्ण माहिती प्राप्त होण्यापासून काही कालावधीसाठी वंचित राहावे लागले. आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील जन माहिती अधिकारी यांच्याकडे जालना (उत्तर) व जालना उपविभाग क्र.३ यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती त्यांनी अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील जालना उपविभाग (उत्तर) व जालना उपविभाग क्र.३ कडून प्राप्त झालेली माहिती हे आदेश निर्गमित होताच त्यांना तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तीशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयात स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**जालना**
**दिनांक : १५-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिंगाडे अन्सीराम बापूराव, द्वारा श्री. राम लांडे होळकरनगर, अंबड, ता. अंबड, जि. जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, जाालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०३०
निर्णय दिनांक १५-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. फकीरचंद केदारी खंडेकर,<br>रा.टेंभुर्णी,ता.जाफ्राबाद,जि.जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत, टेंभुर्णी,<br>ता.जाफ्राबाद,जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,जाफ्राबाद,जि.जालना. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी, श्री. फकीरचंद केदारी खंडेकर यांनी त्यांच्या दि.१५.०७.२००९ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे आयोगाकडे विचाराधीन असलेले त्यांचे द्वितीय अपील क्र.१०३०/०८ हे, ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे व ते रद्द करण्याची विनंती आयोगास केली आहे.

खुद्द अपिलार्थी, आयोगाकडे केलेले त्यांचे विचाराधीन अपील मागे घेत असल्याने,

अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.१०३०/०८, दि.०४.०८.२००८ खारीज करण्यात आहे.

**जालना**
**दिनांक : १५-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. फकीरचंद केदारी खंडेकर,मु.पो.टेंभुर्णी,ता.जाफ्राबाद,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,टेंभुर्णी,ता.जाफ्राबाद,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, जाफ्राबाद, जि. जालना यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर /१०३१
निर्णय दिनांकः १५-०७-२००९

१. श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, : अपिलार्थी
जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,टाकरवन,
ता.जि.जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. सुभाष सूर्यभान चोरमारे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे व त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झालेल्या माहितीचा तपशील या अर्जामध्ये दिलेला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. सुभाष चोरमारे, पाणीपुरवठा नोकर, ग्रामपंचायत टाकरवन, यांच्याशी संबंधित एकूण सात मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री.चोरमारे यांच्या दि. ०१.०७.१९९९ ते डिसेंबर,२००७ या कालावधीतील नमुना

नं.२४ च्या साक्षांकित प्रती, कामावर घेण्याच्या ठरावाची साक्षांकित प्रत, टाकरवन गावाची लोकसंख्या, श्री.चोरमारे यांचे थकित वेतनाचे प्रमाणपत्र, श्री. चोरमारे यांना चेकने पगार दिला असल्यास, त्या चेकचा क्रमांक,रक्कम व दिनांक, श्री. चोरमारे यांच्या भविष्य निर्वाह निधीची पोस्ट खात्याची साक्षांकित प्रत व पंचायत समिती,जालना कार्यालयाने जन माहिती अधिकाऱ्यास दि. २९.०३.२००७ रोजीचा शासन निर्णय दिला असल्यास त्याची साक्षांकित प्रत व त्या शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्यांना वेतन वाढ दिली असल्यास कर्मचाऱ्यांना दिलेले चेकचे क्रमांक,रक्कम व दिनांकच्या साक्षांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२०.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे दि. २५.०३.२००८, २१.०४.२००८ व दि.२०.०५.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी आणि अपिलार्थी यांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेणे शक्य झाले नाही. तथापि दि.०२.०६.२००८ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही उपस्थित राहिले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती सोबत आणली व ती अपिलार्थीस दिली. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी अनुमान काढले व अपिलार्थीस उर्वरित माहिती वेळेच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना अद्यापपावेतो जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून येणे बाकी आहे, ती माहिती पंचायत समितीच्या कार्यालयात उपलब्ध आहे. एवढे असूनही त्यांना जन माहिती अधिकारी सदर माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत. ती माहिती त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरित मिळावी, अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री. सुभाष सुर्यभान चोरमारे यांच्या दि. ०१.०७.१९९९ ते मे, २००३ व जुलै, २००७ ते डिसेंबर, २००७ या कालावधीची नमुना नं.२४ ची प्रत मिळालेली नाही, त्रयस्थ पक्ष श्री. सुभाष चोरमोरे यांना कामावर घेण्यासाठी ग्रामपंचायतीने घेतलेल्या ठरावाची साक्षांकित प्रत व मुद्दा क्र.६ शी संबंधित भविष्य निर्वाह निधीची पोस्ट खात्याची साक्षांकित प्रत व मुद्दा क्र.७ च्या संदर्भात कोणतीही माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मूळात त्रयस्थ पक्ष श्री. सुभाष चोरमोरे यांना ग्रामपंचायतीकडून कोणत्याही ठरावाशिवाय कामावर घेण्यात आले होते. त्यामुळे त्यांना कामावर घेण्याच्या ठरावाची साक्षांकित प्रत अपिलार्थीस देता येणार नाही. तसेच अपिलार्थीने नमूद केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ मधील संबंधित कालावधीमध्ये त्रयस्थ पक्ष हे ग्रामपंचायतीकडे कामाला होते किंवा कसे, याचाच मूळात वाद असल्यामुळे त्यांना मुद्दा क्र.१,६ व ७ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देता येणार नाही. यावर अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, ही सर्व माहिती पंचायत समिती कार्यालयात उपलब्ध आहे. आयोगाने आदेशित केल्यास ही माहिती पंचायत समितीमार्फत मिळू शकेल. अपिलार्थीच्या या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही, मात्र अपिलार्थीस अद्यापपावेतो न पुरविलेली माहिती परत एकदा त्यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांवरुन तपासून ती अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी दोन बाबींची नोंद आयोगाने घेतली आहे. त्यापैकी पहिली

बाब अशी आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत माहिती देण्यासंदर्भात कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीस तसे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कळवावयास हवे होते. परंतु या ठिकाणी अपिलार्थीच्या दि.०१.०१.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी मूळात प्रथम प्रतिसादच दि. ०२.०६.२००८ रोजी, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीच्या वेळी दिला. त्यावेळीही त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊ केली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि.०२.०६.२००८ रोजी दिलेली माहिती ही मूळात अपूर्ण आहे की परिपूर्ण आहे, याचा उलगडा आयोगास, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या परस्परविरोधी युक्तिवादामुळे, होत नाही. तथापि या प्रकरणी एवढे मात्र निश्चित स्पष्ट होते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०१.०१.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास जो प्रतिसाद त्यांनी दि. ३०.०१.२००८ रोजी अथवा तत्पूर्वी द्यावयास हवा होता, तो प्रतिसाद त्यांनी अपिलार्थीस अंदाजे पाच महिने इतक्या विलंबाने दिलेला आहे.अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची बाकी असलेली उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जालना यांनी जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस उर्वरित माहिती या मुदतीत देतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील अद्यापपावेतो न दिलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना**
**दिनांकः १५-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे,ट्रेड युनियन सेंटर, लक्कडकोट,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,टाकरवन,ता.जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०३२
निर्णय दिनांक १५-०७-२००९

१. श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
नेहरु विद्यालय, गोलापांगरी,ता.जि.जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना

त्रयस्थ पक्षः श्री. एस.बी.उजाड, श्री. जी.के.राऊत

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने,असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. एस.बी.उजाड, श्री.उ.बी.कनके, श्री.जी.के.राऊत, यांची सेवानिवृत्तीप्रकरणे ज्या सेवापुस्तिकेवरुन निकाली काढण्यात आले, त्या सेवापुस्तिकेची झेरॉक्स प्रत - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दि.०१.०१.२००५ ते दि. ३१.१२.२००७ असा होता व अपिलार्थी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २४.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०९.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले निर्णय पारित केले. या आदेशाद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित मुख्याध्यापक यांनी सेवापुस्तिका प्राप्त होताच त्या अपिलार्थीस त्वरित उपलब्ध करुन द्यावयाचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या निर्णयापूर्वीच दि. ०२.०८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस श्री. राऊत यांच्या सेवापुस्तिकेच्या संबंधी माहिती पुरविली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही उर्वरित दोन त्रयस्थ पक्ष श्री. उजाड व श्री.कनके यांच्या सेवापुस्तिकेच्या प्रती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली होती, त्यावेळी या पदावर श्री. पी.बी.बागल हे मुख्याध्यापक कार्यरत होते, आता ते नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्यामुळे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांनी प्रतिसाद का दिला नाही, याचे कारण त्यांना ठाऊक नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीस आता ज्या उर्वरित त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेची प्रत हव्या आहेत. परंतु त्या त्यांना शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,जालना यांच्याकडून प्राप्त झाल्याअसून या दोनही त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिका ते अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०६.०६.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील पहिल्या मुद्यावरील माहिती त्यांनी दि. ०२.०८.२००८ रोजी पुरविली आहे. त्यावेळी उर्वरित त्रयस्थ पक्ष श्री. उजाड व श्री. कनके यांच्या सेवापुस्तिकेच्या प्रती त्यांनी महालेखापाल, नागपूर कार्यालयात पाठविली असल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता आली नाही. तथापि संबंधित त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिका दि. २०.०९.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.जालना यांच्याकडून त्यांना प्राप्त झाल्या आहेत व त्याच्या प्रती अपिलार्थीस देण्याची त्यांनी आयोगासमोर तयारीही दर्शविली आहे, हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी हे दि. २०.०९.२००८ रोजी म्हणजेच ज्या दिवशी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शिक्षणाधिकाऱ्यामार्फत जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्या, त्यादिवशी ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस देण्याचे तत्कालीन मुख्याध्यापक श्री. बागल यांनी टाळले. आता श्री. बागल हे नियतसेवानियमानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर आता शिस्तभंग कारवाई करण्याची आयोग शिफारत करीत नाही. मात्र या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती स्वतःकडे दडवून ठेवली असल्याचे सिध्द होत असल्याने त्यांच्यावर आयोगातर्फे ठपका ठेवण्यात येत आहे व आता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी येथून पुढे सकारात्मक कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**जालना**
**दिनांक : १५-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे,द्वारा श्रीनाथ जनरल स्टोअर्स,चाणक्य कॉम्प्लेक्स,कचेरी रोड,जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,नेहरु विद्यालय, गोलापांगरी,ता.जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०३३
निर्णय दिनांक १५-०७-२००९

१ श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मालेवाडी,ता.बदनापूर,जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,पंचायत समिति,
बदनापूर,जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पंचायत समिती,बदनापूर मधील ग्रामपंचायत,मालेवाडी येथील कर्मचाऱ्यांचे जी.पी.एफ.खाते (भ.नि.नि. खाते) संदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित कार्यालयाच्या आस्थापना विभागाशी संबंधित होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०१.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या

अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.०२.२००८ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीस दि.१५.०२.२००८ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. देशपांडे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार आहे. ती माहिती घेऊन ते अपिलार्थीकडे (त्यांच्या कार्यालयात) चार वेळा गेले असता, अपिलार्थी व त्यांची भेट होऊ शकली नसल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस हस्तांतरित करता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.५ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती, अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असावी अशातील कोणतीही बाब संभवत नव्हती. तथापि एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत तर प्रतिसाद दिला नाहीच, परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती पुरविलेली नसल्याचे आढळून आले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाद्वारे माहिती मागविली असता, जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात

उपस्थित राहण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती तयार होती व ती अपिलार्थीस देण्यासाठी ते अपिलार्थीच्या कार्यालयात गेले होते, या विधानावर आयोग विश्वास ठेवत नाही. सबब विद्यमान जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. ही माहिती अपिलार्थीस पुरविण्यापूर्वी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर यांच्याकडून ती मुद्देनिहाय तपासून घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १८.१०.२००७ रोजीच्या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल संबंधित ग्रामसेवक, मालेवाडी, श्री. देशपांडे यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर यांच्याकडून ती मुद्देनिहाय तपासून हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधित ग्रामसेवक, मालेवाडी, श्री. देशपांडे यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार

यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना**
**दिनांक : १५-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे,ट्रेड युनियन सेंटर,लक्कडकोट, जालना,जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत मालेवाडी, पो.सोमठाणा, ता.बदनापूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,बदनापूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०३४
निर्णय दिनांक १५-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. जनार्दन दत्तात्रय साळी,<br>जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता (बांधकाम),<br>जिल्हा परिषद, उपविभाग अंबड<br>ता.अंबड,जि.जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम),<br>जिल्हा परिषद, जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील शाखा अभियंत्याकडील कामासंदर्भातील, त्यांनी विहित केलेल्या दहा रकाने असलेल्या विवरणपत्रामध्ये, काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या

अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.११.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. २०.११.२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या निर्णयानंतरही अपिलार्थीस दि. ०५.१२.२००८ पर्यंत माहिती न मिळाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती एका विशिष्ट प्रपत्रामध्ये मागितली होती व ही माहिती त्यांना संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याकडून घेऊन नंतर अपिलार्थीस द्यावी लागणार होती, त्यामुळे ही माहिती सर्व संबंधितांकडून संकलित करुन घेण्यासाठी त्यांना काही कालावधी लागला. त्यामुळे सदर माहिती त्यांच्याकडे एकत्रित झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि.०८.१२.२००८ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता ती सर्वसाधारणपणे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.१२.२००८ द्वितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती पूर्ण स्वरुपात प्राप्त झाली आहे. यापृष्ठयर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची पोचपावती देखील दिलेली आहे. तसेच आज सुनावणीसाठी अपिलार्थी यांची अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.१०३४/०८, दि.०८.१२.२००८ खारीज करण्यात आहे.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १५-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जनार्दन दत्तात्रय साळी,राखे वाडा,पोस्टासमोर, कचेरी रोड,जालना,जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, उपविभाग अंबड ता.अंबड,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०३५
निर्णय दिनांक १५-०७-२००९

१. श्री. गजेंद्र सुदामराव साबळे, बदनापूर,जि.जालना. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,बदनापूर,जि.जालना : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,बदनापूर,जि.जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बदनापूर, जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नसल्याने व ते अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये तहसीलदार,बदनापूर यांच्याकडे दि. २२.११.२००७ रोजी १७ किरकोळ व ३ अर्धघाऊक रॉकेल

विक्रेत्यांच्यासंदर्भात चौकशीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेले पंचनामे व दप्तर चौकशीच्या प्रतींची माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०१.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जिल्हा पुरवठा कार्यालयाशी संबंधित असल्याने अपिलार्थीस या माहितीसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने अशाप्रकारे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याच्या कार्यालयाशी संपर्क न साधता,परत तहसीलदार,बदनापूर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१९.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती ही, जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याचे दि.०१.०७.२००८ रोजी कळविल्याचे आयोगास अवगत केले व यासंदर्भातील पत्रव्यवहार आयोगास दाखविला. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांचे दि.०१.०७.२००८ रोजीचे पत्र स्वीकारण्यास अपिलार्थीने नकार दिला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या दक्षता पथकाने केलेल्या कार्यवाहीशी संबंधित होती, त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयाकडे अपिलार्थीने मागणे संयुक्तिक झाले असते. तथापि

अपिलार्थीने, तहसीलदार,बदनापूर यांनी दि.०१.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे तसे सदर पत्र स्विकारण्यास नकार देऊन कळवूनही परत यासंदर्भात तहसीलदार, बदनापूर यांच्याकडेच प्रथम अपील केले आहे. त्याचप्रमाणे येथे असेही आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर तहसीलदार,बदनापूर यांच्या कार्यालयाशी संबंधित नव्हती तर त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांच्याकडे, अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठवून, त्याची प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) नुसार त्यांना या प्रकरणी भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही केली नाही. आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मागूनही बराच कालावधी व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरविणे योग्य राहील, असे आयोगाचे मत आहे. या सुचनांचे अनुपालन करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना तीस दिवसांची मुदत देण्यात येत असून, त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये स्वतः उपस्थित राहून ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेणे त्यांना अनिवार्य आहे. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांचा कोणताही प्रतिनिधी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाठविणे त्यांना अनुज्ञेय असणार नाही. तसेच आदेशित केलेल्या कालावधीनंतर, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विनामूल्य देय राहणार नाही याचीही अपिलार्थीने नोंद घ्यावी, असे अपिलार्थीस येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र सुदामराव साबळे,डॉ.आंबेडकरनगर,बदनापूर, ता.बदनापूर,जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बदनापूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,बदनापूर,जि.जालना यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०३६
निर्णय दिनांक १५-०७-२००९

१. सौ. लता दाभाडकर व इतर नागरिकांच्यातर्फे : अपिलार्थी
श्री.सतीश कुलकर्णी व श्री.जयंत वडगांवकर,
जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी, जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, जालना.
प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : महसूल सहायक,
जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांनी शासन ज्ञापनाची दिलेली प्रत त्यांना योग्य वाटत नसल्यामुळे तसेच अपर जिल्हाधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीस विलंब करुन अपील फेटाळल्यामुळे त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन करता या अर्जाच्या शेवटी अपिलार्थीचे नाव "सौ.लता दाभाडकर व इतर नागरिकांच्यातर्फे श्री. सतीश कुलकर्णी व जयंत वडगावकर",असे लिहिलेले आहे. या अर्जावर सौ.लता दाभाडकर यांची कुठेही स्वाक्षरी नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२७.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"मा.अप्पर जिल्हाधिकारी जालना यांना एखाद्या सिटी सर्व्हे नं.भू क्रमांकाची क्षेत्र दुरुस्ती करण्याचे अधिकार आहेत काय, असल्यास कोणत्या नियमान्वये अथवा कोणत्या शासन निर्णयानुसार किंवा अधिकार नसल्यास लेखी देण्यात यावे."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जाच्या संदर्भाने अपिलार्थीच्या दोन साथीदारांपैकी श्री. जयंत वडगावकर यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०९.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे दोन साथीदार श्री. सतीश कुलकर्णी व जयंत वडगावकर अथवा यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीच्या वेळी देखील अपिलार्थी व इतर सर्व संबंधित त्यांच्याकडे अनुपस्थित होते. आजही आयोगासमोर त्यांच्या द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणीकरिता अपिलार्थी व इतर सर्व संबंधित आयोगासमोर गैरहजर असल्यामुळे त्यांना निवासी उपजिल्हाधिकारी यांनी

दिलेली शासन ज्ञापनाची प्रत योग्य का वाटत नाही, हे स्पष्ट करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, जे त्यांना अनिवार्य होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अतिरिक्त माहिती देण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दि.३०.०४.१९९२ व २२.०७.१९८६ च्या अपर जिल्हाधिकाऱ्यांची'अधिकार व कर्तव्ये', यामध्ये अपर जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविलेल्या विषयासंदर्भातील दोन परिपत्रके त्यांच्याबरोबर आणली आहेत. तथापि ही माहिती स्वीकारण्यास अपिलार्थी हे आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. त्यामुळे आता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सार्वजनिक सुटीचे दिवस वगळून शासकीय कामकाजाच्या वेळेमध्ये स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून ही माहिती विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी लागेल. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांच्या कोणत्याही प्रतिनिधीस पाठविणे अनुज्ञेय नाही. तसेच हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांनंतर त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याचीही त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राचे अवलोकन करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली काही माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे व उर्वरित देय माहिती जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वीच दिलेली आहे असे आयोगास आढळून येत आहे.

अपिलार्थीस आवश्यक ती देय माहिती मिळाली असल्यामुळे आणि आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांचे मदतनीस यांच्यापैकी कोणीही उपस्थित नसल्याने,अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १५-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. लता दाभाडकर व इतर नागरिकांतर्फे श्री. सतीश कुलकर्णी व जयंत वडगावकर रा.'चाणक्य चाळ', देहेडकरवाडी,जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक,जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.